मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

वृत्तमानस

मुंबई/ पालघर | मुंबई, शनिवार, ७ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ७९ | पाने- ८

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६

किंमत : ३ रुपये

Email : vrittamanas1@gmail. com

मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.

दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स

भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

कमला हॅरिस यांना अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी पाहायला आवडेल

पान ८

आपल्या बापाला लुटारु म्हणणारे हे लोक 'शिवप्रेमी' कसे ?

'सूरत'च्या वक्तव्यावरुन फडणवीस यांचा संतप्त सवाल

प्रतिनिधी
मुंबई

शिवरायांना लुटारू म्हणणे पवारांना मान्य आहे का ?

शरद पवार म्हणाले की तुम्ही चुकीचा इतिहास सांगता, असे विचारल्यावर फडणवीस म्हणाले की, "शरद पवारांना हे मान्य आहे का? महाराजांना लुटारु म्हणणे? माझा राजा लुटारु नव्हता. माझ्यावर कितीही टीका करा मी ते मान्य करणार नाही. रयतेच्या भाजीच्या देठाला स्पर्श करु नका असे महाराजांनी सांगितले होते. कल्याणच्या सुभेदाराची सून जेव्हा दरबारात आणली तेव्हा तिला सन्मानाने घरी पाठवले. अशीच अमुची आई असती सुंदर रुपवती, आम्हीही सुंदर झालो असतो वदले छत्रपती असे शिवाजी महाराज म्हणाले होते. त्यांना लुटारु म्हणता? लाज वाटली पाहिजे तुम्हाला." अशा शब्दात फडणवीसांनी विरोधकांचा समाचार घेतला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत लुटली हे म्हणणे चुकीचेच आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरतेवर दोनदा स्वारी केली. अल्लाउद्दीन खिलजी जे करतो त्याला लुटली म्हणतात, अब्दाली, तैमूर लंग यांनी जे केले त्याला लूट म्हणतात. महाराजांनी तिथल्या सामान्य माणसांना हात तरी लावला का? शिव इतिहासकारांनी माध्यमांना सांगितले की महाराजांनी पत्र दिले होते मुघलांचा खजिना आहे, तुम्ही तीन वर्षे युद्ध चालवले,त्यासाठी इतका खर्च आला. तुम्ही हा खर्च द्या अन्यथा मी स्वारी करेन. शिवरायांनी एक प्रकारे त्यांना नोटीसच पाठवली होती. खजिना वसूल केला, त्यानंतर महाराजांनी पावती दिली. याला लूट म्हणतात? आपल्या बापाला लुटारु म्हणणारे हे लोक शिवप्रेमी कसे ,असा संतप्त सवाल करीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरतवरील आपल्या वक्तव्याचे ठाम समर्थन केले.एका मराठी वृत्तवाहिनीच्या कॉनक्लेवमध्ये देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती होती. त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केले.

शिवाजी महाराजांनी सूरत लुटली . हे तेच लोक आहेत, जे सांगत आलेत १८५७ ची लढाई स्वातंत्र्यसमर नव्हते तर शिपायांचे बंड होते. कशाचे शिपायांचं बंड? ती पण स्वातंत्र्याची लढाईच होती. तर महाराजांनी स्वराज्यासाठी सूरतवर स्वारी केली. महाराजांना लुटारु म्हणणे चुकीचे आहे. असे ठाम प्रतिपादन फडणवीस यांनी केले.

रुप तुझे पाहता गोजिरे, देहभान हरपले बाप्पा...

आपल्या लाडक्या आराध्याचे प्रथमदर्शन घेण्यासाठी गणेशभक्त आसुसले आहेत. कधी एकदा लाडक्या बाप्पाला जवळून पाहतोय असे सर्वांनाच झाले आहे. मुंबईचा गिरगांव अभ्युदयनगरमध्ये यंदा 'अभ्युदयनगरचा राजा' सुंदर, आलिशान अशा रॉयल पॅलेसमध्ये आसनावर विराजमान झाला आहे. या बाप्पाची विशाल पण गोजिरी मनमोहक मूर्ती भक्तांना भान हरपायला लावणारीच ठरणार आहे. मूर्तिकार आहेत विपुल जाधव आणि देखणा रॉयल पॅलेस साकारला आहे कला दिग्दर्शक चंद्रशेखर परब यांनी.

छायाचित्र - अनिल पानस्कर

उद्या अंक नाही

गणेशचतुर्थीनिमित्त आज दै.वृत्तमानस कार्यालयास सुट्टी असल्यामळे उद्याचा अंक प्रकाशित होणार नाही याची सर्व वाचक, जाहिरातदार व वितरकांनी नोंद घ्यावी.

गणेश चतुर्थीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा

तुम्ही देव आहात की नाही हे स्वत: ठरवू नका, लोकांना ठरवू द्या!

भागवतांचा राजकारण्यांना टोला

प्रतिनिधी
पुणे

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी काल पुण्यात शंकर दिनकर काणे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित एका कार्यक्रमाला हजेरी लावली. या कार्यक्रमात बोलताना त्यांनी "मी देव झालो, असं स्वत: म्हणू नये तुमच्यातील देवत्व लोकांना ठरवू द्या," असा खोचक टोला लगावला. त्यामुळं आता मोहन भागवत यांचा टोला नेमका कुणाला? असा सवाल विचारला जात आहे. शंकर दिनकर काणे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित एका कार्यक्रमाला उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्यांनी हे विधान केलं. या कार्यक्रमाला प्रतिष्ठानचे सचिव जयवंत कोंडविलकर, रा. स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक नाना जाधव यांच्यासह बांधकाम विकासक नितीन न्याती उपस्थित होते.

"प्रत्येकजण आपल्या कामातून आदरणीय व्यक्ती बनू शकते. पण आपण त्या पातळीवर पोहोचलो की नाही हे आपण स्वत: कधी ठरवू शकत नाही. ते इतरांनी ठरवावं लागतं. त्यामुळं मी देव झालो, असं स्वत: म्हणू नये. तुमच्यातील देवत्व लोकांना ठरवू द्या. क्षणभर चमकणाऱ्या विजेसारखं कधी होऊ नये. चमकणं डोक्यात जातं. वीज होऊन चमकण्यापेक्षा पणती होऊन तेवत राहावं," असं मोहन भागवत म्हणाले. लोकसभा निवडणुकीच्या आधी पंतप्रधान नरेंद्र मोदींच एक वक्तव्य चर्चेत आलं होतं.

पान 8 वर

श्री गणरायाचे आगमन आनंदाचे, समृद्धी- समाधानाचे पर्व घेऊन येवो

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे बाप्पाला साकडे

प्रतिनिधी
मुंबई

पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्याचे आवाहन

श्री गणरायाचे आगमन राज्याच्या विकास चक्राला गती देण्यासाठी राबणाऱ्या प्रत्येकासाठी, शेतकरी, कष्टकरी, कामगार बांधवासाठी राज्यातील माता-भगिनींसाठी, आबाल-ज्येष्ठांसाठी आनंदाचे, आरोग्यदायी, समृद्धीचे, समाधानाचे पर्व घेऊन येवो अशी प्रार्थना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. श्री गणेश आगमनाच्या पुर्वसंध्येला मुख्यमंत्री श शिंदे यांनी राज्यातील नागरिकांसह, जगभरातील तमाम गणेश भक्तांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. श्री गणेशांचे अखंड कृपाछत्र महाराष्ट्रावर राहावे, अशी मनोकामनाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी बाप्पा चरणी केली आहे.

शुभेच्छा संदेशात मुख्यमंत्री शिंदे म्हणतात, की श्री गणेशाचे आगमन दरवर्षी एक नवी ऊर्जा, प्रेरणा आणि उत्साह घेऊन येते. यातून मंगलमय, पवित्र वातावरण निर्माण होते. गणेशोत्सवातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडते. म्हणून जगाचेही महाराष्ट्राकडे लक्ष लागलेले असते. श्री गणेशाला कलाधिपती मानले जाते. त्यामुळे या उत्सव काळात कलाविष्कारालाही उधाण येतं. महाराष्ट्राचा काना कोपरा अशा अविष्कारांनी, उत्साह-जोश यांनी ओसंडून जातो. यंदाही आपण हा उत्सव उत्साहात, जल्लोषात आणि पावित्र्य राखून साजरा करूया. श्री गणेशाची मनोभावे सेवा करतानाच, आपण सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवूया. उत्सव ही संधी मानून आपण समाजातील गरजूंपर्यंत पोहचून, त्यांच्यापर्यंत शिक्षण, आरोग्य तसेच अशा विविध प्रकारच्या सेवा, मदत पोहचवण्याचा प्रयत्न करूया.

श्रीगणेश आपल्याला निसर्ग पूजनाचा संदेश देतात. आपणही पर्यावरणाची काळजी घेऊया. निसर्ग संवर्धनाच्या उपक्रमांना पाठबळ देऊया. निसर्गाचं जतन-संवर्धन होईल, अशा प्रयत्नांत सहभागी होऊया. सामाजिक सलोखा हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. त्यामुळे श्री गणेशाकडून सकारात्मक ऊर्जा, प्रेरणा घेऊन राज्यातील सामाजिक सलोखा-बंधुभाव परस्परांतील प्रेम-आदर भाव वाढीस लागेल, असे प्रयत्न करुया.

आपला महाराष्ट्र भारताचे 'ग्रोथ इंजिन' आहेच.

पान 8 वर

म ह त्त्वा चे

अभिषेक घोसाळकर हत्या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे

मुंबई : शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येशी संबंधित मुंबई पोलिसांनी केलेल्या तपासात अनेक त्रुटी असल्याचे नमूद करून उच्च न्यायालयाने प्रकरणाचा तपास शुक्रवारी केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग केला. पोलिसांनी प्रकरणाच्या बऱ्याच पैलूंचा तपासच केलेला नाही. या पैलूंची चौकशी होणे आवश्यक आहे. अन्यथा योग्य तो न्याय देता येणार नाही, असेही न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठाने प्रकरणाचा तपास सीबीआयकडे वर्ग करताना नमूद केले. ही एक थंड डोक्याने केलेली हत्या असून हत्येचा सगळा घटनाक्रम फेसबुक लाईव्हद्वारे सगळ्यांनी पाहिला आणि या हत्याकाडांने सगळ्याना हादरवून सोडले, अशी टिप्पणीही न्यायालयाने केली.

पाच हजार नवीन एसटी बसगाड्या एसटीच्या ताफ्यात

मुंबई : राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) भाडेतत्त्वावरील नवीन १३१० खासगी बसगाड्यांसाठी निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. मुंबई आणि पुणे विभागासाठी ४५०, छत्रपती संभाजी नगर आणि नाशिक विभागासाठी ४३०, तर अमरावती व नागपूर विभागासाठी ४६० नवीन बसगाड्या भाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहेत. त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यापूर्वी महामंडळाने सुमारे ३५० बस भाडेतत्त्वावर घेतल्या होत्या. त्यांना चांगला प्रतिसाद मिळाल्यामुळे भविष्यात साध्या बसची कमतरता भरून काढण्यासाठी भाडेतत्त्वावर आणखी काही बस घेण्याचा प्रस्ताव महामंडळाच्या विचाराधीन होता. शिवनेरी आणि शिवशाही या आरामदायी बससाठी भाडेतत्त्वावरील बस घेण्याचा प्रयोग यापूर्वी एसटी महामंडाने केला आहे. अशाच पद्धतीने खासगी संस्थेचा चालक, डिझेल आणि बसची तांत्रिक देखभाल करणे या अटीवर पुढील सात वर्षांसाठी या बसगाड्या घेण्यात येणार आहेत.

आघाडीचे सरकार बहुमताने येणार

मुंबई

राज्यातील वातावरण महाविकास आघाडीसाठी अनुकूल आहे. राज्यात परिवर्तन करण्याची जनतेची मानसिकता बनली असून भ्रष्ट महायुती सरकारला सत्तेतून खाली खेचून दोन तृतीयांश बहुमताने महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येईल, असा विश्वास काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने राज्यातील विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेण्याचे काम सुरू केले आहे. काँग्रेसने आतापर्यंत 172 मतदारसंघांचा आढावा घेतला असून येत्या 25 तारखेपर्यंत सर्व 288 मतदारसंघांचा आढावा पूर्ण होईल. चेन्नीथला यांनी आज, शुक्रवारी टिळक भवन येथे मतदारसंघाचा आढावा घेताना निवडणूक तयारीची माहिती घेतली. या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना चेन्नीथला यांनी आघाडी सत्तेत परतणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.



विरार : गुरुवारी सकाळी ११ वाजता ज्येष्ठ नागरिक सेवा संस्थेच्या वसई कार्यालयाच्या भूमिपूजनाचा सोहळा संपन्न झाला. सदर बांधकामासाठी पालिकेने ८१ लाखाचा निधी मंजूर केला आहे.या कामासोबतच शिवमंदिर ते रेल्वे फाटक पर्यंत ४० लाख मंजूर झालेल्या रस्त्याच्या भूमिपूजनेचा देखील शुभारंभ करण्यात आला. यावेळी महापालिकेचे माजी महापौर नारायण मानकर,माजी नगरसेवक तथा शिवसेना सचिव, ज्येष्ठ नागरिक सेवा संस्थेचे अध्यक्ष विवेक पाटील,उपाध्यक्ष तथा संपर्क प्रमुख मिरा -भाईंदर विधानसभा किरण फडणीस, उपाध्यक्ष,ऍडव्होकेट गिरीश लालानी,शिवसेना विधी व न्याय संस्था पालघर जिल्हा समन्वयक मा.ऍडवोकेट भरत पाटील, संस्थेचे सचिव काशिनाथ पाटील, खजिनदार, ग्राहक संरक्षण कक्ष, वसई शिवाजी शिंदे,सह-सचिव हेमलता हडकर,संचालक सदस्य पांडुरंग खामकर, सुवर्णा गावडे, दिलीप सुर्वे,माजी नगरसेवक, स्था. समिती सभापती उमा पाटील,माजी पालघर जिल्हा ग्राहक संरक्षण कक्ष शंकर बने,माजी नगरसेविका आर्चना पाटील, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, माजी नगरसेवक सचिन घरत आदी उपस्थित होते.

थोडक्यात

'माऊंट मेरी' यात्रे निमित्त अतिरिक्त बसगाड्यांचे प्रवर्तन

मुंबई: वांद्रे (प) येथील 'माऊंट मेरी यात्रा' सप्टेंबर महिन्याच्या दुस-या आठवडयात रविवार दि.८.९.२०२४ पासून सुरू होत असून, ही यात्रा १५.०९.२०२४ पर्यंत आहे. या माऊंट मेरी यात्रेला भेट देणारे प्रवासी मोठ्या प्रमाणावर वांद्रे स्थानक (प) येथे उपनगरीय रेल्वेने येऊन तेथुन उपक्रमाच्या बसगाड्यांचा लाभ घेतात. ही बाब विचारात घेऊन यावर्षीही 'माऊंट मेरी' यात्रे निमित्त बेस्ट उपक्रमातर्फे संपूर्ण आठवडा १२१ अतिरिक्त बसगाड्या वांद्रे स्थानक (प) आणि हिलरोड दरम्यान प्रवर्तित करण्यात येणार आहेत. या व्यतिरिक्त बसमार्ग क्र. सी-७१, ए-२०२, ३२१ मर्या. ए-३७५, ४२२, ४७३ व सी-५०५ या बसमार्गावर अतिरिक्त बसगाड्या प्रवर्तित करण्यात येणार असल्याचे.बेस्ट ने जाहीर केली आहे. 'माऊंट मेरी' चर्च येथे तसेच फादरॲग्नेल आश्रम या परिसरामध्ये यात्रेकरीता येणा-या प्रवाशांची गर्दी मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे बसगाड्यांचे प्रवर्तन 'माऊंट मेरी' चर्चपर्यंत करणे शक्य नसते. परिणामी या अतिरिक्त बसगाड्या वांद्रे रेल्वे स्थानक (प) आणि हिलरोड उद्यान दरम्यान कार्यान्वित करण्यात येतील या व्यतिरिक्त वांद्रे परिसारातून प्रवर्तित होणा-या उपक्रमाच्या नियमित बसमार्गावर देखील अतिरिक्त बसगाड्या प्रवर्तित करण्यात येणार आहेत.

रिलायन्स फाउंडेशन स्किलिंग अकादमीची स्थापना

मुंबई: भविष्यातील चांगल्या नोकऱ्यांसाठी भारतीय तरुणांना सज्ज करणारे कौशल्य व्यासपीठ, रिलायन्स फाउंडेशन स्किलिंग अकादमीचे उद्घाटन, केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता खात्याचे राज्यमंत्री जयंत चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. रिलायन्स फाउंडेशन आणि नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या सहकार्याने आयोजित "एम्पॉवर युथ फॉर द जॉब ऑफ द फ्युचर" या राष्ट्रीय परिसंवादात या वेबसाईटचे उद्घाटन करण्यात आले. कौशल्य विकास हे ध्येय तरुणांसमोर ठेवून त्यांच्यात आयुष्यभर शिक्षण आणि कौशल्य विकासाची संस्कृती रुजवणे हे आपले ध्येय आहे, असे जयंत चौधरी या वेळी म्हणाले. रिलायन्स फाउंडेशनचे सीईओ जगन्नाथ कुमार या वेळी म्हणाले की, तरुणांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यास सहाय्य करणे आणि त्यांना भविष्यातील नोकऱ्यांसाठी सज्ज बनवणे याकडे रिलायन्स फाउंडेशन स्किलिंग अकादमीच्या स्थापनेने एक पाऊल पुढे टाकले गेले आहे. वेगाने बदलत्या आर्थिक-औद्योगिक वातावरणात भारताच्या युवकांना सक्षम करण्यात याद्वारे महत्त्वाची भूमिका बजावली जाईल. रिलायन्स फाउंडेशन स्किलिंग अकादमी www.rfskillingacademy.com हे सर्वांसाठी खुले व्यासपीठ असून त्या कौशल्य निर्मितीसाठी भविष्यातील उपयुक्त असे अभ्यासक्रम शिकवले जातील.

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

यंदाच्या गणेशोत्सवाला राजकीय बॅनरबाजीची झळ!

सार्वजनिक गणेशोत्सवात पुढाऱ्यांचे फ्लेक्स विधानसभेचा प्रचार?

प्रतिनिधी
■ वसई

ठिकठिकाणी गणरायांचे मोठ्या भक्तिमय वातावरणात आगमन होत आहे. याच धर्तीवर वसई-विरारमधील सर्वच सार्वजनिक मंडळे, घरगुती बाप्पांच्या आगमनासाठी भाविक सज्ज झाले आहेत. मात्र यावेळेस सार्वजनिक गणेशोत्सवांच्या गेटवर पुढाऱ्यांचे भलेमोठे राजकीय बॅनर झळकले असून गणेशोत्सव की आगामी विधानसभा व पालिका निवडणुकीचा आखाडा? असा सवाल भाविकांना पडला आहे.

वसई- विरार शहरात बऱ्याचशा सार्वजनिक मंडळांनी मुख्य वर्दळीच्या रस्त्याला खेटून गणरायांसाठी मंडप साकारले आहेत. पुढील पाच, सहा, सात व अकरा दिवस हे मंडप आहे त्या स्थितीत राहणार असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होणार आहे. तसेच बऱ्याच ठिकाणी पालिकेच्या गणेशोत्सव साजरा करताना दिलेल्या नियमावलीचे उल्लंघन झाले आहे. दरम्यान, त्यात राजकीय पुढाऱ्यांनी आगामी विधानसभा व पालिका निवडणुकीत आपल्या प्रतिमा जनमानसात बिंबवण्यासाठी मोठ्या राजकीय बॅनरबाजीचा आधार घेतला आहे. तर अशा जाहिरातींतून मंडळाला चांगल्या देणग्या मिळत असल्याने विविध ठिकाणी सार्वजनिक मंडळांच्या प्रवेशद्वारावरच अनेक नेत्यांच्या राजकीय प्रतिमा झळकल्या आहेत.

येत्या दिवाळीनंतर विधानसभा निवडणुकीचा बार उडत आहे. तसेच त्या पाठोपाठ वसई- विरार शहर महापालिकेची निवडणूकदेखील जाहीर होऊ शकते,असा अंदाज असल्याने यंदाचा गणेशोत्सव हा जास्तीत जास्त प्रचाराचा असल्याने सार्वजनिक गणेशोत्सवात इच्छुक उमेदवारांच्या प्रतिमा झळकल्या आहेत. राजकीय बॅनरबाजीच्या आडून उमेदवारांचा हा प्रचार असल्याची चर्चा भाविकांत जोर धरू लागली आहे.

बाजार ठेकेदारांची दादागिरी

भाजी विक्रेत्या आदिवासी महिलांची लुटमार !

महिलांना सणासुदीच्या काळात कर दिलासा देण्याची मागणी

प्रतिनिधी
■ वसई

सध्या गणेशोत्सवाची धामधुम सुरू झाली आहे. त्यामुळे गणेशोत्सवात आवश्यक असलेल्या भाज्या, फुले आपल्या आवारात किंवा शेतात तयार करून ते बाजारात विकण्यासाठी आणणाऱ्या ग्रामीण भागातील आदिवासी महिलांची पालिकेच्या बाजार ठेकेदारांकडून लुटमार सुरू असल्याचे चित्र दिसून येते. ऐन सणासुदीच्या काळात कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवण्यासाठी भाजी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या आदिवासी महिलांना बाजार ठेकेदाराच्या दादागिरीला सामोरे जावे लागत असल्याने अशा ठेकेदारांवर कारवाईसह सध्याच्या सणासुदीच्या काळात आदिवासी महिलांना बाजार करातून दिलासा देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

वसईच्या ग्रामीण भागातील आदिवासी महिला त्यांच्या आवारात किंवा शेतात भेंडी, पडवळ, घोसाळी, दुधी, फोपणीस, कडीपत्ता, माठाचे देठ, झेंडुची फुले आदी पिक घेऊन ते तयार झाल्यावर बाजारात विक्रीसाठी आणतात. मात्र बाजार ठेकेदार अशा महिलांना एकाच जागेवर बसू न देता दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करणे, त्यांच्याकडून मनमानी पद्धतीने बाजार कर वसुल करणे, त्यांच्यावर दादागिरी करणे असे प्रकार राबवत असल्याने या सामान्य आदिवासी महिलांची अक्षरश: लुटमार सुरू आहे.

तसेच बऱ्याच आदिवासी महिलांचा धड व्यवसायही होत नसताना त्यांच्याकडून मनमानीपणे पावत्या देऊन जादा बाजार कर वसुल केला जातो. याबाबत आदिवासी महिलांना सणासुदीच्या काळात बाजार करातून दिलासा देण्यात यावा, अशी मागणी पालिका प्रशासनाकडे होऊ लागली आहे.

पालिका शाळेतील सहा शिक्षकांना राज्य शासनाचे गुणगौरव पुरस्कार

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील ६ सहाय्यक शिक्षकांना राज्य शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार काल मिळाला. हे पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार आणि शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या उपस्थितीत या शिक्षकांना प्रदान करण्यात आले.

१). श्रीमती सविता संदीप जगताप - सहाय्यक शिक्षक देवनार कॉलनी मनपा इंग्रजी शाळा क्रमांक एक २). श्रीमती आशा अशोक ब्राह्मणे सहाय्यक शिक्षक - मढ मराठी मुंबई पब्लिक स्कूल मालाड पश्चिम ३). श्रीमती पूर्वा प्रवीण संखे सहाय्यक शिक्षक - मुंबई पब्लिक स्कूल मालाड कन्या शाळा उ. प्रा. मराठी शाळा मालाड पश्चिम ४) श्रीमती गौरी राजेंद्र कुमार शिंदे सहाय्यक शिक्षक - गोरेगाव पूर्व मनपा माध्यमिक विद्यालय गोरेगाव पूर्व ५) श्रीमती नीता अनिल जाधव सहाय्यक शिक्षक- पंतनगर महानगरपालिका इंग्रजी शाळा घाटकोपर पूर्व आणि ६). रवींद्र पोपट पाटील, संत कक्कया मार्ग हिंदी शाळा क्र ०२ धारावी अशी पुरस्कार प्राप्त शिक्षकांची नावे आहेत.

शिरसाड-वज्रेश्वरी मार्गावर टँकरच्या धडकेत मुलीचा मृत्यू ; मुलगा गंभीर

गणेशोत्सवसाठी कपडे घेऊन घरी येत असताना काळाची दुर्दैवी झडप

प्रतिनिधी
■ वसई

शिरसाड-वज्रेश्वरी मार्गावर मांडवी येथे भरधाव टेम्पोने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात मानसी धनंजय पाटील (वय 12 वर्ष) या मुलीचा जागीच मृत्यू झाला तर या अपघातात मानसीचे वडील धनंजय पाटील व मुलगा ओमकार धनंजय पाटील (वय 10 वर्ष) हे जखमी झाले आहेत. ओमकार यास उपचारासाठी विरार येथील रूग्णालयात हलविण्यात आले आहे. तर अपघातानंतर फरार होण्याच्या तयारीत असलेल्या टेम्पोचालकास मांडवी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

प्राप्त माहितीनुसार, मांडवी येथील रहीवाशी असलेले धनंजय पाटील हे गुरुवारी आपला पगार झाल्यानंतर संध्याकाळी आपल्या दोन्ही मुलांना घेऊन गणेशोत्सवासाठी कपडे खरेदी करण्यासाठी उसगाव येथे

गेले होते. उसगाव येथून कपडे खरेदी करून आनंदाने ते आपल्या दोन्ही मुलांसोबत घरी परतत असताना मागून भरधाव वेगाने आलेल्या आयशर टेम्पोचालकाने धनंजय पाटील यांच्या स्कुटीला जोरदार धडक दिली. या धडकेत धनंजय व त्यांची दोन्ही मुले मानसी व ओमकार खाली पडले. या अपघातात टेम्पोचे चाक मानसीच्या डोक्यावरून जाऊन तिचा जागीच मृत्यू झाला. तर ओमकार व वडील धनंजय पाटील हे जखमी झाले आहेत . याप्रकरणी मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

शिरसाड-वज्रेश्वरी मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. जिल्हा परिषद प्रशासनाकडून येथील मार्गावर ज्या ठिकाणी खड्डे पडले आहेत तेथे केवळ थुकपट्टी लावली जात असल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. तसेच खड्ड्यांमुळे या मार्गावर वाहतुककोंडी नित्याची बनली आहे.

महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या मुख्यलेखावित्तधिकारीपदी चित्रलेखा खातू-रावराणे

■ मुंबई

महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वित्तीय सल्लागार वमुख्यलेखावित्तधिकारी पदी चित्रलेखा खातू-रावराणे यांची शासनाने नियुक्ती केली आहे.सोमवारी त्यांनी पदाचा पदभार स्वीकारला. यापूर्वी त्या उप अधिदान व लेखा अधिकारी म्हणून अधिदान व लेखा कार्यालय मुंबई येथे कार्यरत होत्या.

चित्रलेखा यांची २०११ साली महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा या संवर्गात सहायक संचालक म्हणून निवड झाली. या काळात देयके, निधी, व्यवस्थापन, लेखा इ. विषयामध्ये त्यांनी काम केले. त्यानंतर २०१६ ते २०१९ या कालावधीत वित्तीय सल्लागार व उप सचिव,अन्न नागरी पुरवठा येथे सहायक संचालक अर्थसंकल्प म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळलेला आहे. तसेच २०१९ ते २०२३ या कालावधीत कोषागार अधिकारी (राज्यस्तरीय) शासकीय जमा लेखांकन प्रणाली येथे उत्तम सेवा बजावली आहे. दरम्यान त्यांनी सार्वत्रिक निवडणूकामध्ये मुंबई शहर विभागात निवडणूक खर्च समन्वयक अधिकारी/ उप अधिकारी म्हणूनही कामकाज केले आहे.

चित्रलेखा यांची वित्तीय कामावर उत्तम पकड असून प्रशासकीय कामाचीही त्यांना जाण आहे. विशेष म्हणजे त्या उत्तम लेखिका,निवेदिका आणि गायिका असून शासनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

संडे हो या मंडे काम करता है दिलीप लांडे

मुख्यमंत्री शिंदे यांनी लांडे मामांच्या कामाची केली स्तुती

■ मुंबई

गेल्या सोळा सतरा वर्षापासून प्रलंबित असलेल्या मिठी नदी आणि विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील झोपडी धारकांच्या हक्काचे घराचे स्वप्न आमदार दिलीप लांडे यांच्या प्रयत्नातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार संदेश नगर आणि क्रांती नगरच्या झोपडी धारकांना घर मिळत आहेत. आमदार दिलीप लांडे यांच्या माध्यमातून या उपक्रमातील तिसऱ्या टप्प्यातील सदनिकांचे चावी वाटप कार्यक्रम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मंगळवारी साकीनाका येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित लाभार्थी नागरिकांना संबोधित करताना लोकांचे घराचे स्वप्न आमदार दिलीप लांडे यांच्या जिद्द पणामुळे पूर्ण झाल्याचे सांगत चांदिवली विधानसभा शेत्रातील नागरिकांच्या विकास कामांसाठी लांडे मामा सतत प्रयत्नशील असतात संडे हो या मंडे काम करता है दिलीप लांडे अशी स्तुती सुमन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमदार लांडे यांच्यावर उधळली, यावेळी व्यापीठावर शिवसेना महिला विभाग प्रमुख चंद्रप्रभा मोरे, विधानसभा प्रमुख, अशोक माटेकर, माजी नगरसेवक वाजीद कुरेशी, किरण लांडगे, हरीश शुक्ला, लीना शुक्ला युवासेना महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य प्रयाग लांडे, शाखाप्रमुख सुशील जाधव, मंगेश संकपाळ, सुशील फडतरे, शैलेश निंबाळकर, नितीन गोखले, महेश पानिग्रही, डॉ. रवींद्र मस्के आदी उपस्थित होते.

तिसऱ्या टप्प्यातील चावी वाटपात 400 झोपडी धारकांना लाभ

मुंबईत 2005 च्या महापुरानंतर मिठी नदी काठच्या झोपडी धारकांच्या घरांचा विषय समोर आला येथील हजारो झोपडी धारकांच्या पुनर्वसनाचा उपक्रम राज्य सरकारने सुरू केला मात्र गेली 15 वर्ष उलटून गेली तरी संदेश नगर आणि क्रांती नगरच्या झोपडी धारकांच्या घराचे स्वप्न पूर्ण होत नव्हते आमदार दिलीप लांडे यांनी निवडून येताच हा मुद्दा लाऊन धरला अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समोर लोकांच्या घराच्या प्रश्नावर आत्मदहनाचा इशारा दिला होता त्यांच्या या प्रयत्नातून मुख्यमंत्र्यांनी तत्काळ कारवाई सुरू केली त्यानंतर 85 कोटी निधी देऊन झोपडी धारकांना चावी वाटपाचा कार्यक्रम सुरू केला. यापूर्वी 3600 लोकांना सदनिकांचे चावी वाटप झाले 400 पैकी 10 ते 15 कुटुंबीयांना आज चावी वाटपाचा तिसरा टप्पा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडला. उर्वरित लोकांना विभागातील कार्यक्रमात सदनिका चावी वाटप करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित होते.

वसई-विरार शहर महानगपालिका

प्रभाग समिती 'अे'

वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अे, बोळींज विरार (प.) ता. वसई. जि. पालघर, पिन ४०२३०३ दुरध्वनी : ०२५०२५५०१०२/२५५१५०१ ईमेल :- amca-vvmc.@gab.in

जा.क्र. वविशम/बो-कर / २४८/२०२४-२५ दि. ०६/०९/२०२४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिनियम ४६७ प्रकरण ३ मधील १ (१) व १ (२) अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणयत्वे नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधकाने हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय बोळींज येथे लेखी स्वरूपात हरकत नोदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून महागरपालिका मध्ये याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र	दिनांक	मालमत्ता क्र.	वार्ड क्र.	मालमत्तेचे ठिकाण	ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे नावे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे नाव किंवा अभिहस्तांन कत्याचे नाव	खदीदाराचे किवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव
१	२६-०८-२०२४	VR१५/५१६ / ११	१५	यशवंत दिप, रूम नं. ए २०४ विवा कॉलेज रोड	सुरेश कदम	राकेश रामचंद्र जुजुम व प्रमिला रामचंद्र जुजुम
२	२६-०८-२०२४	VR१९/११/२	११	मनसानी अपार्टमेंट रूम नं- ३	चितरंजन एम शेट्टी	जुलेखा नझीर साटी
३	२६-०८-२०२४	VR१३/३४/५	१३	रिखील को. ऑप. हो. सो,	निर्मला एम भट	दक्षता दत्ताराम वालम व हर्षद दत्ताराम वालम
४	२६-०८-२०२४	VR२८/७९/१५	२८	संभव दर्शन को. ऑप. हौ. सो, सी-विंग दत्तमंदिर रोड	विनोद जोशी	सविता दत्तात्रेय मोरे व दत्तात्रेय नंदकुमार मोरे
५	२६-०८-२०२४	VR२७ / ४६ / ४०	२७	सत्यम सेंटर सी- २०४ एम. बी. इस्टेट	कमलेश धरमचंद्र जैन	धरती सुरेश प्रजापती व सुरेश जनार्दन प्रजापती
६	२६-०८-२०२४	VR१४ / १२०/१७	१४	अंकुश बिल्डींग, बी-५ श्रीराम नगर जवळ	विशाल बबन कांबळे व अजिंक्य बबन कांबळे	रूपेश रविंद्र ठाकूर व रितल रूपेश ठाकूर
७	२६-०८-२०२४	VR११/५२ / ६७	११	सुखसागर अपार्टमेंन्ट	मनिष सतीश टिळेकर	विमल वसंत जाधव व वसंत रमेश जाधव
८	२६-०८-२०२४	VR१७ /६७५ / २०४०	१७	एक्रोपोलिस सेक्टर ३, बि नं. ३, बि.नं.३ व ४, रूम नं. एम / ५०५	राजश्री राजेंद्र धगे व रोहन राजेंद्र धगे	ऍलेक्स मार्टीन फर्नाडीस व इनासिन मार्टीन फर्नाडीस
९	२६-०८-२०२४	VR१७ / ५१२ / २०३	१७	एव्हेन्यु जे विंग नं. टी-१-३३ रूस्तमजी एव्हरशाईन नारिंगी रोड	पुत्तीलाल सरजुप्रसाद गुप्ता	श्रीमती सुशीला देवी
१०	२६-०८-२०२४	VR१७ /६७५ / ६८४	१७	एक्रोपोलिस सेक्टर ३, बि नं.३, बि.नं.३ व ४, रूम नं.आय / ३०२	पौणिमा सुवर्णा	इसरार अली व आफरीन इसरार अली
११	२६-०८-२०२४	VR१७ /६७५ / ११६४	१७	एक्रोपोलिस सेक्टर ३, बि नं.३, बि.नं.३ व ४, रूम	श्रृजन मोहन रावराणे	रॉबिन कृष्णा विब्धी
१२	२६-०८-२०२४	VR१७ /६७४ / १७१	१७	गार्डन एव्हेन्यु के, बि. ४ विंग के ६, रूम नं. ५०३ ग्लोबलसिटी	विराराम एच देवडा व नावीबेन वि देवडा	अबु बकरी सिद्दिकी व मिनाक्षी वरपत्रा गोहाइ
१३	२६-०८-२०२४	VR१७/६०१ / १९	१७	एव्हेन्यु डी बिल्डींग नं. ३७ रूम नं. ३०४ ग्लोबलसिटी	विनय डेव्हलपर्स	राहील शेख व उमेरा राहील शेख
१४	२६-०८-२०२४	VR१७/६९६ / ७३६	१७	अग्रवाल पॅरामाउन्ट एव्हेन्यु क्यु बि.नं.२ रूम नं.ई / १००३	अमरकांम मिश्रा व कल्पना अमरकांत मिश्रा	लक्ष्मी महादेव कुराडे व महादेव कल्लपा कुराडे
१५	२६-०८-२०२४	VR१७ /६५४ / १८०	१७	विनय युनिक इम्पिरिया, बि.नं.१, एचडीआयएल सेक्टर नं.७	इम्पिरिया बिल्डकॉन एल. एल. पी	आशा शालीकराम यादव
१६	२६-०८-२०२४	VR१७ /६२८ / १९१	१७	अगरवाल सोलिटेयर, बि.नं. २, सेक्टर-२, रूम नं.सी. ९०३	अमित लक्ष्मण मांडवकर	चंद्रकांत नारायण दाभेकर व पुनम चंद्रकांत दाभेकर
१७	२६-०८-२०२४	VR१७/६८२ / १६	१७	महावीर गार्डन, रूम नं. २०४ ग्लोबलसिटी विरार पं. टेलर, निमीशा अ. टेलर	गिरीश आर टेलर, निता गि. टेलर, अशोक रमणलाल टेलर, निमिशा अ. टेलर	जितेंद्र किशोर पांचाळ व योगिनी जि. पांचाळ, हार्दिक जितेंद्र पांचाळ
१८	२६-०८-२०२४	VR१७ /६४२ / ५९	१७	रचना टॉवर, बि.नं. ७ सेक्टर, ए-न.३ ए विंग एच डी आय एल	मेहूल डी जानी	सुरेंद्र सखाराम कोळेकर व महेंद्र सखाराम कोळेकर
१९	२६-०८-२०२४	VR१७ /६७५ / ११५९	१७	एक्रोपोलिस सेक्टर ३, बि.नं. ३, व ४, रूम नं. एन / ९०४	भाविन पटेल	किरण मोहन गोसावी व रेश्मा किरण गोसावी
२०	२६-०८-२०२४	VR१७ / ७१६ / २२३	१७	क्रिस्टोन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि, रूम नं.डी १३०५, एकेन्यु एल -१, रुस्तमजी ग्लोबलसिटी	सचिन गंगाराम मांडवकर	शंकर रामचंद्र मास्कर व शुभांगी शंकर मास्कर

सही/-
(शशिकांत पाटील
प्र. सहा आयुक्त
प्रभाग समिती अे, बोळींज
वसई-विरार शहर महानगरपालिका

जा.क्र. वविशम बोळींज / २४९ / २०२४-२५
दिनांक : ०६/०९/२०२४

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 79
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - ७९
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

गणपती आरती संग्रहाचे प्रकाशन उध्दव ठाकरेंच्या हस्ते संपन्न

मुंबई : नायगांव-वडाळा विधानसभा क्षेत्रातील शिवसेना,युवासेना शाखा क्र. २०१ चे युवाशाखा अधिकारी रोहन सुरेश काळे यांच्या संकल्पनेतून साकारलेला गणपती आरती संग्रह २०२४ चे प्रकाशन शिवसेना पक्षप्रमुख,माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मॉसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून शिवतीर्थावर करण्यात आले. सदर प्रसंगी रश्मीताई ठाकरे, शिवसेना नेते दिवाकर रावते, शिवसेना नेते,सचिव, स्थानिक खासदार अनिलभाऊ देसाई,उपनेते,माजी.महापौर मिलिंद वैद्य, विभागप्रमुख महेश सावंत,महिला विभाग संघटिका,माजी महापौर सौ.श्रध्दा जाधव, सहनिरीक्षक सुरेश गणपत काळे, युवाशाखाधिकारी रोहन सुरेश काळे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

...तर शरद पवार, उद्धव ठाकरे यांची ही शेवटची निवडणूक ठरेल!

प्रतिनिधी

■ मुंबई

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे चालतात आणि देवेंद्र फडणवीस चालत नाही, यावरूनच शरद पवार, उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीचे खरे राजकारण समोर आले असल्याचे म्हणत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पलटवार केला आहे. देवेंद्र फडणवीस चौदा कोटी जनतेच्या मनात आहेत. त्यामुळे देवेंद्रजी आणि भाजप सत्तेत आले तर आपली डाळ शिजणार नाही, आपला जातिवाद चालणार नाही, यामुळेच त्यांना टार्गेट केले जात असल्याचा आरोप बावनकुळे यांनी केला आहे. फडणवीस पुन्हा आले तर शरद पवार, उद्धव ठाकरे यांची ही शेवटची निवडणूक ठरेल, या भीतीतूनच सुप्रिया सुळे असा आरोप करत असल्याचे देखील बावनकुळे यांनी म्हटले आहे.

'शिंदे से बैर नहीं, देवेंद्र तेरी खैर नहीं,' अशी टॅगलाईन देत प्रवक्त्यांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात आक्रमक होण्याच्या सूचना खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली होती. यावरून चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुप्रिया सुळे यांच्यावर पलटवार केला आहे.

चंद्रशेखर बावनकुळे यांचा मविआवर निशाणा

आतापर्यंत जातीवादाचे राजकारण महाविकास आघाडीतील घटक पक्ष करत आले आहे. त्यांना तेच राजकारण बंद पडण्याची भीती असल्यामुळे ते देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट करत असल्याचा आरोप चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

राहुल गांधी यांच्यावरही साधला निशाणा

चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांच्यावर देखील निशाणा साधला. मध्य प्रदेशात कमलनाथ मुख्यमंत्री असताना त्यांनी शिंदवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा तोडला होता, त्याला राहुल गांधी उत्तर देतील का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. पंडित नेहरूंच्या पुस्तकात देखील शिवाजी महाराजांच्या बाबत केलेल्या उल्लेखावर राहुल गांधी का बोलत नाही? असा प्रश्न देखील त्यांनी विचारला. त्यासाठी राहुल गांधी यांनी माफी मागायला हवी होती. राज्य शासनाने महिला भगिनींना सन्मान दिला आहे. म्हणूनच हा खोटारडापणा सुरू असल्याचा आरोप देखील त्यांनी केला. मात्र काँग्रेसचा हा खोटारडेपणा, ही जुनी कॅसेट आता चालणार नाही, अशी टीका देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे.

कमला मिल्स संकुलातील 14 मजली इमारतीला आग

कोणतीही जीवित हानी नाही

प्रतिनिधी

■ मुंबई

लोअर परळच्या कमला मिल्स संकुलामधील टाइम्स टॉवर या 14 मजली इमारतीला शुक्रवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास आग लागली या आगीतल इमारतीच्या चार मजल्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. मात्र, कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

पसेनापती बापट मार्गावरील या इमारतीला आग लागल्याची खबर अग्निशमन दलाला सकाळी सहा वाजून 29 मिनिटांनी मिळाली. ही आग श्रेणी दोनमधील होती, असे मुंबई अग्निशमन दलाकडून सांगण्यात आले. चार- साडेचार तासांच्या अथक प्रयत्नानंतर दुपारी 11 वाजून 54 मिनिटांनी ही आज पूर्णतः विझविण्यात आली. या आगीत कोणीही जखमी झालेले नाही, असे अग्निशमन दलाने स्पष्ट केले.

आग लागलेली टाइम्स टॉवर इमारत भूमिगत मजल्यासह तळमजला अधिक 14 मजल्यांची आहे. हे व्यापारी संकुल असून त्याचे बांधकाम ग्लास फेकेडचे आहे. प्रारंभी सातव्या ते दहाव्या मजल्या दरम्यानच्या वीज तारा आणि विद्युत पॅनलला आग लागली. त्यानंतर सातव्या, आठव्या आणि नवव्या मजल्यावर आगीची व्याप्ती वाढतच गेली. तेथील वीजपुरवठा यंत्रणेबरोबरच फॉल्स सिलिंग, फर्निचर, कार्यालयातील कागदपत्रे आदी साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. इमारतीवर तळ मजल्यापासून दहाव्या मजल्यापर्यंत लावलेलील ॲक्रीलिक शीट खाक झाली.

पालिकेतील लिपिकपदाच्या भरतीतील जाचक अटी विरोधात 'आप'चे आंदोलन

कार्यकर्त्यांसह विद्यार्थ्यांचा आंदोलनात सहभाग

■ मुंबई

मुंबई महापालिकेत कार्यकारी सहायक (लिपिक) पदाची भरती जाचक अटींमुळे वादात सापडली आहे. कार्यकारी सहायक (लिपिक) या संवर्गातील एक हजार ८४६ जागा सरळसेवेने भरली केल्या जाणार आहेत, मात्र या पदासाठी अर्ज भरण्यासाठी उमेदवार बारावी आणि पदवी परीक्षा पहिल्या प्रयत्नात किमान ४५ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेला असावा, अशी अट घालण्यात आली आहे. या अटींमुळे अनेक विद्यार्थ्यांना भरतीपासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे या जाचक अटी रद्द कराव्यात या मागणीसाठी आम आदमी पक्षाने शुक्रवारी पालिकेच्या मुख्य कार्यालयासमोर आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी आपच्या कार्यकर्त्यांसह विद्यार्थी सहभागी झाले होते. शिष्टमंडळाने पालिकेचे सह उपायुक्त यांची भेट घेऊन याबाबत निवेदन सादर केले. पालिकेत 'कार्यकारी सहायक' (लिपिक) ही पदे भरण्याची प्रक्रिया राबवण्यास सुरुवात झाली आहे. या पदांसाठी ९ सप्टेंबरपर्यंत अर्ज करता येणार आहेत. या पदासाठी अर्ज भरण्यासाठी उमेदवार बारावी आणि पदवी परीक्षा पहिल्या प्रयत्नात किमान ४५ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेला असावा, अशी अट घालण्यात आली आहे.

पालिकेच्या लिपिक भरतीमधील पहिल्या प्रयत्नातील अट रद्द

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये लिपिक वर्गीय कर्मचा-यांच्या भरतीसाठी पालिकेने जाहिरात दिली आहे, या पदावर नियुक्तीसाठी अर्जदारांनी शालांत परीक्षा व पदवी परीक्षा पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण झालेले असणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. पण या संदर्भात उपमुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही अट रद्द करण्याचे लेखी निर्देश पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना दिले आहेत.

उद्धव ठाकरेच महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रीपदाचा चेहरा

आदित्य ठाकरे यांनी केले स्पष्ट

प्रतिनिधी

■ मुंबई

आगामी विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण असेल? असा प्रश्न विचारला तेव्हा आदित्य ठाकरे म्हणाले, महायुतीकडे चेहरा कोण आहे? ते जिंकणार तर नाहीच. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा चेहरा घेऊन ते जाणार आहेत का? त्यांचे सरकार आहे, त्यांनी सांगावे. आम्ही आमची भूमिका मांडली आहे. उद्धव ठाकरे हा आमचा चेहरा आहे. त्यांच्यावर लोकांचा विश्वास आहे. लोक त्यांना पालक म्हणून पाहत आहेत. पण महायुतीकडे चेहरा कोण आहे? असा प्रतिप्रश्न त्यांनी उपस्थित केला.आदित्य एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते.

आदित्य ठाकरे म्हणाले, निवडणुकीत विश्वासू चेहरा समोर येतो, जसा आम्ही उद्धव ठाकरे यांचा चेहरा बघतो. प्रत्येकजण त्यांना कुटुंब प्रमुख म्हणून पाहतो. त्यांचे काम पाहिले आहे. शेतकरी असेल, महिला असेल, तरुण असेल एक विश्वास आहे. हा माणूस महाराष्ट्रासाठी दिवसरात्र मेहनत करतो, काम करतो आणि महाराष्ट्राच्या हिताचे काम करेल. तसे महायुतीकडे चेहरा कोण आहे? त्यांच्याकडे उत्तरच नाही. ते योजनेच्या क्रेडिटवरून भांडतात ते आम्हाला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण हे विचारत आहेत, असा टोला देखील आदित्य ठाकरे यांनी महायुतीला लगावला आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले, माझे आजोबांनी भूमिपुत्राच्या मुद्द्यावरून पक्ष उभा केला. तेच भाजप मानत नाही, आमचे हिंदुत्व चूल पेटवणारे, भाजपचे हिंदुत्व घर पेटवणारे आहे. ते आधी हिंदुत्वावर बोलतात. नंतर काहीच नसले तर भारत पाकिस्तानवर येतात. सर्वाधिक अतिरेकी हल्ले भाजपच्या सत्तेतच झाल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन करताना काळजी घ्या, पालिकेचे नागरिकांना आवाहन

प्रतिनिधी

■ मुंबई

मुंबईत गणेश विसर्जनादरम्यान मुंबईतील समुद्रात मोठ्या प्रमाणात गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात येते. गणेश विसर्जनादरम्यान गणेश भक्तांना मत्स्यदंश करू शकणारे अपायकारक मासे हे मत्स्य विभागाने केलेल्या 'ट्रायल नेटिंग' मध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले आहेत, या संदर्भातील माहिती मुंबई शहर जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (महाराष्ट्र शासन) यांच्याकडून कळविण्यात आले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभागाने गिरगाव आणि दादर चौपाटी येथे गणेश भक्तांना मत्स्यदंश करणाऱ्या माशांचे अस्तित्व आहे काय ? यासाठीची चाचपणी (ट्रायल नेटिंग) नुकतीच केली. यादरम्यान ढोमी, कोळंबी, स्टिंग रे (पाकट), जेली फीश, शिंगटी, ब्लू जेली फीश, घोडा मासा, छोटे रावस आदी मासे आढळून आहेत. नेटींग दरम्यान पाकट (स्टिंग रे) हे मासे आढळून आले आहेत. त्यासोबतच माशांसोबतच जेली फीश, ब्लू जेली फीश हे अपायकारक मासे आढळून आले आहेत.

या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभागाद्वारे श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन करताना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विसर्जनादरम्यान घ्यावयाची काळजी

१. श्रीगणेश मूर्ती विसर्जन हे मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नेमणूक केलेल्या जीवरक्षक व संबंधित यंत्रणेमार्फत करावे.
२. श्रीगणेश मूर्ती विसर्जनादरम्यान गणेशभक्तांनी उघड्या अंगाने समुद्रात प्रवेश करणे टाळावे.
३. गणेश विसर्जनादरम्यान पायाला मत्स्यदंश होऊ नये म्हणून गमबुटांचा वापर करावा.
४. पालिका व मुंबई पोलीस दल यांच्याद्वारे विसर्जन ठिकाणी वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.
५. श्रीगणेश मूर्ती विसर्जन ठिकाणी आवश्यक तेथे पालिकेद्वारे प्रथमोपचार करण्यासाठी वैद्यकीय कक्ष असणार आहेत. मत्स्यदंशाची घटना घडल्यास संबंधितांनी तात्काळ प्रथमोपचारासाठी या वैद्यकीय कक्षाशी संपर्क साधावा.

पालिका कामगार व सेवानिवृत्तांना वेतन, निवृत्तीवेतन मिळण्यास होतोय विलंब; कर्मचाऱ्यांमध्ये कमालीचा असंतोष

प्रत्येक महिन्याच्या 1 तारखेला वेतन निवृत्तीवेतन देण्याची युनियनची मागणी

प्रतिनिधी

■ मुंबई

मुंबई महानगपालिकेच्या आस्थापना अनुसूचीवर सुमारे ९० हजार कामगार, कर्मचारी, अधिकारी कार्यरत असून, सुमारे १,१३,००० सेवानिवृत्त कर्मचारी / कुटुंब निवृत्तीवेतन धारक आहेत. त्यांना प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला मासिक वेतन / निवृत्ती वेतन कुटुंब निवृत्तीवेतन दिले जाते, परंतु गेल्या काही महिन्यापासून त्यांचे मासिक वेतन / निवृत्ती वेतन / कुटुंब निवृत्तीवेतन महिन्याच्या १ तारखेला दिले जात नाही. त्यामुळे संबंधित कामगार, कर्मचारी, अधिकारी व निवृत्तीवेतन धारकांमध्ये कमालीचा असंतोष निर्माण झालेला आहे.

विहित दिनांकाला वेतन / निवृत्ती वेतन / कुटुंब निवृत्तीवेतन देणे हे प्रशासनावर बंधनकारक असताना, त्यास बाधा निर्माण होत आहे, ही बाब अतिशय गंभीर आहे. असे दि म्युनिसिपल युनियनचे सरचिटणीस रमाकांत बने यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

बने यांनी ऑगस्ट २०२४ मध्ये चौकशी केली असता, भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्याकडे निर्माण झालेल्या काही तांत्रिक अडचणीमुळे वेतन / निवृत्ती वेतन / कुटुंब निवृत्तीवेतन देण्यास विलंब झाला असून, यापुढे काही अडचण होणार नाही, असे भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्याकडून सांगण्यात आले होते असे कळते, परंतु या महिन्यात देखील कर्मचाऱ्यांचे वेतन/ निवृत्ती वेतन / कुटुंब निवृत्तीवेतनाचे अधिदान विहित वेळेत झालेले नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन, महापालिका कामगार, कर्मचारी, अधिकाऱ्यांना त्याचप्रमाणे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वेतन / निवृत्तीवेतनाचे अधिदान प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला दिले जाईल, या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी अशी मागणी रमाकांत बने यांनी आयुक्तांकडे केली आहे.

मुंबई: मेट्रोमन पद्मविभूषण श्री ई.श्रीधरन यांना कै. जॉर्ज फर्नांडिस यांच्या स्मरणार्थ जय कृष्ण परिसर प्रेमी संस्थेचा 2024 चा अध्यक्ष एल.व्ही. अमीन यांच्या स्मरणार्थ जयकृष्ण शेट्टी यांच्या हस्ते पुरस्कार खासदार कॅप्टन ब्रिजेश छोटा, माजी खासदार गोपाळ शेट्टी यांना प्रदान करण्यात आला.

मुंबई : *जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रामध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने घरगुती गणेश आणि सार्वजनिक गणपती उत्सव मंडळांना आरती संग्रहाचे वाटप करण्यात आले. शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते /युवासेना सरचिटणीस अमोल कीर्तिकर यांच्या शुभ हस्ते गुरूवारी मेघवाडी शिवसेना शाखा क्र.७७ येथे अनावरण करण्यात आले. माजी नगरसेवक अनंत (बाळा) भि. नर यांच्या माध्यमातून विभागातील सर्व घरगुती व सार्वजनिक श्री गणेश उत्सवात आरती संग्रहाचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी विधानसभा संघटक विश्वनाथ सावंत, शाखाप्रमुख नंदकुमार ताम्हणकर, विलास (बाळा) तावडे, ग्राहक संरक्षण कक्षाचे प्रकाश भोसले, शाखासमन्वयक उदय हेगिष्टे आदी पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.*

पालिकेच्या हद्दीतील 32 मीटरपेक्षा कमी उंचीच्या इमारतींचा पुनर्विकास रखडला

मुंबईः बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील ३२ मीटरपेक्षा कमी उंचीच्या इमारतीचे पुनर्विकासाचे सर्व प्रकल्प गेले कित्येक महिने मुंबई अग्निशमन दलाने सुचविलेल्या उपाययोजनाला प्रशासकीय मंजूरी अभावी रखडले असचे समजते. आपण व्यक्तिशः लक्ष घालून अग्निशमन दलाने सुचविलेल्या उपाययोजनासह लवकरात लवकर त्यासंबंधीचे धोरण ठरवून तात्काळ अंमलबजावणी करण्याचे संबंधितांना आदेशीत करावे, अशी विनंती म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशन, मुंबई चे सरचिटणीस इंजि. रमेश भुतेकर-देशमुख यांनी पालिका.आयुक्त भूषण गगराणीयांच्याकडे केली आहे. सदर प्रकरणी आयुक्तांशी सविस्तर चर्चा करण्याची इच्छाही भुतेकर यांनी व्यक्त केली आहे. व चर्चेसाठी वेळ व तारीख कळविण्याची विनंतीही केली आहे.

पश्चिम रेल्वे

साहित्य व्यवस्थापक विभाग

विविध साहित्याचा पुरवठा

ई-प्रापण निविदा सूचना क्र. एस/४८/२०२४ दिनांक ०२.०९.२०२४

अनु. क्र.	बाबीचे संक्षिप्त वर्णन	परिमाण	टी.ओ.डी
६०७	जाइंट लेस ग्रूव्ड कॉपर कॉनटेक्ट वायर १५० चौ.मिमी	१४५ किमी	२८-सप्टें-२४
६०८	प्रायमरी स्पसेनशनकरिता टीपीयू रिंग्ज (हॅपी पॅड) चे संच	१५४० संच	२८-सप्टें-२४
६०९	इंडस्ट्रियल कॉम्प्रेस्ड ऑक्सीजन गॅस	२७३१०१ एम३	३०-सप्टें-२४
६१०	एफओजी सिग्नल (डेटोनल)	४०६८७ नग	०३-ऑक्टो-२४
६११	रब्बर कंपोनंट्सचा संच	१०६८ संच	०४-ऑक्टो-२४

शुद्धीपत्रक

निविदा सूचना क्र.एस-४१-२०२४ दिनांकीत ०२.०८.२०२४ मधील अनु.क्र.४२ मधील रिव्हर्स ऑक्शनचा देय दिनांक १२.०९.२०२४ असा वाचण्यात यावा.

ईरठे, खरेदी, बंधने आणि तपशीलवार निविदा संदर्भात कृपया तपशीलवार निविदा सूचना www.ireps.gov.in आणि wr.indianrailways.gov.in कृपया संकेत स्थळावर पहा. 0501

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा : x.com/WesternRly

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

नवी मुंबई, वाशी एफ-३/रेनबो अपार्टमेंट, सेक्टर १० वाशी, नवी मुंबई – ४०० ७०३
दूर: ०२२ २७६६५३५१/ २७६६३०२८/ २७६५७३२५
ई-मेल : vjvash@bankofbaroda.co.in

जप्ती सूचना

दिनांक : २६.०८.२०२४

प्रती,
श्री. एमडी वासिम, एमडी क्मरूल प्रभाग क्र. १० नरसाना दरभंगा एअरटेल टॉवर, दरभंगा बिहार ८४६००३
प्रती महोदय

विषय : वाहन कर्ज ए/सी क्र._८९७६०६००००१५७६_ऑफ_एमडी वासिम (१ ली सूचना)

कर्ज संमती दिनांक : १४-१२-२०२१	**कर्ज रक्कम:** ६,५०,०००/-
थकीत रक्कम: रु. ५२२,९६५/-	**वाहन नोंदणी क्र.** एमएच४३सीएच४११८
मॉडेल नाव: मारुती सुझुकी बलेनो सिग्मा	**इंजिन क्र.:** के१२एनपी७२०८४५५
च्यासीस क्र: एमबीएचएचडब्ल्यूबी१३एसपीए३६३३१	**संपर्क क्र.** ७५६२०७७३५५

आम्ही अनेकदा फोनद्वारे संपर्क करून तसेच पत्र दिनांकित ०८.०८.२०२४ (थकबाकी सूचना) पाठवून देखील तुम्ही तुमच्या खात्यामध्ये असलेली एकूण देणी आजच्या दिनांक २६.०८.२०२४ अनुसार रु. ५६,०००/- आहे. अखेरची रक्कम रु. १४,७०५/- २९.०६.२०२४ रोजी जमा करण्यात आल्या नंतर कर्ज खात्यामध्ये कोणत्याही रकमेचा भरणा करण्यात आलेला नाही.
तुम्ही बँकेची देणी भरण्यामध्ये कसूर केली असल्याने तुमच्या खात्याची ०८.०८.२०२४ रोजी एनपीए करण्यात आले आहे आणि त्यानुसार बँकेने आता नमूद वाहन खरेदी करीता घेतलेले कर्ज रिपझेस (इमपाउंड) करण्याचा निर्णय घेतला आहे.
बँक मेसर्स साइझिंग टेक्नॉलॉजी प्रा. लि. परत ताब्यात/विक्रीसाठी बँकेचे अधिकृत रिकव्हरी एजंट म्हणून काम करत आहे.
तुम्हाला विनंती करण्यात आली आहे की तुम्ही उक्त रिकव्हरी एजंटला सहकार्य करा आणि सर्व स्विच की आणि इतर उपकरणे, नोंदणी प्रमाणपत्रे, विमा पॉलिसी किंवा पॉलिसींसह वाहनाचा ताबा द्या, जेणेकरून बँकेला ते कोणत्याही प्रकारे विकता किंवा विल्हेवाट लावता येईल. कर्ज खात्यातील देय रकमेची वसुली करण्याच्या उद्देशाने योग्य वाटते. कृपया हे देखील लक्षात घ्या की वाहनाच्या विक्रीच्या तारखेपर्यंत आणि गॅरेजचे पार्किंग शुल्क, जर असेल तर, ताब्यात घेण्याचे शुल्क आकारले जाईल आणि तुमच्या कर्ज खात्यातून वसूल केले जाईल.

आपला विश्वासू
प्राधिकृत अधिकारी

कार्गोसोल लॉजिस्टिक्स लिमिटेड

सीआयएन: एल६३०००एमएच२०११पीएलसी२१४३८०
नोंद. कार्यालय: युनिट क्र. ३१९, ३२०, ३ रा मजला, लोढा सुप्रीमस, महाकाली केव्हज रोड, बिन्द्राज हॉटेल जवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००६९
दूर: + ९१ २२ ६६१२ ६००० ई-मेल : care@cargosol.com;
संकेतस्थळ: https://cargosol.com/

कंपनीच्या सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेकडे लक्ष देण्यासाठी सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("व्हिसी") / आदर ऑडिओ-व्हिज्युअल मिन्सद्वारे ("ओएव्हीएम") सोमवार, ३० सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता भाप्रवे कंपनी कायदा, २०१३ च्या सर्व लागू तरतुदी आणि त्याखाली बनवलेले नियम आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ ("सेबी") (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स आणि डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ (सेबी लिस्टिंग रेग्युलेशन) आणि एमसीए परिपत्रक ०५ मे, २०२२ परिपत्रकांसह वाचल्या जाणाऱ्या ०८ एप्रिल २०२०, १३ एप्रिल २०२०, ०५ मे, २०२०, २८ सप्टेंबर, २०२०, ३१ डिसेंबर, २०२० आणि १३ जानेवारी, २०२१ (एजी नोटीसमध्ये नमूद केलेल्या व्यवसायाचा व्यवहार करण्यासाठी आयोजित करण्यात येईल. एजीएमचे ठिकाण कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय असेल.

आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या वार्षिक अहवालासह एजीएम बोलावणारी सूचना ०६ सप्टेंबर २०२४ रोजी ज्या सदस्यांच्या ई-मेल आयडी डिपॉझिटरी सहभागी ("डीपी")/कंपनी/रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट म्हणजेच लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ("आरटीए") नोंदणीकृत आहे त्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आली आहे.. सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइटवर https://cargosol.com/ आणि www.bseindia.com वर देखील उपलब्ध आहेत त्याशिवाय ही सूचना लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (रिमोट ई प्रदान करणारी एजन्सी) च्या वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे. - मतदान सुविधा आणि एजीएम दरम्यान ई-व्होटिंग) www.instavote.linkintime.co.in वर. नोटीसमध्ये नमूद केलेली सर्व कागदपत्रे नोटीस पाठवल्याच्या तारखेपासून सोमवार, ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने तपासणीसाठी उपलब्ध आहेत. अशा दस्तऐवजांची तपासणी करू इच्छिणाऱ्या सदस्यांनी care@cargosol.com वर कंपनीला लिहावे.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९१ नुसार कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ नुसार, कंपनीचे सदस्य नोंदणी आणि शेअर हस्तांतरण पुस्तके मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४ ते सोमवार, ३० सप्टेंबर २०२४ (दोन्ही) बंद राहतील दिवसांचा समावेश) कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या उद्देशाने.

सोमवार, २३ सप्टेंबर २०२४ च्या कट-ऑफ तारखेनुसार डीमटेरियल फॉर्ममध्ये शेअर्स धारण केलेले सदस्य, एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार, एखाद्या ठिकाणाहून लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे व्यवसायावर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांचे मत देऊ शकतात. एजीएमच्या ठिकाणाव्यतिरिक्त (रिमोट ई-व्होटिंग). कायद्याच्या कलम १०८, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २०, सेबीच्या नियमावलीच्या सचिवीय मानके आणि नियमन ४४ च्या तरतुदींचे पालन करून, येथे व्यवहार केल्या जाणाऱ्या व्यवसायाच्या संदर्भात ई-व्होटिंगची सुविधा आहे. एजीएम कंपनीद्वारे लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडद्वारे प्रदान केली जात आहे.

रिमोट ई-व्होटिंग शुक्रवार, २७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ०९.०० वा. (भापर्व) सुरू होईल आणि रविवार, २९ सप्टेंबर २०२४ रोजी सायं ०५.०० वा. (भापर्व) समाप्त होईल. त्यानंतर रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल अकार्यक्षम केले जाईल. सभासदाने ठरावावर एकदा मत दिले की, नंतर त्यात बदल करण्याची परवानगी सदस्याला दिली जाणार नाही.

एजीएमपूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केलेले सदस्य व्हिसी/ओएव्हीएम द्वारे एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात/भाग घेऊ शकतात परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार नाही.

जे सदस्य व्हिसी/ओएव्हीएम द्वारे एजीएममध्ये उपस्थित आहेत आणि रिमोट ई-व्होटिंगद्वारे ठरावांवर मत दिलेले नाहीत ते एजीएम दरम्यान ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्यास पात्र असतील. एजीएम दरम्यान ई-वोटिंगसाठी तपशीलवार प्रक्रिया आणि सूचना नोटिसमध्ये नमूद केल्या आहेत.

कोणतीही व्यक्ती, जी कंपनीचे शेअर्स घेते आणि एजीएमची सूचना पाठवल्यानंतर आणि कट-ऑफ तारखेला म्हणजेच सोमवार, २३ सप्टेंबर २०२४ रोजी शेअर्स धारण केल्यानंतर कंपनीचा सदस्य बनते, ती लॉगिन आयडी आणि पासवर्ड पाठवून मिळवू शकते. instameet@linkintime.co.in वर विनंती करा. तथापि, जर एखादी व्यक्ती आधीच नोंदणीकृत असेल तर विद्यमान वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मतदानासाठी वापरला जाऊ शकतो.

ज्या सदस्यांचे ई-मेल आयडी (डीपी/कंपनी/आरटीए) मध्ये नोंदणीकृत नाहीत अशा सदस्यांसह सर्व सदस्यांसाठी एजीएम दरम्यान रिमोट ई-व्होटिंग किंवा ई-व्होटिंगद्वारे मत देण्याची तपशीलवार प्रक्रिया आणि सूचना नोटिसमध्ये नमूद केल्या आहेत.

ही जाहिरात कंपनीच्या https://cargosol.com/ या वेबसाइटवर आणि स्टॉक एक्सचेंजच्या www.bseindia.com या संकेतस्थळांवर देखील उपलब्ध असेल.

संचालक मंडळाच्या आदेशांद्वारे
कार्गोसोल लॉजिस्टिक्स लिमिटेड करीता
सही/-
रोशन रोहीरा
व्यवस्थापकीय संचालक

दिनांक: ०७ सप्टेंबर ०२४
ठिकाण: मुंबई

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड

सीआयएन: एल२७१००एमएच१९८५पीएलसी०३५२६८
२८/३०, अनंत वाडी, बिनानी भवन, तळ मजला, भूलेश्वर, मुंबई ४००००२
संपर्क: + ९१ २२ ०१४००१ फॅक्स: + ९१ २२ ०१४००३
ई-मेल : spvglobaltrading@gmail.com संकेतस्थळ: www. spvglobal.in

कंपनीच्या सभासदांनी 39 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेकडे लक्ष देण्यासाठी सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनीची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") सोमवार, ३० सप्टेंबर २०२४ रोजी दु. १२.३० वा. भाप्रवे २८/३०, अनंत वाडी भुलेश्वर, मुंबई-४००००२ येथे स्थित कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात आयोजित केली जाईल. आर्थिक वर्ष २०२३-२४ चा एकात्मिक वार्षिक अहवाल सभा बोलावण्याच्या सूचनेसह सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पोस्ट/ कुरियरद्वारे आणि इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ज्या सभासदांनी त्यांचा ई-मेल आयडीची डिपॉझिटरीज/ कंपनीकडे नोंद केली आहे त्यांना पाठविण्यात आली आहे.

वार्षिक अहवाल कंपनीच्या www.spvglobal.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे आणि सभेच्या दिनांका पर्यंतच्या सर्व कामकाजाच्या दिवसांमध्ये कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात तपासणीसाठी उपलब्ध आहे. कंपनी आपल्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ("ई-व्होटिंग") सभेत प्रस्तावित केलेल्या ठरावांवर मतदानाचा हक्क बजावण्याची सुविधा देत आहे. सभासद सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली वापरून त्यांचे मत देऊ शकतात ("रिमोट ई-व्होटिंग"). कंपनीने ई-मतदान सुविधा प्रदान करण्यासाठी एजन्सी म्हणून नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) च्या सेवांचा सहभाग घेतला आहे.

रिमोट ई-वोटिंगशी संबंधित इतर गोष्टींसह युजर आयडी आणि पासवर्ड असलेले संप्रेषण सभा बोलावण्याच्या सूचनेची प्रत सदस्यांना पाठवण्यात आली आहे. बैठकीची सूचना आणि ई-मतदानासाठी संवादाचे स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ: www.spvglobal.in आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) https://www.evoting.nsdl.com/ वर उपलब्ध आहे.

रिमोट ई-व्होटिंग शुक्रवार, २७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजता (भाप्रवे) सुरू होईल आणि रविवार, २९ सप्टेंबर, २०२४ रोजी सायं ०५.०० (भाप्रवे) वाजता संपेल. त्यानंतर रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल अकार्यक्षम करण्यात. सभासदाने ठरावावर एकदा मतदान केल्यानंतर, त्यांना त्यामध्ये बदल करण्याची परवानगी सभासदाला दिली जाणार नाही.

एखादी व्यक्ती, ज्याचे नाव सदस्य/ लाभार्थी मालकांच्या नोंदणीमध्ये कट-ऑफ दिनांकाला, म्हणजे सोमवार, २३ सप्टेंबर २०२४, केवळ सभेत रिमोट ई-व्होटिंग/ मतदानाच्या सुविधेचा वापर करण्यास पात्र असेल.

सभेची सूचना पाठवल्यानंतर आणि कट-ऑफ दिनांकानुसार कंपनीचे भाग धारण करणारी कोणीही व्यक्ती evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवून इतर गोष्टींसह युजर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. कंपनीचे संकेतस्थळ, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या बैठकीच्या सूचनेमध्ये युजर आयडी आणि पासवर्ड मिळविण्याची तपशीलवार प्रक्रिया देखील नमूद करण्यात आली आहे. जर सभासद ई-व्होटिंगसाठी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) मध्ये पूर्वीपासूनच नोंदणीकृत असेल, तर तो रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्यासाठी त्याचा विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड वापर करता येईल. सभासदांचे मतदान हक्क कट ऑफ दिनांकानुसार कंपनीच्या भरणा केलेल्या समभाग भांडवलामधील त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणाते असतील. ज्या सभासदांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे आपले मतदान केले आहेत ते देखील सभेला उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना त्यांचे मतदान करण्याचा पुन्हा देण्याचा अधिकार असणार नाही आणि सभेला उपस्थित राहणारे सभासद ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे त्यांचे मतदान केलेले नाही त्यांना सभेत मतदान करता येईल.

बुक क्लोझर दिनांक:

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने कंपन्या (प्रशासन आणि व्यवस्थापन) नियमावली, २००२ सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा २०१३ च्या कलम ९१ अनुषंगाने कंपनीच्या सभासदांची नोंदवही आणि भाग हस्तांतरण नोंदवही मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४ ते सोमवार ३० सप्टेंबर २०२४ (दोन्ही दिवस धरून) बंद ठेवण्यात येईल.

सभासदांना जर असल्यास समस्या/ तक्रारीकरीता खालील संपर्क तपशिलावर संपर्क करता येईल ह्याची कृपया नोंद घ्यावी:

काही शंका असल्यास, तुम्ही www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध शेअरधारकांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ) आणि शेअरधारकांसाठी ई-व्होटिंग वापरकर्ता पुस्तिका पाहू शकता किंवा टोल फ्री क्रमांक: १८००-२२२-९९० वर कॉल करू शकता. किंवा evoting@nsdl.co.in वर विनंतीचे मेल पाठवती येईल.

सभेच्या समाप्तीपासून अठ्ठेचाळीस तासांनंतर निकाल घोषित केले जातील. स्क्रूटिनायझरच्या अहवालासह घोषित केलेले निकाल कंपनीच्या www.spvglobal.in या वेबसाइटवर आणि निकाल जाहीर झाल्यानंतर लगेचच https://www.evoting.nsdl.com/ या वेबसाइटवर टाकले जातील आणि त्याचवेळी पुढे पाठवले जातील. बीएसई लिमिटेडकडे, जेथे कंपनीचे इक्विटी शेअर्स सूचीबद्ध आहेत आणि कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात प्रदर्शित केले जातील.

संचालक मंडळाच्या आदेशांद्वारे
एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड करीता
सही/-
बाळकृष्ण बिनानी
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ००१७५०८०

दिनांक: ०७ सप्टेंबर ०२४
ठिकाण: मुंबई

कोणतेही कार्य अडथळ्यावाचून पार पडत नाही. शेवटपर्यंत जे प्रयत्न करत राहतात त्यांनाच यश प्राप्त होते.

- स्वामी विवेकानंद

वृत्तमानस
मुंबई, शनिवार, ७ सप्टेंबर २०२४

शिक्षणाची गाडी धडाडू द्या

या देशाला मंदिर, मस्जिद, गुरुद्वार, चर्च यांसारख्या धार्मिक प्रार्थना स्थळांऐवजी शाळा महाविद्यालयांची जास्त गरज आहे. या मताशी या देशातील अनेक बुद्धिवंत आणि देश प्रेमी नागरिक सहमत असतील. कारण पढेगा भारत तो बढेगा भारत. शिक्षण याशिवाय उद्धार होणे नाही. हे भारताने जगाला दाखवून दिले आहे. कारण जो भारत पारतंत्र्याच्या काळात मोठ्या प्रमाणात अशिक्षित होता शिक्षणाचे दारे महिला मागासवर्गीयांसाठी खुली नव्हती, त्या काळात देशाच्या विकासाला जणू ब्रेक लागलेला होता. मात्र देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने लोकशाही संविधानाचा स्वीकार केला त्यानंतर या देशाची शैक्षणिक गाडी गतीला आली. महिला आणि मागासवर्गीय यांना शिक्षणाचे दारी खुली झाल्यामुळे या वर्गामध्ये सुद्धा शिक्षणाची गंगा पोहोचली. परिणामी आजच्या महिला देखील शिकून देशाच्या सर्वोच्च स्थानी विराजमान झाल्या आहेत. देशासाठी शिक्षणाची वाट देशाला पुढे घेऊन जाणारी ठरत आहे. असे असले तरी गेल्या काही वर्षांपासून शिक्षणाच्या गाडी समोर काही गतिरोधक येऊ लागले आहेत. शाळाबाह्य मुलांचा प्रश्न हा गेल्या काही वर्षांत प्रकर्षाने जाणवत आहे. कोविडकाळापासून यामध्ये वाढ झाली असून, ती कमी करणे हे सरकारपुढे आव्हानात्मक काम आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत देशभरातील सुमारे २ कोटी शाळाबाह्य मुले मुख्य प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट असले तरी त्याला कितपत यश मिळणार, याबाबत कोणालाच खात्री नाही. शिक्षण हे उपजीविकेचे साधन तर आहेच; पण शिक्षणाने माणसाला आत्मसन्मान, आत्मविश्वास आणि स्वविकासाच्या संधी मिळवून द्याव्यात; विचार करणारा, सुसंस्कृत, संवेदनशील, जबाबदार तसेच लोकशाही आणि मानवतेची मूल्ये मानणारा नागरिक तयार व्हावा, अशा अपेक्षासुद्धा आपण करायला हव्यात. योग्य पद्धतीने आणि सर्वांगाने प्रत्येक नागरिकाला स्वविकास साधण्याची संधी मिळाली तर सुदृढ समाजाची वीण घट्ट होण्यासाठी मदत होते. त्यामुळे समाजाचा समतोल विकास साधायचा असला तर प्रत्येकाला दर्जेदार शिक्षण मिळणे अपरिहार्य ठरते. काहींना शिक्षण मिळाले नाही तर समाजाची aण विसविशीत राहू शकते. काही उच्चशिक्षित तर काही अशिक्षित, असे चालत नाही. त्यासाठी प्रत्येकाला कोणत्याही अडथळ्याशिवाय शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात प्रवेश मिळणे व त्याने शिक्षण पूर्ण करणे आणि त्यासाठी आवश्यक त्या संधी, साधने व सुविधांची उपलब्धता असणे आवश्यक ठरते. बारा वर्ष वयापर्यंत सर्वांना सक्तीचे शिक्षण देण्याची मागणी महात्मा जोतीराव फुले यांनी १८९२ साली केली होती. परंतु देशाच्या आर्थिक परिस्थितीमुळे १९५० साली लागू झालेल्या आपल्या संविधानातसुद्धा नागरिकांच्या मूलभूत हक्कांमध्ये मोफत शिक्षणाच्या हक्काचा समावेश झाला नव्हता. पुढे १९९३ साली सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचा निवाडा दिला की, संविधानाने दिलेल्या जगण्याच्या मूलभूत हक्कात शिक्षणाचा हक् सामावलेला आहे. या निकालानंतर सहा ते चौदा वर्ष वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षणाचा हक्क देणारा कायदा मंजूर व्हायला तब्बल सोळा वर्षे लागली. तो कायदा मंजूर झाल्यावरसुद्धा शून्य ते सहा वर्षांची मुले या हक्कापासून वंचित राहिली. आता राज्यात साक्षरतेचे प्रमाण खूप वाढलेले असले तरी अजूनही असंख्य मुले कायमची शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाबाहेर राहिली आहेत. जवळपास निम्मी मुले बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण न करता प्रवाहाबाहेर पडतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नमूद केले आहे की, देशातील शाळाबाह्य मुलांची संख्या ३.२२ कोटी आहे. प्रत्यक्षात ती संख्या किती तरी जास्त आहे. शाळाबाह्य मुलांचे प्रमाण खरोखरच चिंता करण्याजोगे आहे. आणखी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाल्यामुळे साधारणपणे १९८०-८५ पासून शिक्षणाच्या दर्जाची घसरण सुरू झाली. काही अंशी तसे होणे स्वाभाविक असते. परंतु त्यावर डोळसपणे उपाययोजना कराव्या लागतात. त्या केल्या गेल्या नाहीत. उलट शिक्षणाचे सुमारीकरण आणि सपाटीकरण व्हायला सुरुवात झाली. पुढे देशाने जागतिकीकरण, खासगीकरण आणि उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर दर्जाची घसरण वाढत्या वेगाने होऊ लागली. खरे म्हणजे शिक्षणाची जबाबदारी सरकारने नाकारली आहे, हे सर्वात महत्त्वाचे कारण ठरते. प्राधान्यक्रमात सर्वात वर असायला हवेत असे शिक्षण आणि आरोग्य हे दोन विषय सरकार दरबारी सर्वात तळाला आहेत. कायद्याचे पालनही सरकार व प्राधिकरणे करीत नाहीत. आवश्यक ती व्यवस्था आणि पक्की यंत्रणा उभी करून ठोस पावले उचलायला हवीत, पण सरकार तेही काही करीत नाही. या बाबतीत अधूनमधून दोन-चार शोधमोहिमा काढल्या जातात, पण त्यातून काही निष्पन्न होत नाही. ती केवळ धूळफेक ठरते. जागतिकीकरण, खासगीकरण व उदारीकरण स्वीकारल्यापासून तर सरकारने आपली शिक्षणाची जबाबदारी जवळपास नाकारली आहे. राज्यात शाळाबाह्य मुलामुलींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण हक्क कायदा (आरटीई) समग्र शिक्षण योजना, बेटी बचाओ बेटी बढाओ व माध्यान्ह भोजन यांसारख्या विविध योजना राबविल्या जात आहेत. तथापि, प्रत्यक्षात हजारो मुले-मुली औपचारिक शिक्षण प्रवाहातून बाहेर असल्याचे चित्र समोर आले आहे. राज्यात हजारो बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणल्याचा दावा सरकारने केला असला, तरी शाळाबाह्य मुलांची संख्या मोठी असल्याचे कटू वास्तव आहे. शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी मार्च २०२१ आणि त्यापूर्वीही सर्वेक्षण करण्यात आले होते. मात्र त्यातून शाळाबाह्य असलेले सर्व विद्यार्थी शिक्षण प्रवाहात दाखल झाले नाहीत. कामाच्या शोधासाठी कुटुंब स्थलांतरित होते. त्यात मुलांची मात्र फरफट होते. वाढत्या स्थलांतरामुळे शाळाबाह्य मुलांचे, विशेषतः मुलींचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अपंग मुलांसमोरील आव्हाने वाढत आहेत. अजूनही बाजारपेठ, वीटभट्ट्या, दगडखाणी, मागास, वंचित, अल्पसंख्याक गटातील वस्त्या, खेडी, वाड्या, शेतमळे अशा विविध ठिकाणी शाळाबाह्य मुले आढळून येतात. त्यांचा नियोजनपूर्वक शोध घेतला जात नाही, असा आक्षेप नेहमीच घेतला जातो. त्याकडेदेखील गांभीर्याने पाहिले जात नाही. अनेक गावांमध्ये माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांची सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांना त्यांचे पालक इतर गावांमध्ये पाठवण्यास तयार नसतात. त्यात बहुतांश मुलींना शिक्षण अर्धवट स्थितीत सोडून द्यावे लागते. हे विद्यार्थी शाळेत जाण्यासाठी उत्सुक असले तरी कौटुंबिक कारणांमुळे ते शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर फेकले जातात. अनेक मुले मजुरी, नोकरी करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावताना दिसतात. अनेक मुलींचे अल्प वयात विवाह उरकले जातात. शिक्षणाअभावी अल्प वयात लग्न झाल्याने मुलींच्या आरोग्याच्या समस्या उद्भवतात. आदिवासी आणि डोंगराळ भागात हा प्रश्न गंभीर बनला आहे. अल्प वयात लग्न झाल्याने कुपोषणाची समस्या निर्माण होते. प्रश्न केवळ शाळाबाह्य मुलांची मोजदाद करण्याचा नाही तर ती मुले शाळेत येतील, तेथे टिकतील आणि सर्वच मुले खऱ्या अर्थाने शिकती होतील, हे पाहण्याचा आहे. राज्य सरकारने तीन ते अठरा वयोगटातील शाळाबाह्य व स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात दाखल करण्यासाठी 'मिशन झीरो ड्रॉपआऊट' या नावाने मोहीम राबवली. या मोहिमेला पूर्ण यश आले नसले तरी त्यात सातत्य ठेवणे आवश्यक आहे. मुलांना शाळाबाह्य होऊ न देण्याची जबाबदारी सरकारची आणि स्थानिक प्रधिकरणांची आहे, याबाबत दुमत असू नये. ती जबाबदारी पार पाडायला त्यांना भाग पाडणे, हे आपले काम आहे. या विषयात आस्था असणाऱ्या प्रत्येकाने स्थानिक प्राधिकरणांना अभिलेख ठेवायला प्रवृत्त करण्यासाठी आणि भाग पाडण्यासाठी प्रयत्न करायला हवेत अन्यथा ही समस्या भविष्यात त्रासदायक ठरू शकते.

गणपती बाप्पा मोरया... मंगलमुर्ती मोरया...

बंधू भगिनींनो,

विघ्नविनाशक श्रीगणरायाचे आज आगमन होताहे. श्रीगणेश चतुर्थी हा हिंदूंचा मोठा सण असून,गणपती हे प्रत्येकाचं आराध्य दैवत आहे.मानवी जीवनाच्या प्रत्येक वळणावर म्हणजे सुख-दुःखात,संकट समयी व अडीनडीला तो आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा असतो. गणेशोत्सव असा सण आहे,ज्यात लहानांपासून वृद्धांपर्यंत प्रत्येक जण हर्षोल्हासाने अन् भक्तिभावाने सहभागी होतो.त्याच्या पूजनामुळे शुभ कार्यात येणारी विघ्ने दूर होतात.विनायक, वक्रतुंड,विघ्नेश्वर,विघ्नहर्ता,गुणपती, लंबोदर अशा नावांनी देखील गणरायांना संबोधिले जाते. हिंदू धर्मात कुठल्याही गोष्टीचा शुभारंभ श्रीगणेशाच्या पूजेने केला जातो.म्हणूनच त्याला आराध्य दैवत म्हटले जाते.गणपती हे केवळ विद्येची देवता नसून,ती समृद्धीची देखील देवता आहे.यासाठीच त्यांच्या दोन्ही बाजूला रिद्धी-सिद्धी उभ्या असतात. त्याबरोबरच ते गुणसंवर्धनाचे मूर्तिमंत प्रतिकही आहे.वक्रतुंड महाकाय,सूर्यकोटी समप्रभ,निर्विघ्नं कुरुमे देव,सर्व कार्येषु सर्वदा अशी तन्मयतेने प्रार्थना करून आपला संकल्प निर्विघ्नपणे सिद्धीस नेण्यासाठी आपण साकडे घालतो.खरं तर,सद्बुद्धी शिवाय सिद्धी प्राप्त होत नाही आणि हीच सदबुद्धी देण्याचं काम गणराया करत असतो.गणपती म्हणजे ते अनेक गुणांचे संवर्धन करणारा गुणपती असेही म्हटले जाते.चौदा विद्या अन् चौसष्ट कलांची पुंजी ज्यांच्याकडे आहे,त्यांची आराधना आपण करतो व त्या कला,ते गुण आम्हाला द्या,अशी प्रार्थना आपण करतो.

भक्तांच्या हाकेला गणपती धावून येतात,याची अनुभूती अनेकांना आली असेलच.कारण लालबागेचा गणपती

असो वा सिद्धी विनायक,तेथील भक्तांच्या रांगा आणि तिथे बोलले जाणारे नवस हे त्याचे द्योतक आहे.तात्पर्य,हा उत्सव शिस्तबद्धता,सामाजिक सौख्य राखून सहिष्णुता व गुण्यागोविंदाने संपन्न व्हावा,हीच श्रींची इच्छा असते. त्यातूनच अखिल मानवजात सुखी,आनंदी व समृद्ध होईल,हे निश्चित! पारतंत्र्याच्या काळात विभिन्न जाती-धर्मातील लोकांना एकसंध करून ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढा देण्यासाठी लोकमान्य टिळकांनी १८९३ साली गणेशोत्सव हा सार्वजनिकरित्या साजरा करण्याचा संकल्प सोडला. त्यामागे लोकशिक्षण अन् जनजागृती ही दोन उद्दिष्टे साधण्याचा त्यांचा मानस होता.तथापि,स्वातंत्र्यानंतर काळ हा जरी आमूलाग्र बदलला असला तरी,टिळकांच्या संकल्पनेतून गणेशोत्सव साजरा व्हावा,या दृष्टीने भाविकांनी काही पथ्ये पाळावीत.सर्वप्रथम तुम्ही आम्ही सर्वांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा प्रण करावा.त्यानुसार इको फ्रेंडली स्वरूपाच्या गणेशमूर्ती असाव्यात.अर्थातच गणेश मुर्त्या ह्या शाडूच्या मातीच्या असाव्यात.दुसरं महत्वाचे म्हणजे या उत्सवादरम्यान ध्वनीप्रदूषण होऊ नये,यासाठी कानठळ्या बसविणाऱ्या डॉल्बी-डी जे सारख्या वाद्यांचा वापर कटाक्षाने टाळावा.त्याऐवजी पारंपरिक पद्धतीच्या ढोल-ताशांचा वापर करावा.वायूप्रदूषण होऊ नये,म्हणून गुलाल व अन्य रंगांची उधळण मर्यादित प्रमाणात करावी.प्रत्येकाने आपापले निर्माल्य मंगलकलशातच टाकावे.

गणेशोत्सवदरम्यान गणेश मंडळे अन् गणेश भक्तांनी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणेला सहकार्य करावे.वर्गणी अन् दानपेटीत जमा होणाऱ्या धनराशीतून काही रक्कम सामाजिक उपक्रमांसाठी राखून ठेवावी.याशिवाय आपापल्या वॉर्डातील गोरगरीब व असहाय्य कुटुंबातील गरजू अन् होतकरू पाल्यांच्या शिक्षणासाठी हा संचित निधी खर्ची घालावा.असं केल्याने हा पैसा सत्कर्मी लागेल.रिमिक्स संस्कृती, लखलखित रोषणाई, अतिभव्य देखावे,डी.जे.अन् त्यातील भंकस व किळसवाणी नाच-गाणी या असभ्य अन् अनावश्यक गोष्टींना गणेश मंडळांनी थारा देऊ नये.गणेशोत्सव साजरा करताना त्याचं पावित्र्य टिकवून ठेवणं,हे प्रत्येकाचे उत्तरदायित्व आहे.बोला,गणपती बाप्पा मोरया...मंगलमुर्ती मोरया...!

- रणवीर राजपूत, ठाणे

आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक

१८५७ साली झालेला उठाव हा भारतीय इतिहासातील इंग्रजांविरोधात झालेला पहिला उठाव आहे असे मानले जाते मात्र त्या अगोदरही इंग्रजांना भारतातून हाकलून देण्यासाठी अनेक छोटेमोठे उठाव झाले मात्र त्यातील काही उठावांची नोंद इतिहासात घेण्यात आली तर काही काही उठावांची नोंदच झाली नाही. अशाच एका उठावाचे जनक ज्यांनी इंग्रजांना सलग १४ वर्ष पळता भुई केली त्या आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांची आज जयंती. मात्र आज त्यांची जयंती असूनही त्यांची जयंती साजरी करावी असे कोणालाही वाटत नाही कारण ते ज्या समाजात जन्मले तो रामोशी बेडर समाज आजही उपेक्षितच आहे त्यामुळे इतका मोठा क्रांतिकारक भारताच्या इतिहासात होऊन गेला हे आजही अनेकांना माहीत नाही. आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांचा जन्म आजच्याच दिवशी ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिवडी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचे नाव दादोजी खोमणे होते. त्यांचे कुटुंबीय पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत असे म्हणून त्यांना नाईक ही पदवी मिळाली पुढे ते नाईक याच नावानेच ओळखले जाऊ लागले. लहानपणापासून काटक, चंचल आणि शूर असणारे निधड्या छातीचे उमाजी नाईक यांना गुलामगिरीची चीड होते. १८३० साली इंग्रजांनी पुण्यात दुसऱ्या बाजीरावास स्थानापन्न केले तेंव्हा त्याने पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी रामोशी बेडर समाजाकडून काढून घेतली



आणि स्वतःच्या मर्जीतील लोकांना ती जबाबदारी दिली त्यामुळे साहजिकच रामोशी समाज खवळला त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली जबाबदारी अशी अचानक काढून घेतल्याने उमाजी नाईक कमालीचे संतप्त झाले शिवरायांपासूनच स्फूर्ती घेऊन त्यांनी आपल्या काही साथीदारांसह इंग्रजांना भारतातून हाकलून देण्याची शपथ घेतली. उमाजी नाईक समाजातील गोरगरिबांना आर्थिक मदत करत त्यासाठी ते इंग्रज, सावकार आणि मोठ्या वतनदारांना लुटत. जर कोणी माता भगिनींवर अन्याय करत असत तर ते भावाप्रमाणे धावून जात असत. या दरम्यान त्यांना एकदा अटक झाली त्यांना एका वर्षाची शिक्षा झाली. या एका वर्षात ते तुरुंगातच लिहायला शिकले. एका वर्षाची शिक्षा भोगून आल्यावर त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानून त्यांनी इंग्रजांविरुद्ध लपून छपून लढाया केल्या. उमाजी नाईक यांच्या या गनिमीकाव्याने इंग्रज मेटाकुटीला आले. इंग्रज अधिकारी उमजींना पकडण्यासाठी जंग जंग पछाडत होते मात्र उमाजी त्यांच्या हातावर तुरी देत होते. एकदा इंग्रज आणि उमाजींचे सैन्य समोरासमोर आले तेंव्हा उमाजींच्या सैन्याने इंग्रजांच्या सैन्याचा पराभव केला. या लढाईत उमाजींनी पाच इंग्रजांची मुंडकी उडवली त्यामुळे इंग्रज अधिकच भयभीत झाले. त्यांच्या मनात उमाजींची भीती बसली.

१८२४ ला उमाजींनी भाबुर्डी येथील इंग्रजांचा खजिना लुटून देवळाच्या देखभालीसाठी लोकांना वाटला. २१ डिसेंबर १८३० ला उमाजींनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्याला मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवून पळवून लावले. त्यांच्या या बंडाला जनतेतूनही मोठा प्रतिसाद मिळत होता. उमाजी नाईक यांनी इंग्रजांविरुद्ध एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता त्यात त्यांनी नमूद केले होते की लोकांनी इंग्रजांच्या नोकऱ्या सोडाव्यात. इंग्रजांविरुद्ध सर्वांनी एकत्र यावे. इंग्रज सरकार विरोधात अराजकता माजवावी. इंग्रजांचा खजिना लुटून तो गोरगरिबांना वाटावा. इंग्रजांशी असहकार पुकारवा. त्यांना शेतसारा, पट्टी देऊ नये. त्यांच्या या जाहिरनाम्याचे पालन सर्वसामान्य जनता करू लागल्याने इंग्रज आणखी बिथरले. त्यांनी उमाजींना पकडण्यासाठी आता फोडा आणि झोडा नीती अवलंबली. उमाजींची माहिती देणाऱ्यास १० हजार रुपये आणि चारशे बिघा जमीन मिळेल असे बक्षिस ठेवले. इंग्रजांची ही नीती कामी आली. एका महिलेचे अपहरण केले म्हणून काळोजी नाईक याचे हात उमाजींनी कलम केले होते तो इंग्रजांना जाऊन मिळाला. उमाजींच्या जवळचा नाना चव्हाण हा देखील इंग्रजांना जाऊन मिळाला. या दोघांनी फितुरी करून उमाजींची माहिती इंग्रजांना दिली. १५ डिसेंबर १८३१ रोजी भोर तालुक्यातील उतरेली गावात उमाजींना पकडण्यात आले. उमाजींवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला.

३ फेब्रुवारी १८३२ ला उमाजींना फाशी देण्यात आली. देशासाठी फासावर जाणारा उमाजी हा पहिला क्रांतिकारक ठरला. फासावर चढण्यापूर्वी उमाजींचे शेवटचे शब्द होते शिवाजी महाराज की जय! वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी देशासाठी हसत हसत फासावर चढणारा हा क्रांतिकारक भारताच्या इतिहासातील पहिला क्रांतिकारक ठरला म्हणून त्यांना आद्यक्रांतिकारक असे म्हणतात. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन पुढे अनेक क्रांतिकारक देशात निर्माण झाले मात्र दुर्दैवाने या महान क्रांतिकारकाने केलेली क्रांती आजही खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच आज त्यांच्या जयंतीदिनी सर्वांनी त्यांच्या कार्याची ओळख नवीन पिढीला करुन द्यावी. आद्यक्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार
पुणे

पत्र मानस

पीओपीच्या मूर्तींच्या बाबतीत पुन्हा तेच तेच कां होते.? "

गणेशोत्सवास काही दिवस उरले असताना मूर्ती प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून बनविण्यावर असलेल्या बंदीची आठवण सर्वांना येते. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने जारी केलेल्या सुधारित नियमावलीचे काटेकोर पालन करण्याचे आदेश न्यायालयाने राज्य सरकार आणि राज्यातील. सर्वच महापालिकांना दिले आहेत. त्यामुळे पीओपी च्या मूर्तींच्या विषयावर चर्चा होऊन कालांतराने तो विषय विस्मरणात जातो. गेली तीन चार वर्षे याच मुद्द्यावरून दरवर्षीच्या गणेशोत्सवास काही दिवस उरले असताना विषय चर्चेत येतो. प्रतिवर्षी प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना मागणीही तेवढीच असते आणि सार्वजनिक गणेशोत्सवांतील मूर्त्यांच्या उंची वाढविण्याकडे बहुतेक सर्व मंडळांचा कल वाढताना दिसतोय. विसर्जनानंतर मुर्त्या अनेक प्रकारच्या समस्या निर्माण करतात. अशावेळी पर्यावरणवादी संस्था व त्यांचे कार्यकर्ते लोकांमध्ये शाडू मातीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्याचे मुद्दे लोकांसमोर आणून त्यांना पीओपी मूर्तींचे विसर्जनानंतर पर्यावरणावर होणारे परिणाम समजावून देण्याचे प्रयत्न करतात. प्रत्यक्षात मात्र प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना शाडू मातीच्या मूर्तींचा ना पर्याय निवडला जातो ना राज्य सरकार, महानगरपालिका केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेशांची अंमलबजावणी करतात. त्यावरून असे दिसून येते की सरकार किंवा लोकं दोघांनाही कागदोपत्री नियम असावेत असे वाटते परंतु त्यांचे पालन करणे प्रत्येकाच्या स्वेच्छेप्रमाणे केले जावे असे वाटते त्याचकारणांनी पर्यावरण, प्रदूषण या मुद्द्यांवरून उत्सव काळात रवंथ केले जाणारे मुद्दे अल्पावधीतच म्यान केले जातात. लोकं पर्यावरण आणि प्रदूषणाचे भोवतालच्या वातावरणावर होणारे परिणाम कां समजावून घेत नाहीत असे प्रश्न सर्वांनाच भेडसावत असतात. त्यांचे गांभीर्य ओळखणार तरी केंव्हा? पर्यावरण आणि प्रदूषणाचे मुद्दे सणांच्या निमित्ताने होणाऱ्या फटाक्यांच्या आतषबाजीने, आवाजाने चर्चेत येतात ते देखील अल्पावधीसाठीच. रस्त्यावरचे सिग्नल्स, वाहतुकीचे नियमन, व्यसने हेल्मेट सक्ती अशा कायमस्वरूपी बंधनकारक नियमनांमागे असणारे उद्देश न समजून घेता आपल्या मनमानी पद्धतीने वागण्याची सूट प्रत्येक ठिकाणी असावी अशी लोकांची अपेक्षा असते. पण आपलेच लोकप्रतिनिधी जेव्हा विधिमंडळ सभागृहांत कायदे नियम आखतात त्यांच्याकडे त्या नियमांसंबंधी सूचना, दुरुस्त्या कराव्यात असे सुचविण्यात पुढाकार घेत नाहीत. त्यामुळे नियमभंगांच्या बाबतीत तेरी भी चूप मेरी भी चूप या नात्याने कारभाराची चालढकल सुरू असते. दोन्ही बाजू राजी तिथे कोण मारणार बाजी ? अशी एकंदर अवस्था आहे."

- स्नेहा राज, गोरेगांव.

लाडकी बहीण श्रेयवादावरून वाद

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवरून राज्यभरात सत्ताधारी व विरोधक यामध्ये आरोप प्रत्यारोप होत आहेत असे वाद विवाद चालू असताना मंत्री मंडळ बैठकीत सुद्धा याचे पडसाद उमटल्याचे वृत्त नुकतेच वाचले . राष्ट्रवादी काँग्रेस गट मुख्यमंत्री लाडकी बहीण ऐवजी माझी लाडकी बहीण योजना हे नाव वापरत असल्याबद्दल शिवसेना सेना गटाने तीव्र आक्षेप मंत्रिमंडळ बैठकीत नोंदविला आहे अलीकडे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट कडून या योजनेचा प्रचार करताना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना असे न म्हणता माझी लाडकी बहीण योजना असे म्हटले जात आहे . मंत्री मंडळ बैठकीत यावर चर्चा सुद्धा झाली . या नाराजी नाट्या नतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही खंत व्यक्त केली आहे . मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे नाव बदलणे हा चुकीचा प्रकार आहे आता निवडणुका जवळ आहेत त्याचा फटका बसू शकतो तसेच त्यामुळे विरोधकांमध्ये चुकीचा संदेश सुद्धा जाऊ शकतो . अशी भीती शिवसेनेच्या मंत्र्यांकडून व्यक्त करण्यात आली यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला व यापुढे सर्वच मंत्र्यांनी काळजी घ्यावी अशी सूचना केली आता विधानसभेच्या निवडणुका काही महिन्यावर येऊन ठेपल्या आहेत . महायुतीच्या नेत्यांना या योजनेमुळे सहानभूती मिळून सत्तेवर येऊ अशी आशा आहे आज महिलांमध्ये या लाडक्या बहिणी विषयी बरीच सहानुभूती आहे . त्याचा फायदा महायुतीला होऊ शकतो .आज अखेर पर्यंत या योजनेअंतर्गत १ कोटी ५९ लाख महिलांना एकूण ४७८७ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत तथापि जागा वाटप ,घटक पक्षातील महत्वाकांक्षा तिन्ही पक्षातील योग्य तो समन्वय नसणे या मुळे महायुतीला अडचणी येऊ शकतात .विरोधी आघाडी कडे अद्यापपर्यंत मुख्यमंत्री पदासाठी कोणाचेही नाव जाहीर झालेले नाही . महायुती बाबत सुद्धा तीच परिस्थिती आहे . अजून निवडणूक होई पर्यंत अंदाजे दोन महिन्याचा कालावधी आहे एकूणच महायुती व महाविकास आघाडी यांच्या तील सामना सध्यातरी तुल्यबळ दिसत आहे

- शांताराम वाघ पुणे

ग्रामीण भागात उद्योगधंदे उभारल्यास शहरांकडे येणारे लोंढे थांबतील

शहरात खूपच दाटीवाटी झाली आहे आणि प्रत्येकाला गैरसोयीचे होईल इतका भार पृथ्वीवरील संसाधनांवर आला आहे. दुसरीकडे, हवामानातील बदल, परिणामी पूर, उष्णतेची लाट आणि टोकाच्या हवामानाचा त्रास, सतत सुरू असलेले संघर्ष आणि बिघडत चाललेल्या भविष्याची भीती वाढवणाऱ्या साथीच्या रोगांचा धोका यांमुळे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे झाले असल्याचे दिसून येत आहे. त्याच वेळी, मोठाल्या शहरांमध्ये त्यांच्या क्षमतेच्या पलीकडे अनिश्चितपणे घनता वाढत आहे, ज्यामुळे पायाभूत सुविधांची कमतरता निर्माण होते व अशा सुविधा पुरविण्यात अपयश येते आणि एखादे ठिकाण राहण्यास योग्य अथवा चांगले असण्याचे प्रमाणही बिघडते. मोठाली महानगरे उत्पादकतेत तडजोड झाली तरीही अधिक संपत्ती निर्माण करतील, मात्र त्यातील नागरिकांचे हाल वाढतील. शहरात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सामावून घेणे म्हणजे त्यांच्या बहुविध गरजांसाठी जागा तयार करणे– निवास, कामाची जागा, मनोरंजन, शिक्षण, आरोग्य सेवा, पाणी, स्वच्छता आणि कचरा विल्हेवाट या त्या मूलभूत गरजा होय. हे सगळे पुरवताना शहराच्या पर्यावरणीय शाश्वततेची किंमत मोजावी लागते. ठाणे जिल्ह्याची मतदार संख्या वाढत आहे तशी लोकसंख्येत ही वाढ होते आहे. मुंबई, पालघर, रायगड या महानगरातील मतदार संख्या झपाट्याने वाढत आहे. सरकार सर्व सोयुनियुक्त शहरे पाहून उद्योगधंद्यांना चालना देते. कामासाठी अनेक ठिकाणाहून लोक या शहरांमध्ये येतात आणि तेथेच स्थायिक होतात त्यामुळे मतदार संख्या वाढीस प्रमुख कारण बनत आहे त्यामुळे सरकारने ग्रामीण भागात देखील छोटे - मोठे उद्योगधंदे उभारणी केली तर शहरी भागाकडे जाणारे लोंढे थांबतील.

- राजू जाधव, मांगूर

ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभा संपन्न

पनवेल : श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ३४ वे पुष्प संपन्न झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रामधे संपन्न झालेल्या या कार्यक्रमात पुणे येथील युवा गायिका ईश्वरी कुलकर्णी-श्रीगार यांनी आपली सेवा सादर केली. ईश्वरी ह्यांनी आपल्या संगीत सभेची सुरुवात राग श्याम कल्याण मधील 'जियो मेरो लाल' ही बंदिश आणि 'सावन की सांज भयी' ही बंदिश गाऊन गेली. त्यानंतर त्यांनी 'बेला सांज की' ही बंदिश सादर केली. नंतर त्यांनी राग मेघ मधील 'मेघश्याम घनश्याम' हा तराणा सादर केला. नंतर त्यांनी कजरी हा गायन प्रकार देखील सादर केला. यानंतर त्यांनी सुर निरागस हो, अमृताहुनी गोड, बाजे रे मुरलीया बाजे, उघड नयन देवा हे अभंग आणि काटा रुते कुणाला व का धरिला परदेस ही नाट्यगीते सादर केली. 'तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल' या अभंगाने त्याने संगीत. सभेची. सांगता केली. राजेंद्र काळे यानी संवादिनी, शार्दुल डोंगरे तबलासाथ व गणेश घाणेकर यानी तालवाद्यसाथ केली. सुखदा मुळ्ये-घाणेकर यानी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. संगीत सभा यशस्वी करण्यासाठी आयोजकांसह

ऐन गणेशोत्सवात दिव्यातील बांधकामांना 'अभय' कोणाचं?

सहाय्यक आयुक्त अक्षय गुडधेंनी अनधिकृत बांधकामांचा झोपाळा झुलवल्याची वदंता ?

■ दिव्यातील बेकायदा बांधकामांवर कारवाई होणार की सहाय्यक आयुक्त डोळेझाक करणार

■ ठाण्यात, कळव्यात कारवाई होते पण दिव्यात कारवाई होत नाही

■ अनधिकृत बांधकामांमागे 200 रुपये चौरस फूट रेट फिक्स असल्याची जोरदार चर्चा

सुशांत पाटील

■ दिवा/ठाणे

ऐन गणेशोत्सवात दिव्यात अनधिकृत इमारतींच्या बांधकामांची जणू स्पर्धा सुरू असल्याचे दिसत आहे. ठाणे महापालिका हद्दीत मागील काही महिन्यांपासून अनधिकृत बांधकामांना पायबंद घालण्यात आला होता. नवे आयुक्त सौरभ राव यांनी देखील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तरीसुद्धा दिव्यात कोणाच्या आशिर्वादाने ही बांधकामे राजरोसपणे सुरु आहेत हा पण एक यक्षप्रश्न आहे.

ठाण्यातील आणि दिव्यातील अनधिकृत बांधकामांमागे २०० रुपये चौरस फूट रेट फिक्स असल्याची जोरदार चर्चा यानिमित्ताने सुरु आहे. एका दिवसात १ हजार चौरस फूट अनधिकृत बांधकामाचे एक प्रकरण मॅनेज झाले तरी रोजचे २ लाख रुपये गोळा होतात. ठाण्यासारख्या शहराचा

दिवा-आगासन रोड बी.आर. नगर येथील ऑक्सफर्ड स्कूलजवळील बांधकाम

दिवा प्रभाग समितीच्या हाकेच्या अंतरावर असलेले दिवा शिळफाटा येथील बांधकाम

भाग 2

विचार करता दररोज लाखो रुपये अनधिकृत बांधकामातून गोळा होतात. महिन्याकाठी हा आकडा कोटींच्या घरात जातो. यातून कनिष्ठांपासून ते वरिष्ठांपर्यंत सर्वांचे हात ओले होतात असेही म्हटले जाते.

दिव्यात अनधिकृत इमारतींच्या बांधकामांची स्पर्धा सुरू झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. कोणत्याही परवानगीशिवाय चार ते पाच मजल्यांच्या टोलेजंग इमारती बिनदिक्कत उभ्या केल्या जात आहेत. विशेष म्हणजे महापालिका प्रशासनाकडून या सर्वांकडे डोळेझाक केली जात असल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. अरुंद आणि दाटी-वाटीच्या जागांमध्ये कोणत्याही प्रकारच्या सुरक्षित उपाययोजनां शिवाय प्रचंड मोठी बांधकामे केली जात आहेत. त्यात बांधकामांचा दर्जाही निकृष्ट असल्याने यामध्ये राहायला येणाऱ्या नागरिकांचा जीव धोक्यात येण्याची शक्यता आहे. शिवाय सध्या राहत असलेल्या नागरिकांच्या पायाभूत सुविधांवर ताण येणार असल्याने याकडे महापालिकेच्या दुर्लक्षाबद्दल संताप व्यक्त होत आहे.

दिवा प्रभागातील लोकसंख्या भरमसाठ वाढत असून त्यामुळे पायाभूत सुविधांवर ताण निर्माण झाला आहे. पिण्याचे पाणी, नाले, गटारांची व्यवस्था, रस्त्यांची कामे, वीज, शिक्षण आणि आरोग्य सुविधांचाही पत्ता नसलेल्या या भागात स्वस्त घरांचा पर्याय मात्र आहे.

महापालिकेच्या परवानगीशिवाय चार ते पाच मजल्यांच्या इमारतीचे बांधकाम अनधिकृतपणे वेगाने सुरू आहे.तर या भागात अनधिकृत इमारती बांधण्याची स्पर्धा सुरू झाली आहे.

ठाणे महापालिकेच्या राजकीय आणि प्रशासकीय नेतृत्वाचे दुर्लक्ष असलेल्या या भागात मनमानी पद्धतीने इमारती बांधल्या जात आहेत. अग्निसुरक्षेच्या नियमांची पायमल्ली करून आणि सुरक्षिततेच्या कोणत्याही नियमांचे पालन न करता उभारण्यात येणाऱ्या या इमारतींमुळे स्थानिक रहिवाशांचा जीव धोक्यात आला आहे. लॉकडाउनच्या काळात अनधिकृत बांधकामाचा ठपका ठेवून एका लिपिकाला दोषी ठरवून निलंबित करण्यात आले होते. परंतु त्यानंतरही दिव्यातील अनधिकृत बांधकामाचे पेव थांबले नसल्याने दिवा प्रभाग समितीच्या स.आयुक्त यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. गेल्या १५ वर्षांमध्ये दिव्यामध्ये अनधिकृत बांधकामे होत असली, तरी गेल्या एका वर्षामध्ये झालेल्या अनधिकृत बांधकामांची संख्या त्यापेक्षाही जास्त असल्याचा धक्कादायक आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. या बांधकामांवर कारवाई होणार की नाही हे आता येणारा काळच ठरवेल.

'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने'च्या लाभार्थ्यांसाठी सोमवारी विशेष शिबीर

प्रतिनिधी

■ पनवेल

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील 60 वर्षांवरील नागरिकांना 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने'चा लाभ देण्याकरिता सोमवार दिनांक 09 सप्टेंबर रोजी आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये सकाळी 10.00 वाजेपासून विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याठिकाणी लाभार्थ्यांच्या नोंदणी सहित वैद्यकिय प्रमाणपत्रासाठी आरोग्य तपासणीची सुविधा देखील देण्यात येणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त जेष्ठ नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने आयुक्तांनी केले आहे.

जेष्ठांना देशातील महत्वाच्या तीर्थक्षेत्राची मोफत यात्रा करण्यासाठी मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने' ची घोषणा केली आहे. या योजनेअंतर्गत प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रती व्यक्ती 30 हजार इतकी राहणार आहे. पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जेष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ देण्यासाठी सोमवार दिनांक 09 सप्टेंबर रोजी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरू करण्यासाठी आवश्यक पात्रता

1.लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणं आवश्यक
2.वय वर्ष 60 आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिक
3.लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम 2.50 लाखांपेक्षा जास्त नसावे.
4.'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने'चा लाभ घेण्यासाठी कागदपत्र आवश्यक कागदपत्रासह योजनेच्या लाभासाठी ऑफलाईन अर्ज करावा लागेल.
5.लाभार्थ्यांचे आधार कार्ड किंवा रेशनकार्ड
6.महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र
7. महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. (लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्यांचे 15 वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचं प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र/ प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न 2.50 लाखांपर्यंत असणं अनिवार्य) किंवा पिवळे/केशरी रेशनकार्ड

कागदपत्राचा तपशील

अर्जाची मूळ प्रत, अर्जदाराचे आधार कार्ड / रेशन कार्ड (स्वयं साक्षांकीत प्रत),महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असल्याबाबत अर्जदाराचे अधिवास प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला किंवा अर्जदाराचे १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड किंवा मतदार ओळखपत्र किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (यापैकी कोणतेही एक),सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न रु.२.५० लक्षपर्यंत असणे अनिवार्य) किंवा अंत्योदय अन्न योजना (AAY) किंवा प्राधान्य कुटुंब योजना (PHH) किंवा वार्षिक उत्पन्न रु.२.५० लक्षच्या आत असलेले मात्र प्राधान्य कुटुंब नसलेले (NPH) शिधापत्रिकाधारक (यापैकी कोणतेही एक), शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला शारीरिक दृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असलेचे अर्जदाराचे मूळ वैद्यकीय प्रमाणपत्र, लाभार्थ्यांच्या बरोबर येणाऱ्या जीवनसाथी किंवा सहायकाचे शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला शारीरिक दृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असलेचे वैद्यकीय प्रमाणपत्र, अर्जदाराचे सदर योजनेच्या अटी व शर्तीचे पालनकरण्याबाबत आणि अपात्रता नसलेचे हमीपत्र, जवळच्या नातेवाईकाचे प्रमाणपत्र, वय वर्षे ७५ असलेल्या अर्जदाराचे मदतनीस (जीवनसाथी / सहायक) चे मूळ वैद्यकीय प्रमाणपत्र, जाणाऱ्या जीवनसाथी / सहायकाचे आधार कार्ड, अर्जदारासोबत जाणाऱ्या जीवनसाथी / सहायकाचे हमीपत्र

ठाणे : 5 सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचीत्य साधून शासकीय आश्रमशाळा मढ ता. मुरबाड जि. ठाणे या शाळेला नवकिरण मंडळाचे संस्थापक, अध्यक्ष मधुसुदन सदडेकर यांनी उच्च दर्जाचे क्रिडा साहित्य आपल्या संस्थेतर्फे भेट दिली. मुख्याध्यापक - दिपक बांगरसर व संतोष आगिवले सरांच्या स्वाधीन केले. आकाश दिप फाउंडेशनच्या डॉ. मनीषा बिडये व जयप्रकाश बिडये देखील या प्रसंगी उपस्थित होते. डॉ. मनीषा बिडये या 400 विद्यार्थी असलेल्या आदिवासी शाळेवर समुपदेशक म्हणून सेवा पाहतात.

ठाणेकरांना मिळणार नवीन फिश मार्केट !

लोकमान्यनगर परिसरातील नागरिकामांचे लोकार्पण

प्रतिनिधी

■ ठाणे

ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघातील लोकमान्यनगर व शास्त्रीनगर परिसरामध्ये नागरिकांच्या सोयीसाठी आमदार प्रताप सरनाईक यांच्या आमदार निधीतून होत असलेल्या विविध विकास कामांचा आज दि. ६ सप्टेंबर, २०२४ रोजी लोकार्पण व भुमिपूजन आमदार प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

शास्त्रीनगर व आजुबाजूच्या परिसरातील रहिवाश्यांसाठी फिश मार्केट उपलब्ध नसल्यामुळे मासेविक्री करणारे व्यापारी रस्त्यावरच आपले व्यवसाय करीत होते. त्यामुळे तेथील नागरिकांना मोठ्या प्रमाणात वाहतुककोंडीला सामोरे जावे लागत होते. या परिसरातील रहिवाश्यांनी आमदार प्रताप सरनाईक यांना शास्त्रीनगर नाका येथे नविन फिश मार्केट उभारण्यासंदर्भात विनंती केली असता आमदार प्रताप सरनाईक यांनी विशेष निधीतून तरतुद केली असून आज शास्त्रीनगर नाका येथे उभारण्यात येणार्या फिश मार्केटचे भुमिपूजन करण्यात आले. तसेच लोकमान्यनगर पाडा नं. ३ येथील हनुमान क्रिडा मंडळाच्या जागेत वाचनालय आणि समाज मंदिर त्याचप्रमाणे लोकमान्यनगर पाडा नं. २ येथील समृध्दी महिला बचत गट केंद्र येथे अद्ययावत व्यायाम शाळा आमदार निधीतून उभारण्यात आले आहे. त्याचेही आज लोकार्पण करण्यात आले. परिसरातील विद्यार्थ्यांना या वाचनालयाचा उपयोग होणार असून समाज मंदिराचा तेथील रहिवाश्यांना लाभ घेता येणार आहे.

91 अधिकारी, कर्मचारी यांना पदोन्नती व 200 जणांना आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाची गणेशोत्सवात भेट

■ टिटवाळा

मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले नमुंमपा अधिकारी / कर्मचारी यांची पदोन्नती तसेच त्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करणे हे विषय महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार प्रशासन विभागामार्फत विशेष लक्ष देत मार्गी लावण्यात येत आहेत.

या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री. शरद पवार व पदोन्नती निवड समितीने 14 संवर्गातील 91 अधिकारी, कर्मचारी यांना पदोन्नती व 21 संवर्गातील 200 अधिकारी, कर्मचारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती

योजनेचा लाभ देण्यात आला आहे. गणेशोत्सवाच्या सुरुवातीलाच पदोन्नती झाल्याने एकप्रकारे ही नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांना मिळालेली गणेशोत्सवाची भेट असल्याचे अभिप्राय अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून व्यक्त करण्यात येत आहेत. विशेष म्हणजे यामध्ये तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांचा प्राधान्याने विचार करण्यात आलेला आहे.

पदोन्नतीमध्ये – अधिक्षक / वसुली अधिकारी संवर्गात 17, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गात 1, उपअभियंता (स्थापत्य) संवर्गात 11, उपअभियंता (विदयुत) संवर्गात 4, उप अभियंता (यांत्रिकी) संवर्गात 2, सहा. अग्निशमन अधिकारी संवर्गात 4, अग्निशमन प्रणेता संवर्गात 8, ड्रायव्हर ऑपरेटर संवर्गात 30, लेखाधिकारी / लेखा परीक्षा अधिकारी संवर्गात 2, सहा. उदयान अधिकारी संवर्गात 1, उद्यान अधिक्षक संवर्गात 2, सहा. लेखा अधिकारी / सहा. लेखा परीक्षा अधिकारी संवर्गात 3, वरिष्ठ लिपीक/ कर निरीक्षक संवर्गात 4, लेखा लिपिक संवर्गात 2 अशाप्रकारे एकूण 91 अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.

शिक्षक दिनानिमित्त दूंदरे ग्रामपंचायतकडून 5 झेडपी शाळांना लॅपटॉपचे वाटप

प्रतिनिधी

■ पनवेल

गुरुवार ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांचा सत्कार करण्यात आला तसेच रिटघर शाळेत दूंदरे ग्रामपंचायत हद्दीतील चिंचवली, रिटघर, दूंदरेपाडा, शिवनसई, दूंदरे या ५ शाळेला सरपंच सुभाष भोपी यांच्या हस्ते लॅपटॉपचे वाटप करण्यात आले. शाळेचे

मुख्याध्यापक शिक्षक प्रतिभा बाळासाहेब नाईक, शाळा शिवणसई, राहुल महादेव लव्हे शाळा चिंचवली, संतोष तुकाराम पाटील शाळा दुंदरेपाडा, अर्चना अविनाश डांगरे शाळा दुंदरे यांच्या ताब्यात लॅपटॉप देण्यात आले.

कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी बुद्धिमत्तेला पर्याय होऊ शकत नाही - प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर

प्रतिनिधी

■ नवी मुंबई

शिक्षणाचा अभ्यासक्रम काळानुसार बदलत जातो, परंतु शिक्षक म्हणून प्रभावी अध्यापन करण्याचे कौशल्य हे सर्वकालीन आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता युगातील शिक्षकाचे महत्त्व अधिक आहे. मात्र कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी बुद्धिमत्तेला पर्याय होऊ शकत नसल्याचे प्रतिपादन प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी शिक्षकदिन कार्यक्रमात केले.

खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयाच्या शिक्षक दिनाचा कार्यक्रम शांताबाई रामराव सभागृह, खारघर, नवी मुंबई येथे उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनानिमित्त एक दिवस शिक्षकाची भूमिका साकारली, तर संस्थेतील शिक्षकांचा गौरव ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. डोंगरगावकर यांनी पुढे असेही नमूद केले की, भारतीय संविधानाने शिक्षकांना विज्ञाननिष्ठ नागरिक घडवण्याचे कर्तव्य दिले आहे, जे विकसित भारताचा पाया असेल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी घोषित केलेल्या विकसित भारताच्या संकल्पपूर्तीसाठी

गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक शिक्षण सर्व समाजघटकांना मिळणे गरजेचे आहे. कंत्राटी शिक्षक व विनाअनुदानित शिक्षणसंस्था हा विकसित भारताच्या संकल्पाच्या पूर्ततेतील अडथळा आहे.

पश्चिम रेल्वे

विद्युत काम

वरी. डीईई/पी/बीसीटी ई-निविदा सूचना क्र: ईएलटी१/७/९१३/डब्ल्यूए/६१ दि. ०३.०९.२०२४ मागवित आहेत. मुंबई सेंट्रल- येथील सध्याचा बेलासीस रोड ओव्हर ब्रिजच्या रिगर्डनिंग संदर्भात (विद्युत) पॉवर काम. कामाचे अंदाजे मूल्य : रु. १७,३०,४४६.००/-. ईरठे: रु. ३४,६००/- सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: ०३.१०.२०२४ रोजी १५:०० वाजेपर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: ०३.१०.२०२४ रोजी १५:३० वाजता. अधिक तपशीलासाठी कृपया संकेतस्थळाला www.ireps.gov.in ला भेट दया. ०५०६

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे

विद्युत काम

वरी.मुख्य विद्युत अभियंता (बांधकाम) पश्चिम रेल्वे डीआरएम कार्यालय, अंनेक्स ईमारत ३ रा मजला दो-बत्ती रतलाम (एम.पी.) ४५७००१, निविदा सूचना क्र : ईएल/सी/आरटीएम/२०२४/०३/टी, दिनांक; ०५.०९.२०२४ मागवित आहेत.
कामाचे नाव: पश्चिम रेल्वेच्या रतलाम विभागामधील दाहोड-इंदोर नवीन लाईन प्रकल्पा संदर्भात तिही-पिथमपुर अनुभागा दरम्यान बोगद्यामध्ये व्हेंटीलेशन सिस्टीमचे आरेखन, पुरवठा, उभारणी, तपासणी आणि कार्यान्वित करणे आणि ईल्युमिनिशन काम.
कामाचे अंदाजे मूल्य : रु.८,०४,०४,७५६.००/-.
बोली ठेव: रु ५,५२,०००.००/-. ऑनलाईन बोली सुरू दिनांक: १२.०९.२०२४. निविदा समाप्ती दिनांक: २६.०९.२०२४ रोजी १५:०० वाजता.
संकेतस्थळ तपशील आणि सूचना फलक: वरील कार्यालयाच्या पत्यावर कार्यालयीन वेळे दरम्यान व्यक्तीशा आणि दूरध्वनी क्र. ०७४१२ २३३९९६., वर किंवा ई-मेल: dyceecrtm@gmail.com संपर्क करा. अधिक माहितीसाठी कृपया आमच्या www.ireps. gov.in ला भेट द्या. ०५१७

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे

विविध काम

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (रोलिंग स्टॉक) ईएमयू कारशेड मुंबई सेंट्रल विभाग, पश्चिम रेल्वे, मुंबई ४०००३४.ई-निविदा क्र: डीआरएम/आरएस/२०२४-२५/०८-आर दिनांक: ०४.०९.२०२४ मागवित आहेत.
कामाचे नाव : सिमेन्स, बीटी, मेधा आणि बीएचईएल एसी ईएमयू रेक्समध्ये बसविलेल्या एपीसी रिसिव्हर बनावटीच्या युनिपार्ट रेल, यूकेच्या सर्व सदोषक भागांची दुरुस्ती, सर्विसिंग आणि बदलणे. अंदाजे कामाचे मूल्य: रु. २४,७३,२८०/-. ईठे: रु. ४९,५००/-. सादरीकारणाचा दिनांक आणि वेळ: विहित नमुन्यामध्ये ३०.०९.२०२४ रोजी १५:०० वाजता नंतर नाही. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: ३०.०९.२०२४ रोजी १५:३० वाजता. संकेतस्थळ तपशील: अधिक तपाशीलासाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या. ०५१४

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

इकोफ्रेन्डली प्लास्टिकमुक्त गणशोत्सव साजरा करताना श्रीमूर्ती विसर्जनासाठी 136 कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती

जलप्रदूषण टाळण्याचे पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे आवाहन

प्रतिनिधी

■ नवी मुंबई

संपूर्ण जगभरात उत्साहाने साजरा होणारा गणेशोत्सव नवी मुंबईतही मोठया प्रमाणात साजरा होत असून सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी पर्यावरणपूरकतेची कास धरत 'इकोफ्रेन्डली प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव' साजरा करावा असे आवाहन मागील महिन्यातच नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नागरिकांना केले आहे. आयुक्तांनी केलेल्या आवाहनास नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

नागरिकांनी पर्यावरणाची जपणूक करण्याच्या दृष्टीने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींची प्रतिष्ठापना न करता पर्यावरणपूरक शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करावी तसेच श्रीमूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलस्त्रोतात न करता महानगरपालिकेने ठिकठिकाणी निर्माण केलेल्या 136 कृत्रिम विसर्जन तलावात करावे असे आवाहन आयुक्तांमार्फत करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे श्रीगणेशोत्सवाच्या सजावटीत प्लास्टिक व थर्माकोलचा वापर पूर्णपणे टाळून कापड, कागद अशा पुनर्वापरयोग्य साहित्याचा वापर

करावा तसेच कर्णकर्कश्य ध्वनी टाळून मर्यादित आवाजात वाद्यांचा वापर करावा तसेच लेझर लाईटचा वापर टाळावा असे आवाहन करण्यात आलेले आहे.

श्रीगणेशोत्सवामध्ये मंडप उभारणीकरिता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात आलेले नसून 5 वर्षांसाठी परवानगीचा निर्णयही घेण्यात आलेला आहे. मंडप परवानगीसाठी ई सेवा संगणक ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिल्याने 176 गणेशोत्सव मंडळांनी सुलभ रितीने परवानगी प्राप्त करून घेत समाधान व्यक्त केले आहे.

इकोफ्रेन्डली प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचे मंडळांना आवाहन करताना श्रीगणेशमूर्तीच्या विसर्जनासाठी नागरिकांना त्यांच्या घरापासून जवळ विसर्जनस्थळे उपलब्ध व्हावीत याची खबरदारी घेत 136 इतक्या मोठया प्रमाणावर कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात आली आहे. या कृत्रिम तलावांच्या जागा परिमंडळ व अभियांत्रिकी विभागामार्फत निश्चित करण्यात आल्या असून त्याठिकाणी कृत्रिम तलाव उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. यामध्ये बेलापूर विभागात 19, नेरुळ विभागात 26, वाशी विभागात 16. तुर्भे विभागात 17, कोपरखैरणे विभागात 15, घणसोली विभागात 15, ऐरोली विभागात 18 व दिघा विभागात 10 अशाप्रकारे एकूण 136 कृत्रिम विसर्जन तलाव उभारले जात आहेत. नागरिकांनी प्राधान्याने कृत्रिम विसर्जन तलावांचाच वापर करावा असे आवाहन विविध माध्यमांतून करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात 22 पारंपारिक विर्सजन स्थळे असून त्याठिकाणी होणारी भाविकांची गर्दी विभागली जावी व एकाच ठिकाणी गर्दी होऊ नये याकरीता मागील काही वर्षांपासून कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात येत आहे. कृत्रिम तलावांमुळे नैसर्गिक जलस्तोतांतील जलप्रदूषणाला प्रतिबंध होऊन त्यांचे प्रदूषण कमी होत असते. नवी मुंबई हे स्वच्छ शहराप्रमाणेच पर्यावरणशील शहर म्हणून नावाजले जात असून या इतक्या मोठया संख्येने निर्माण केलेल्या कृत्रिम तलावांमुळे पर्यावरणरक्षणाच्या दृष्टीने एक सकारात्मक यशस्वी पाऊल उचलले जात आहे. या कृत्रिम तलाव संकल्पनेला नागरिकांचा मिळणारा चांगला प्रतिसाद लाभताना दिसत आहे.उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

एम एम आर डी ए MMRDA **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
प्लॉट क्र.सी-१४ व १५, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१ दूरध्वनी : ०२२-२६५९०००१/०४
फॅक्स: ०२२-२६५९१२६४ वेबसाईट : https://mmrda.maharashtra.gov.in

ई- निविदा सूचना

कामाचे स्वरुप : E-Lottery प्रणालीद्वारे प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासह सामाजिक विकास कक्षाच्या संगणकीकरणासाठी संस्थेची नियुक्ती करणे.

निविदा प्रस्ताव डाउनलोड करण्याचा कालावधी		निविदा प्रस्ताव स्विकारण्याची अंतिम तारीख	स्पष्टीकरणासाठी विनंत्या पाठवण्याची शेवटची तारीख	निविदा बोली पूर्वी प्रश्न / सूचना पाठवण्याची अंतिम तारीख
तारीख व वेळ (पासून)	तारीख व वेळ (पर्यंत)			
०९.०९.२०२४ (सायंकाळी ०५.०० वा.)	२३.०९.२०२४ (सायंकाळी ५.०० वाजता)	२३.०९.२०२४ (सायंकाळी ५.०० वाजता)	अंमलबजावणी + (२ वर्षे) देखभाल व तांत्रिक साहाय्य	१४.०९.२०२४, संध्याकाळी ०५:०० वाजेपर्यंत.

टिप : ई-निविदा प्रस्ताव, शुध्दीपत्रक व इतर माहिती https://mahatenders.gov.in/nicgep/app या संकेतस्थळावरुनच डाउनलोड करता येतील. ई- निविदा प्रस्तावा संबंधित सविस्तर माहिती आणि मदतीसाठी support-eproc@nic.in या ई-मेल किंवा दूरध्वनी क्र. ०२२-२६५९७४४५ वर संपर्क साधावा. तसेच, या निविदेबाबत माहितीसाठी या दूरध्वनी क्र. ०२२-२६५९७४४८ / ०२२-२६५९७९५४ व ई-मेल: sm.rnr@mailmmrda.maharashtra.gov.in वर संपर्क साधावा.

सही/-
तारीख : ०७/०९/२०२४, ठिकाण: मुंबई
अतिरिक्त महानगर आयुक्त-II
क्रमांक: माहिती व तंत्रज्ञान कक्ष /१९५
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण
Fulrani

मुक्त संचार करणाऱ्या कोल्ह्याला पकडण्यात वनविभागाला यश

अहमदनगर : जिल्ह्यातील जामखेडमध्ये सलग दोन दिवस मुक्त संचार करत फिरणाऱ्या वन्य प्राणी कोल्ह्यास सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांच्या पुढाकाराने व वन विभागाच्या मदतीने पकडून रेक्सु टीमच्या ताब्यात देण्यात आले. गेल्या दोन दिवसापासून गळ्यात साखळदंड बांधलेल्या अवस्थेत जामखेड शहरात मुक्त संचार करणारा एक कोल्हा हा जंगली प्राणी सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी व मित्र समुहाच्या पुढाकाराने आणि वन विभागाच्या सहकार्याने पकडुन त्याला पुणे येथील रेक्सु टीमच्या हवाली करण्यात आले आहे साखळदंडासहीत फिरणाऱ्या या कोल्ह्याची शहरात खुपच चर्चा रंगली होती. त्यातच लहान मुलांना कुतुहल पण पालक वर्गात त्याच्या फिरण्याची भीती होती. हा विषय शेवटी जामखेड येथील सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी हाती घेत वन विभागाच्या मदतीने त्या कोल्ह्यास पकडून आपल्या रुग्णवाहिकेच्या मदतीने घरी आणले, नंतर त्याच्यावर माया ममतेची पाखड करत त्याला दूध भाकरी खाऊ घातली व शेवटी वन विभागाच्या मदतीने त्याची पुणे रेक्सु टीमकडे रवानगी केली.सर्वत्र हा एक कुतुहलाचा विषय ठरत आहे.

म ह त्त्वा चे

शिक्षक नसल्याने गावकऱ्यांनी शाळेला ठोकलं कुलूप

बुलढाणा : जिल्हा परिषद शाळांची अवस्था बिकट झाली आहे. कुठे विद्यार्थी नाही तर कुठे शाळेवर शिक्षकच नाही; असे चित्र अनेक शाळांमध्ये पाहण्यास मिळते. अशाच प्रकारचे चित्र बुलढाणा जिल्ह्यातील ग्राम खळद या गावातील पाचवीपर्यंत असलेल्या शाळेवर केवळ एकच शिक्षक कार्यरत आहे. यामुळे संतप्त ग्रामस्थांनी आज शाळेला कुलूप ठोकले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील ग्राम खळद येथे गेल्या कित्येक वर्षापासून एकच शिक्षक १ ते ५ पर्यंत वर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देत असल्याचे समोर आहे आहे. एक शिक्षक व वर्ग पाच अशी स्थिती असल्याने पालकांनी वारंवार याबाबतर जिल्हा परिषदेकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र जिल्हा परिषदेकडून याबाबत कोणत्याही प्रकरणी दखल घेण्यात आली नाही. शाळेवर एकच शिक्षक असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शिक्षक मिळावा यासाठी केलेल्या तक्रारीचा काहीही फायदा झाला होत नसल्याने ग्रामस्थांनी अखेर आज शाळेत धडक देत शाळेलाच कुलूप ठोकले.

उत्सवात मध्यभागात मद्य विक्री बंद

पुणे: गणेशोत्सवाच्या काळात मध्यभागातील मद्य विक्री दुकाने बंद ठेवण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांना पाठविला आहे. उत्सवाच्या काळात खडक, फरासखाना, विश्रामबाग पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील मद्य विक्री दुकाने बंद ठेवण्यात यावी, अशी सूचना मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिसांच्या बैठकीत नुकतीच केली होती. त्यानंतर पोलीस आयुक्तांनी जिल्हा प्रशासनाला प्रस्ताव पाठविला आहे. वैभवशाली परंपरा असलेल्या गणेशोत्सवाचा प्रारंभ शनिवारपासून (७ सप्टेंबर) होणार आहे. गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी महिनाभरापासून पोलिसांनी बंदोबस्ताची आखणी केली होती. पोलिसांनी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला होता. उत्सव काळातील बंदोबस्ताची माहिती देण्यासाठी पोलीस आयुक्तालयात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, शैलेश बलकवडे, उपायुक्त निखिल पिंगळे यावेळी उपस्थित होते.

मला पाडण्यापेक्षा माझ्याच विरोधात उभा रहा

छगन भुजबळांचे मनोज जरांगेंना खुले आव्हान

प्रतिनिधी
नाशिक

मनोज जरांगे यांनी भुजबळ यांना निवडणुकीत पाडू, असे विधान केले होते. या विधानाबद्दल प्रश्न विचारला असता भुजबळ म्हणाले की, मला पाडण्यापेक्षा जरांगेंनी माझ्याच विरोधात निवडणूक लढवावी. मला निवडणुकीत पाडले तरी माझा आवाज बंद होणार नाही. मला मागच्या पाच दशकांपासून संघर्ष करायची सवयच आहे. रस्त्यावर लढण्याची आणि सरकारमध्ये राहून काम करण्याची माझी तयारी आहे. येवला मतदारसंघात कुणीही येवो, पण मी लाखभर मतांनी निवडून येणार. जरांगे पाटील यांनी काहीतरी एकच भूमिका घ्यावी आणि मग बोलावे, अशी टीका छगन भुजबळ यांनी केली.

मराठा आरक्षणासाठी आंदोलन करून नावारुपाला आलेल्या मनोज

जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला इशारा दिला असून आगामी विधानसभेला सत्ताधाऱ्यांचे ११३ आमदार पाडू, असे आव्हान दिले होते. जरांगे पाटील यांचे टीकाकार आणि ओबीसी आरक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या छगन भुजबळ यांना याबद्दल नुकताच प्रश्न विचारण्यात आला. त्यावर भुजबळ यांनी मनोज जरांगे यांना प्रतिआव्हान दिले आहे. मनोज जरांगे यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी २८८ मतदारसंघात उमेदवार उभे करून दाखवावेत, तसेच माझ्या विरोधात येवल्यातून निवडणूक लढवावी, असे छगन भुजबळ म्हणाले आहेत.

छगन भुजबळ हे एका खासगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये बोलत होते. मनोज जरांगेंच्या प्रश्नावर बोलताना ते म्हणाले, रोज रोज भूमिका बदलण्यापेक्षा मनोज जरांगेंनी २८८ उमेदवार उभे करून दाखवावेत. प्रत्येक वेळी भूमिका बदलण्याचे कारण काय? कधी ते उपोषणाला बसतात, दुसऱ्या दिवशी उठतात. आता म्हणतात मुस्लीम समाजाला आरक्षण मिळवून देऊ. पण मुस्लिमांना २५ वर्षांपूर्वीच आम्ही आरक्षण दिलेले आहे. पण माहीत नसल्यामुळे जरांगे पाटील अर्धवट ज्ञानाच्या आधारे बोलतात. आता ते शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर पुढे येणार आहेत. पण माझे त्यांना आवाहन आहे की, त्यांनी एकच काहीतरी करावे.

अडीचशे कोटींची मालमत्ता 29 कोटींमध्ये विकण्याचा आमदार विनय कोरेंचा घाट

सत्यजित पाटलांची ईडीकडे तक्रार

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा शाहूवाडीचे आमदार विनय कोरे यांनी वारणा डेअरी अँड ॲग्रो इंडस्ट्री या कंपनीमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा आरोप ठाकरे गटाचे माजी आमदार सत्यजित पाटील सरूडकर यांनी केला आहे. सत्यजित पाटील सरुडकर यांनी आज पत्रकार परिषद घेत आमदार विनय कोरे यांच्यावर गंभीर आरोप केले. सत्यजित पाटील यांनी कोरे यांची चौकशी करण्यासाठी थेट ईडीकडे तक्रार दाखल केली आहे. पाटील यांनी थेट पंतप्रधान कार्यालयाकडे सुद्धा विनय कोरे यांची ईडीमार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली आहे. कोरे यांनी सुमारे अडीचशे कोटी रुपयांची मालमत्ता केवळ 29 कोटी

मध्ये विकण्याचा कोरे यांचा घाट असल्याचा दावा सत्यजित पाटील यांनी केला आहे.

दरम्यान, शाहूवाडीचे माजी आमदार सत्यजित पाटील-सरूडकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस- शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची कोल्हापूर दौऱ्यात भेट घेतली होती. दोन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी सरूडकर यांना राजकीय मोर्चेबांधणीबाबत सूचना दिल्या होत्या. ठाकरेंच्या शिवसेनेचे माजी आमदार सत्यजित पाटील यांचा महायुतीचा घटक पक्ष असणाऱ्या जनसुराज्य शक्ती पक्षाचे अध्यक्ष विद्यमान आमदार विनय कोरे यांच्याशी पुन्हा एकदा मुकाबला होणार आहे. आधी विनय कोरेंनी सरुडकरांविरुद्ध दोनदा विजय मिळवला असून सरुडकर कोरेंविरुद्ध एकदा विजयी झाले आहेत.

आगामी विधानसभेला या आजी-माजी आमदारांमध्ये चौथ्यांदा लढत होणार आहे. त्यासाठी दोन्ही उमेदवार शह-काटशह देत जोरदार तयारीला लागल्याचे पाहायला दिसत आहे. यादृष्टीने सरुडकरांनी शरद पवार यांची घेतलेली भेट महत्वपूर्ण मानली जात आहे.

मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपूल दुभंगला; अवघ्या दोन महिन्यातच पुलाला पडल्या भेगा

प्रतिनिधी
गोंदिया

दोन महिन्यापूर्वीच वाहतुकीसाठी सुरू करण्यात आलेल्या मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपूलाला मोठ-मोठ्या भेगा पडल्या आहेत. त्यामुळे हा पुलच दुभंगल्याचे चित्र आहे. परिणामी पुलावरून एकेरी वाहतूक करण्याची नामुष्की राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणावर आली असून कामाच्या गुणवत्तेवरही आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्गावर चार वर्षांपूर्वी नागपूर ते देवरीदरम्यान मौदा, मोहघाटा, नैनपूर, मासूलकसा घाट आणि शिरपूर या पाच ठिकाणी जंगल परिसरात वन्यप्राण्यांच्या

आवागमनासाठी भुयारी मार्गाला मंजूरी देण्यात आली.

यानुसार जिल्ह्यातील कोहमारा ते देवरी पर्यंत नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचा जंगल परिसर असल्याने नैनपूर आणि मासूलकसा घाट परिसरात वन्य प्राण्यांना आवागमन करण्याकरिता उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. यात नैनपुर जवळील एक पूल वाहतुकीसाठी दोन महिन्यापूर्वी सुरू करण्यात आला होता. मात्र, दोन महिन्यांतच या उड्डाणपुलावर मोठ-मोठ्या भेगा पडल्याने पुल बंद करण्याची वेळ संबंधित कंपनी आणि महामार्ग प्राधिकरण प्रशासनावर आली आहे.

घरात फूट पडणे समाजाला आवडत नाही

आत्राम पिता-पुत्रीतील संभाव्य बंडावर पवारांचे भाष्य

प्रतिनिधी
गडचिरोली

घर फोडण्याचे काम काही जण करत आहेत, घरात फूड पडणे समाजाला आवडत नाही, मी चूक मान्य केली, तुम्ही ती करु नका, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या कन्या व माजी जि.प. अध्यक्षा भाग्यश्री आत्राम यांच्या कथित संभाव्य बंडावर भाष्य केले. ज्या बापाने जन्म दिला, त्याच्याच विरोधात लढणार का, असं कसं चालेलं, असा सवालही त्यांनी केला.

अहेरी तालुक्यातील आलापल्ली येथे क्रीडा संकुल प्रांगणात ६ सप्टेंबरला दुपारी साडेबारा वाजता अजित पवार यांनी जनसन्मान यात्रेनिमित्त लाडक्या बहिणींसह शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी मंत्री धर्मरावबाबा आत्राम, राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, जिल्हाध्यक्ष रवींद्र वासेकर, रायुकॉ

जिल्हाध्यक्ष लिलाधर भरडकर, माजी पंचायत समिती सदस्य हर्षवर्धनबाबा आत्राम, सिनेट सदस्या तनुश्री आत्राम आदी उपस्थित होते.

भाग्यश्री आत्राम या शरद पवार यांना भेटल्याच्या चर्चा होत्या. त्या अहेरीतून निवडणूक लढविण्याच्या तयारीत असल्याचा कयास आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री धर्मरावबाबा यांनी भरसभेत पहिल्यांदाच जाहीररीत्या भाष्य केले. हा धागा पकडून अजित पवार यांनी स्वत:चे उदाहरण दिले. मात्र, मी चूक मान्य केली, तुम्ही ती करु नका असा सल्लाही त्यांनी भाग्यश्री आत्राम यांना दिला. पुढे ते म्हणाले, लग्नानंतर मुलगी सासरी जाते, पण धर्मरावबाबांनी तुम्हाला बेळगावला न पाठवता येथेच राजकारणात संधी दिली. जिल्हा परिषद अध्यक्ष केले. वस्ताद कुस्तीचे सगळे डाव शिकवतो व एक राखून ठेवतो, असा इशारा त्यांनी दिला. अजूनही वेळ गेलेली नाही, प्रत्येकाची ठराविक वेळ असते, धर्मरावबाबा यांना एकदा संधी द्या, असे आवाहन त्यांनी केले.

आयुष्यभर इतर पक्ष फोडण्याचे काम केल्यानंतर शरद पवार माझे घर फोडायला निघाले आहेत ,असा आरोप मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी केला. कन्या भाग्यश्री आत्राम व जावई ऋतुराज हलगेकर यांना आपल्या पक्षात घेण्यासाठी त्यांनी ताकद लावली आहे.

जिल्हा परिषद शाळा कोचाळे मोखाडा तालुक्यात अव्वल

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमाअंतर्गत पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी
मोखाडा

मोखाडा शाळांची गुणवत्ता सुधारावी , विद्यार्थी, पालक ,शाळा व्यवस्थापन समिती, समाज आणि स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून शाळा विकासाला हातभार लागावा विविध्द विद्यार्थी उपयोगी उपक्रम राबविले जावेत या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

केंद्र स्तर , तालुकास्तर जिल्हा , विभाग आणि राज्य या स्तरावर शाळांचे मूल्यमापन करून शाळांना भव्य बक्षीस ठेवण्यात आले होते . मोखाडा तालुक्यातून नेहमी अनेक उपक्रमात आग्रेसर आसलेली जिल्हापरिषद ISO शाळा कोचाळे केंद्र किनिस्ते ही शाळा मोखाडा तालुक्यातून प्रथम, जिल्हा परिषद आध्यक्ष प्रकाश निकम , राज्यमंत्री दर्जा , आमदार सुनील भुसारा , पंचायत समिती मोखाडा सभापती युवराज गिरंधले, उपसभापती प्रदीप

वाघ , गटविकास अधिकारी , आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तीन लाखाचा धनादेश , स्मृती चिन्ह शाल श्रीफळ देवून गौरविण्यात आले .

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळांचे मूल्यमापन ज्या मुद्यावर करण्यात आले त्या मुद्यांना अनुसरून , या मध्ये जिल्हा परिषद शाळा कोचाला शाळेने आपल्या शाळेत अनेक उपक्रम राबविलेआहेत. त्यामध्ये विद्यार्थ्यांन मार्फत वर्गसजावट , शाळेच्या आवारात जवळपास ११० पर्यावरण पूरक वृक्षांची लागवड केलेली आहे . शाळेच्या रंगविलेल्या बोलक्या भिंती , गुण प्रबोधनात्मक सुविचार , तसेच शाळेचं विद्यार्थी मंत्रिमंडळ ही आहे , शालेय मंत्रिमंडळ मार्फत शाळेचे कामकाज चालते , प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजने अंतर्गत शाळेत सुंदर परसबाग तयार केलेली आहे , या परसबागेत हिरवी मिरची , टोमॅटो, वांगी, कढीपत्ता , कांदे यांची लागवड केलेली आहे . सिझन नुसार अनेक भाज्यांची लागवड करून त्यांचा शाळेत पोषण आहारात वापर केला जातो , मेरी माती मेरा देश उपक्रमाअंतर्गत ही शाळेने सक्रिय सहभाग नोंदवला होता . इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत वर्ग आणि १२५ विद्यार्थी संख्या आसलेल्या शाळेत विद्यार्थ्यांना लहान पणापासून आर्थिक बचतीचे धडे मिळावे व आर्थिक साक्षर व्हावे म्हणून शाळेची बचत बँक आहे . बचत बँकेचे सर्व व्यवहार शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थीच पाहतात . प्रत्येक विद्यार्थ्याला पास बुक देण्यात आले आहे . पैशे काढण्यासाठी , भरणा करण्यासाठी स्लीप आहेत . खाउचे पैशे जमा करतात . आणि जेंव्हा काही आडचन भासली तेंव्हा पैशे काढतात ही . „ विद्यार्थी शाळेत उपस्थिती प्रमाण ही जवळपास ९९%आसते . शाळेत वाचनालय आहे सर शनिवारी मुले पुस्तक घेवून घरी जातात व आणून जमा करतात, या वर्षी शाळेने क्रीडा स्पर्धेत तालुका तर समुहागान , नाट्य आणि वकृत्व स्पर्धेत जिल्ह्यापर्यंत मजल मारली होती.

जिल्हा परिषद शाळा कोचाळे शाळा जिल्ह्यामध्ये उपक्रमशील शाला म्हणून प्रसिद्ध आहे . आताच इस्रो बँगलोर येथील जिल्हा परिषद पालघर यांच्या अभ्यास दौऱ्यात या शाळेचे तीन विद्यार्थी आणि मुख्याध्यापक यांचा समावेश होता . शाळेत प्रत्येक उपक्रम राबविताना मुख्याध्यापक दिनकर फसाळे सर , उपशिक्षक राजाराम जोशी , गणेश वाघ , दिनेश ठोमरेसर सर्व शिक्षक शाळा व्यवस्थापन समिती , कोचाळे गावाचे ग्रामस्थ व पालक अतोनात मेहनत घेतात . शालेय प्रशासकीय बाबी, उपक्रम या संबंधी केंद्राचे केंद्रप्रमुख नागू वीरकर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी वसंत महाले साहेब यांचे सदैव मार्गदर्शन लाभते .

सरकारची बदनामी करणं भोवलं

आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात गुन्हा

प्रतिनिधी
संभाजीनगर

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात छत्रपती संभाजी नगरात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरकारची बदनामी केल्याप्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी विजय काळुंखे या तरुणानं तक्रार दाखल केली. आपल्या फायद्यासाठी चुकीची अफवा पसरवत सरकारची बदनामी केल्याचा आरोप विजय काळुंखे या तरुणानं आपल्या तक्रारीत केला.

विजय काळुंखे या युवा व्यावसायिकानं गुरुवारी शरद पवार गट राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात वाळूज एमआयडीसी पोलिसात तक्रार दिली. आव्हाड यांनी त्यांच्या समाज माध्यमावर सरकार विरोधी वक्तव्य केलं होतं. लाडकी बहीण योजनेत महिलांना दीड हजार रुपये देताना आत्महत्या ग्रस्त

शेतकऱ्यांना आर्थिक मदत म्हणून देण्यात येणारे एक लाख रुपये वळवले, असा आरोप केला. मात्र ही माहिती चुकीची असल्याचं विजय काळुंखे यांना वाटलं. त्यांनी याबाबत माहिती घेतली असता, शेतकऱ्यांना मदत देण्याचे सरकारी निर्देश असल्याचं समोर आलं. त्यामुळे जितेंद्र आव्हाड यांनी स्वत:च्या फायद्यासाठी सरकारला बदनाम करण्याचा डाव आखला आहे. लोकांसमोर खोटी माहिती देऊन दिशाभूल केलं जात असल्यानं आपण पोलिसात तक्रार दिल्याचं तक्रारदार युवक विजय काळुंखे यानं सांगितले.

संविधान बदलण्याचा विरोधकांचा अपप्रचार विधानसभा निवडणुकीत चालणार नाही

केंद्रीयमंत्री आठवले यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
अहमदनगर

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेले संविधान कुणाच्या बापाचा बाप आला तरी बदलू शकत नाही हे त्रिवार सत्य जनतेला कळले आहे त्यामुळे लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी संविधान बदलण्याचा धोका असल्याचा अपप्रचार केल्याने महायुती चे थोडेफार नुकसान झाले आता विधानसभा निवडणुकीत मात्र संविधान बदलण्याचा विरोधकांचा अपप्रचार टिकणार नाही असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केले.

अहमदनगर मधील सहकारी सभागृहात संविधान सन्मान सोहळा आणि तिसऱ्यांदा केंद्रीय राज्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ना. रामदास आठवले यांचा अहमदनगरवासियांकडून भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी सत्काराला

उत्तर देताना ना रामदास आठवले बोलत होते.यावेळी विचार मंचावर पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे नेते प्रा. जोगेंद्र कवाडे; आमदार संग्राम भय्या जगताप, प्रा.सुनील मगर, रिपाइंचे जिल्हा अध्यक्ष सुनील साळवे, श्रीकांत भालेराव, विजय वाकचौरे, सुरेंद्र थोरात, राजा कापसे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

महायुती सोबत रिपब्लिकन पक्ष मजबुतीने उभा आहे विधानसभा निवडणुकीत महायुतीचे 180 पर्यंत आमदार निवडून आणण्यासाठी रिपब्लिकन पक्ष महायुतीला साथ देईल.प्रा जोगेंद्र कवाडे आणि मी आम्ही दोघे रिपब्लिकन नेते महायुती सोबत आहोत त्यामुळे महायुती ने रिपब्लिकन पक्षाकडे लक्ष द्यावे ; रिपब्लिकन कार्यकर्त्यांना सन्मान द्यावा अशी सूचना ना.रामदास आठवले यांनी केली.

रिपब्लिकन ऐक्या साठी आम्ही सदैव तयार आहोत.मी केंद्रात मंत्री झाल्यामुळे कवाडे सर मला आमच्या कडे लक्ष द्या म्हणतात पण मी जेंव्हा त्यांच्या कडे लक्ष दिले तेंव्हा ते माझ्यासोबत आले नाहीत 1990 मध्ये ते माझ्या सोबत आले असते तर रिपब्लिकन पक्षाचे 15 जन तरी मंत्री झाले असते मात्र माझ्या सोबत कोणी अन्य गटाचे नेते आले नाहीत त्यामुळे मी एकटाच तेंव्हा मंत्री झालो. राजकारणात कधी कोणाला पाठिंबा द्यायचा हे मला चांगले कळते असे ना. रामदास आठवले म्हणाले. प्रा जोगेंद्र कवाडे यांनी ना.रामदास आठवले तिसऱ्यांदा केंद्रीय राज्यमंत्री झाल्याबद्दल त्यांच्या सत्कारानिमित्त अभिनंदन केले.

मोखाडा शिक्षण विभागाकडून आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी
मोखाडा

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष(राज्य मंत्री दर्जा) प्रकाश निकम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की आज प्राथमिक शिक्षक आपली मुले खासगी इंग्रजी शाळेत शिकवताना दिसतात यामुळे खरतर जेंव्हा शिक्षकाचा मुलगा मराठी शाळेत शिकेल तेंव्हाच खऱ्या अर्थाने शाळांचा दर्जा सुधारेल,मात्र काही शिक्षक अतिशय मेहनती असून चांगले काम करतात आदर्श शिक्षक जिल्हा पुरस्कार सुध्दा मोखाड्यात मिळाला मात्र आता तालुक्यातील शिक्षकाने आता राज्य पुरस्कार मिळवावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आज प्रत्येक सरकारी अधिकारी कर्मचारी यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देताना एक वेगळ्या प्रकारची भावना समाजात दिसून येते मात्र आज शिक्षक दिनी मला एवढच सांगावस वाटत की परिपूर्ण कोणीही नसतो मी ही नाही मात्र आहे त्या परिस्थितीत आपल्या पेशाशी प्रामाणिक राहुन काम करणे

मात्र आपल्या हातात आहे यामुळे तुमच्याकडून या देशाची भावी पिढी चांगली घडावी एवढीच माफक अपेक्षा व्यक्त करतो असे प्रतिपादन विक्रमगड विधानसभेचे आमदार सुनिल भुसारा यांनी केले मोखाडा शिक्षण विभागाकडून तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात आले यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते यावेळी भुसारा यांनी पुढे सांगितले की माझे वडील सुद्धा शिक्षक होते खरतर मोखाडा तालुक्यात अध्यापनाचे काम करताना अनेक अडचणीत शिक्षक काम करीत असतात.यामुळे अगदी काटेकोरपणे तुमच्यावर लक्ष ठेवून आम्हाला कोणत्याही शिक्षक किंवा कर्मचारी यांना अडचणीत आणावयाचे नसते मात्र फक्त आमचे विद्यार्थी ज्ञानी व्हावे यासाठी आपल्यातील सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न आपण करावा असे भुसारा यांनी सांगितले.

यावेळी उपसभापती प्रदीप वाघ यांनी येथील शिक्षण विभागातील अनेक पद रिक्त आहेत अशा स्थितीत सुध्दा शिक्षक चांगले काम करीत आहेत गुणवत्ता ठेवत आहेत मुळात शिक्षक म्हटल की ते व्यक्तिमत्वच आदर्श असते यामुळे शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार ही केवळ औपचारिकता असते सदर व्यक्ती शिक्षक झाला म्हणजेच आदर्श झाला असे सांगितले.मोखाडा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष अमोल पाटील यांनी यावेळी मोखडायाच्या मातीतच एक प्रकारची चिकाटी आणि हुशारी आहे यामुळे माझी यानिमित्याने शिक्षक बांधवांना विनंती आहे की तूम्ही फक्त थोडीशी मेहनत घेण्याची गरज आहे.

यावेळी भाऊ नावळे,लालसिंग पाटील,भूषण गहीवरे,हरिदास भोये,रामनाथ जाधव,राजेश भिसे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आले तर माध्यमिक विभागातून अनिल सोनवणे,मंगला गावीत,सर्व शिक्षा अभियान मधील विजयानंद महिरराव,तर जिल्हा पुरस्कार प्राप्त संतोष पाटील यांचाही सन्मान करण्यात आला.

तर आदर्श शाळा म्हणून डोल्हारा केंद्र शाळा,कळमगांव,कोचाळे,मोहिते कॉलेज,कर्मवीर हायस्कूल मोखाडा,खोच हायस्कूल तसेच आदिवासी हायस्कूल डोल्हारा या शाळांचा सन्मान करण्यात आला आणि बक्षीसही देण्यात आले यावेळी भाजप तालुकाध्यक्ष संतोष चोथे,काँग्रेस तालुकाध्यक्ष जमाशी शेख,अशोक पाटील,नरेंद्र पाटील,वासूदेव खंदारे आदी उपस्थित होते कार्यक्रमाची प्रस्तावना गट शिक्षणाधिकारी वसंत महाले यांनी केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक समन्वय समिती यांनी मेहनत घेतली.

रोनाल्डोने त्याच्या कारकिर्दीतील 900 वा गोल केला

लिस्बन : पोर्तुगालचा स्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोने गुरुवारी क्रोएशियाविरुद्धच्या सामन्यात कारकिर्दीतील 900 वा गोल केला. अशी कामगिरी करणारा तो जगातील पहिला खेळाडू ठरला आहे. एस्टाडिओ दा लुझ स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या नेशन्स लीग स्पर्धेच्या या सामन्यात पोर्तुगालने क्रोएशियाचा 2-1 असा पराभव केला. रोनाल्डोने सामन्याच्या 34व्या मिनिटाला गोल करत ही कामगिरी केली. नुनो मेंडिसच्या क्रॉसवरून गोल करत रोनाल्डोने व्यावसायिक फुटबॉलमध्ये इतिहास रचला. हा टप्पा गाठल्यानंतर रोनाल्डोने त्याच्या फुटबॉल प्रवासाची एक क्लिप सोशल मीडियावर शेअर केली. हा व्हिडिओ शेअर करताना रोनाल्डोने सर्व चाहत्यांचे आभार मानले आहेत. खूप दिवसांपासून हे स्वप्न पाहिलं होतं, ते पूर्ण झाल्याचंही त्यांनी सांगितलं. अजून काही स्वप्ने पूर्ण व्हायची आहेत.

सबालेन्का यूएस ओपनच्या अंतिम फेरीत दाखल

वृत्तसंस्था
■ न्यूयॉर्क

द्वितीय मानांकित अरिना सबालेन्का हिने यूएस ओपन टेनिस चॅम्पियनशिपच्या महिला एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्याचवेळी मिश्र दुहेरी प्रकारात इटलीची सारा इराणी आणि ॲड्रिया वावसारी ही जोडी चॅम्पियन ठरली.

न्यूयॉर्कमध्ये शुक्रवारी, बेलारशियन स्टार सबालेन्का हिने पहिल्या उपांत्य सामन्यात अमेरिकेच्या एम्मा नवारोचा ६-३, ७-६ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. रविवारी तिचा सामना अमेरिकेच्या जेसिका पेगुलाशी होणार आहे. सहाव्या मानांकित जेसिकाने झेक प्रजासत्ताकच्या कॅरोलिना मुचोवाचा 3 सेटपर्यंत चाललेल्या लढतीत 1-6, 6-4, 6-2 असा पराभव केला.

सबालेन्काने उपांत्य फेरीच्या सामन्यात यजमान देशाच्या खेळाडूवर मात केली. त्याने पहिला सेट ६-३ ने जिंकला, जरी दुसऱ्या सेटमध्ये अमेरिकन स्टार नॅवारोने त्याला झुंज दिली. पण सबालेंकाने तिच्या अनुभवाचा फायदा घेत दुसरा सेट टायब्रेकरवर नेला. त्याने हा सेट 7-6 अशा फरकाने जिंकला.

दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात यजमान देशाची सहावी मानांकित खेळाडू जेसिका हिने मुचोवाचा 2 तास 12 मिनिटे चाललेल्या सामन्यात पराभव केला. पहिला सेट 1-6 असा गमावल्यानंतर त्याने 6-4, 6-2 असा दमदार पुनरागमन केले.

पॅरिस पॅरालिम्पिक - उंच उडीत प्रवीण कुमारला ऐतिहासिक सुवर्ण; कपिल परमारला ज्युडोमध्ये कांस्यपदक

वृत्तसंस्था
■ पॅरिस

भारताच्या नावावर आतापर्यंत 26 पदके



पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताने 26 वे पदक जिंकले आहे. प्रवीण कुमारने शुक्रवारी पुरुषांच्या उंच उडी T-64 च्या अंतिम फेरीत सुवर्णपदक जिंकले. त्याने 2.08 मीटर उडी मारून आशियाई विक्रम केला. या पॅरालिम्पिक स्पर्धेतील भारताचे हे सहावे सुवर्ण आहे.

प्रवीण कुमारच्या मदतीने भारत पदकतालिकेत 14 व्या स्थानावर पोहोचला आहे. भारतीय खेळाडूंनी आतापर्यंत 6 सुवर्ण, 9 रौप्य आणि 11 कांस्य पदके जिंकली आहेत. पॅरालिम्पिकमधील भारताची ही सर्वकालीन सर्वोत्तम कामगिरी आहे. यापूर्वी टोकियो पॅरालिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंनी 5 सुवर्णांसह 19 पदके जिंकली होती.

तत्पूर्वी, गुरुवारी रात्री उशिरा कपिल परमारने ज्युडो पुरुषांच्या जे-1 प्रकारात भारताला कांस्यपदक मिळवून दिले होते. त्याने अवघ्या 33 सेकंदात ब्राझीलच्या ॲलिटन डी ऑलिव्हेराचा 10-0 असा पराभव केला. कपिलच्या आधी हरविंदर सिंग आणि पूजा यांच्या मिश्र तिरंदाजी संघालाही कांस्यपदकाचा सामना गमवावा लागला.

भारतीय जुडोका कपिल परमार पुरुषांच्या 60 किलो J1 गटाच्या उपांत्य फेरीत पराभूत झाला. त्याचा इराणच्या खोरम बनिताबाने 10-0 असा पराभव केला. नंतर कपिलने कांस्यपदकाच्या सामन्यात पुनरागमन केले. कांस्यपदकाच्या लढतीत कपिलने ब्राझीलच्या एल्टन डी ऑलिव्हेराचा 10-0 असा पराभव केला.

पॅरा पॉवरलिफ्टिंगमध्ये अशोक सहाव्या स्थानावर

भारताच्या अशोकने पुरुषांच्या पॉवरलिफ्टिंग 65 किलो वजनी गटात सहावे स्थान पटकावले. त्याने दुसऱ्या प्रयत्नात 199 किलो वजन उचलले. चीनच्या यी झाऊने 215 किलो वजन उचलून सुवर्णपदक जिंकले. ग्रेट ब्रिटनच्या मार्क स्वान 213 (किलो) याने रौप्यपदक जिंकले आणि अल्जेरियाच्या बेट्टीर होसेन (209 किलो) ने कांस्यपदक जिंकले.

नीरज चोप्रा डायमंड लीगच्या फायनलसाठी पात्र

पाकिस्तानचा अर्शद नदीम ठरला अपात्र

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय स्टार भालाफेकपटू आणि दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्रा डायमंड लीगच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरला आहे. तर पॅरिस ऑलिम्पिकमध्ये 92.97 मीटर विक्रमी फेक करून सुवर्णपदक जिंकणारा अर्शद नदीम अंतिम फेरीसाठी पात्र ठरू शकला नाही.

डायमंड लीग क्रमवारीतील अव्वल 6 खेळाडू 13 आणि 14 सप्टेंबर रोजी ब्रुसेल्स येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरले आहेत. या स्थितीत नीरज 14 गुणांसह चौथ्या स्थानावर राहिला. तर अर्शद केवळ 5 गुणांसह अंतिम 8 व्या स्थानावर राहिला.नीरज चोप्रा यांच्यासह अँडरसन पीटर्स, ज्युलियन वेबर, जेकब वॉडलेज, एड्रियन मार्डे आणि रॉडरिक जेन्की डीन डायमंड लीगच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

डायमंड लीग स्टँडिंगचे टॉप 6 भालाफेकपटू डायमंड लीगच्या क्रमवारीत, ग्रेनाडाचा अँडरसन पीटर्स 4 स्पर्धांमध्ये 29 गुणांसह प्रथम, जर्मनीचा ज्युलियन वेबर 3 स्पर्धांमध्ये 21 गुणांसह दुसऱ्या स्थानावर आणि चेक प्रजासत्ताकचा जेकब वडलेज 3 स्पर्धांमध्ये 16 गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. दरम्यान, नीरज चोप्रा अवघ्या 2 स्पर्धांमध्ये 15 गुणांसह चौथ्या स्थानावर आहे, मोल्दोव्हाचा अँड्रियन मार्डेरे 4 स्पर्धांमध्ये 13 गुणांसह पाचव्या स्थानावर आहे .

'मुख्यमंत्री योजनादूत'साठी अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील.

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. १३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

मुंबई : शिवसेना कांजुर शाखेच्यावतीने मॉसाहेबाच्या स्मृती दिनानिमित्ताने जीवन विद्या मिशन वामनराव पै महाराज यांच्या महिला भजन मंडळाचा कार्यक्रम आयोजित करुन माँसाहेबाना श्रध्दांजली वाहण्यात आली. बाबा कदम, सिध्दी जाधव, मामी मंचेकर, भारती शिंगटे, सुनंदा फडके, मनिषा पाटील, कल्पना यादव, विजय तोडणकर, सुनंदा शिंदे, जयश्री पाटील, सुप्रिया तानवडे, शिल्पा खताते, संतोष घाडीगांवकर, सुभाष वर्दम, नरेश माणगांवकर इ. कार्यकर्ते उपस्थित होते.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाचा विक्रम

४०,००० हुन अधिक गंभीर रुग्णांचे वाचले प्राण

प्रतिनिधी
■ मुंबई

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीने गेल्या २ वर्षे २ महिन्यात ३२१ कोटींहून अर्थसहाय्य वितरित करुन तब्बल ४० हजाराहुन अधिक गंभीर रुग्णांचे वाचविण्याचा विक्रम केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गोरगरीब - गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून थेट अर्थसहाय्य केले जात आहे. मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रुग्ण हा मदतीविना वंचित राहता कामा नये, या मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार कक्षाचे काम सुरु आहे. याचाच परिणाम म्हणून मु.वै.स.क. मंत्रालय, मुंबई कार्यालयामधून तब्बल २९२ कोटींपेक्षा अधिक तर मु.वै.स.क.,नागपूर कार्यालय मधून २८ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य वाटप करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत मिळवणे सोपे होण्यासाठी कक्षातर्फे विशेष पाऊले उचलण्यात येत आहेत. आता मदत मिळवण्यासाठी मुंबईत मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहीलेली नाही. सहायता कक्षाच्या 8650567567 या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून थेट मोबाईलवर अर्ज उपलब्ध करुन दिला जात आहे. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मध्ये रुग्णालय अंगीकृत करण्याची आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मधून रुग्णांनी अर्थसहाय्य मिळविण्याची प्रक्रिया संपूर्णतः निःशुल्क आहे. याबाबत जनजागृती करुन जास्तीत जास्त रुग्णालये या योजनेत जोडण्यात येत आहे.

दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष प्रमुख मंगेश नरसिंह चिवटे यांनी केले आहे.

पालिका सहाय्यक आयुक्त विनायक विसपुते यांची पालिका आयुक्तांकडे 100 विकासकांनी केली तक्रार

काँग्रेसची निलंबनाची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील १०० पेक्षा अधिक विकासकांनी मुंबई महापालिका आयुक्त यांना पत्र लिहून सहाय्यक आयुक्त विनायक विसपुते यांच्यावर भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराचा गंभीर आरोप केला आहे. विसपुते यांच्याकडे मालमत्ता विभागासह खार एच-पश्चिम विभागाचा कार्यभार आहे. विसपुते यांनी विनाकारण दीर्घकाळ विकास प्रस्ताव प्रलंबित ठेवले. त्यामुळे अशा भ्रष्ट अधिकाऱ्याला तातडीने निलंबित करावे, अशी मागणी मुंबई प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहसीन हैदर यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली आहे.

विसपुते हे पुनर्विकास प्रस्तावाच्या फायलींवर बसून पैशांची मागणी करत असल्याचे पत्रात व्यवसायिकांनी नमूद केले आहे. विकासकांमध्ये भीती निर्माण करण्यासाठी विसपुतेचा विकास प्रस्तावांना विनाकारण उशीर करत आहेत. विसपुते यांनी विलंबाची क्षुल्लक कारणे दाखवली. अस्तित्वात नसलेल्या समस्यांचा उल्लेख केला.

जोपर्यंत विकासक भेटत नाही आणि रक्कम निश्चित करत नाही तोपर्यंत ती फाइल पास केली जात नाही. गेल्या तीन महिन्यांपासून हा प्रकार सुरू आहे. असेही हैदर यांनी सांगितले.

महानगरपालिका राज्य सरकारमार्फत चालवली जात आहे. तेव्हापासून विसपुते यांना राजकीय आशीर्वाद मिळत आहे. हे प्रकरण सामान्य नाही, विसपुते यांच्या विरोधात १०० पेक्षा अधिक विकासकांनी पत्रावर स्वाक्षरी केली होती.व तशी तक्रार नोंदवली होती, या तक्रारीची गंभीर दखल घेतली नाही.

हे प्रकरण गंभीर असल्यामुळे प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, तोपर्यंत विसपुते यांना निलंबित करण्यात यावे, अशी मागणी मोहसीन हैदर यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली आहे.

राज्य सरकारने कोविड भत्ता व ॲरीयर्सच्या रकमेचा धनादेश देऊनही बेस्ट कामगारांना अद्याप रक्कम मिळाली नाही

प्रतिनिधी
■ मुंबई

कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी

शुक्रवार 26 जुलै 2024 रोजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली यशवंत नाट्य मंदिरात कार्यपूर्ती सोहळयात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व कामगारांच्या समोर सभागृहामध्ये दोन धनादेश बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर यांच्याकडे देण्यात आले होते. एक धनादेश 78 कोटीचा कोविड भत्ता म्हणून व दुसरा धनादेश 332 कोटीचा एरियस म्हणून देण्यात आला होता. पण त्यानतंर अद्याप बेस्ट कामगारांना कोविड भत्ता व एरियस मिळालेला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. ही नाराजी बेस्ट कामगार अब्दुल दर्जी यांनी एका पत्राद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांना कळविली आहे.

कृपया या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पाठपुरावा करावा व कर्मचाऱ्यांसाठी धनादेश देऊन देखील त्यांना पैसे का दिले नाही यासंदर्भात चौकशी करावी व जे दोषी आहेत त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात यावी अन्यथा बेस्ट उपक्रमाचे कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय हे महायुती सरकारच्या पाठीशी उभे राहणार नाहीत व महायुती सरकारला कधीच सहकार्य करणार नाहीत. घरोघरी आता गणपतीच्या आगमन होणार आहे कृपया करून आता तरी कामगारांच्या खात्यामध्ये त्यांच्या हक्काचे पैसे जमा करावेत ही हात जोडून महायुती सरकारला विनंती आहे. असे अब्दुल दर्जी यांनी म्हटले आहे.

या कार्यक्रमाला आमदार अँड.आशिष शेलार , प्रवीण दरेकर , प्रसाद लाड , बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर , आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी साहेब देखील उपस्थित होते. बेस्ट उपक्रमाकडे पैसे नव्हते त्यामुळे कोविड भत्ता व एरियास चे पैसे कामगारांना देण्यास ते असमर्थ होते. ही बाब लक्षात घेऊन प्रसाद लाड यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करून व बेस्ट कर्मचाऱ्यांच्या परिवाराची आर्थिक स्थिती हालाखीची आहे व त्यांना आर्थिक बळ देण्यासाठी त्यांच्या हक्काचे पैसे त्यांना भेटले पाहिजेत अशी मागणी केली व निधी मंजूर करून घेतला. व कार्यक्रमात धनादेश ही दिला.

बेस्ट उपक्रमाच्या इतिहासामध्ये आजपर्यंत एवढा मोठा राजकीय कार्यक्रम झाला नव्हता हजारो संख्येने बेस्ट उपक्रमाचे कर्मचारी सभागृहामध्ये उपस्थित होते त्यांना आशा होती यावेळेस तरी आपल्याला मेहनतीचे व हक्काचे पैसे भेटतील परंतु सगळयांच्या समोर धनादेश देऊन देखील बेस्ट कर्मचाऱ्यांना आतापर्यंत कोविड भत्ता व एरियस भेटलेला नाही. धनादेश दिल्यानंतर कामगारांना कमीत कमी चार ते पाच दिवसांमध्ये त्यांच्या हक्काचे पैसे मिळाले पाहिजे होते. 26 जुलै 2024 रोजी थाटामाटात कार्यक्रम करण्यात आला आश्वासने देण्यात आली बेस्ट कर्मचाऱ्यांमध्ये उत्साह व नवीन आशा निर्माण करण्यात आली परंतु इतर सरकारप्रमाणे या सरकारने देखील कामगारांची नुसती चेष्टा केली आहे त्यांची फसवणूक केली आहे. कामगारांसाठी पैशाचा धनादेश दिलेला असताना देखील कामगारांना त्यांचे हक्काचे पैसे आतापर्यंत देण्यात आलेले नाहीत आता काय अडचण आली ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

मध्य रेल्वेच्या गणपती उत्सवासाठी मुंबई ते कुडाळपर्यंत अनारक्षित 4 विशेष गाड्यांच्या अतिरिक्त फेऱ्या

प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वे आगामी गणपती उत्सवादरम्यान गणपती भक्तांसाठी मुंबई ते कुडाळपर्यंत ४ अतिरिक्त अनारक्षित गणपती विशेष गाड्या चालवणार आहे:छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-कुडाळ 01181/01182 अनारक्षित विशेष – २ फेऱ्या 01181 अनारक्षित विशेष गाडी ७.९.२०२४ (शनिवार) रोजी १५.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सुटेल आणि कुडाळ येथे दुसऱ्या दिवशी ०३.३० वाजता पोहोचेल. तर 01182 अनारक्षित विशेष गाडी ८. ९.२०२४ (रविवार) रोजी ०४.३० वाजता कुडाळ येथून सुटेल आणि त्याच दिवशी १६.४० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे पोहोचेल.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-कुडाळ 01103/01104 अनारक्षित विशेष - २ फेऱ्या 01103 अनारक्षित विशेष गाडी ८.९.२०२४ (रविवार) रोजी १५.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई मुंबई येथून सुटेल आणि कुडाळ येथे दुसऱ्या दिवशी ०३.३० वाजता पोहोचेल. तर 01104 अनारक्षित विशेष गाडी ९.९.२०२४ (सोमवार) रोजी ०४.३० वाजता कुडाळ येथून सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई त्याच दिवशी १६.४० वाजता येथे पोहोचेल.या गाडीला दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा. माणगाव, वीर, खेड, चिपळूण, कामठे, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव, कणकवली आणि सिंधुदुर्ग हे थांबे देण्यात आले आहेत.

या सर्व गाड्या अनारक्षित म्हणून चालतील आणि अतिजलद मेल/एक्स्प्रेस गाड्यांसाठी लागू असलेल्या सामान्य शुल्कासह, सुटण्यापूर्वी यूटीएस प्रणालीद्वारे बुक केल्या जातील.

मुंबई : श्रीगणेशोत्सव अंतर्गत स्वराज्य भूमी (गिरगांव चौपाटी) येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या डी विभागामार्फत भाविकांसाठी विविध नागरी सेवा-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी स्वराज्यभूमीला भेट देवून संपूर्ण व्यवस्थेची पाहणी केली व योग्य ते निर्देश दिले. सहायक आयुक्त श्री. शरद उघडे, संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
कार्यकारी अभियंता, प्रकल्प विद्युत विभाग, मुंबई
बांधकाम भवन, ५ वा मजला, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१.
सत्यमेव जयते
ई-मेल -elagriconst5.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी क्र. : 022-22013784

ई निविदा सुचना क्र. ०७ सन २०२४-२५

कार्यकारी अभियंता, प्रकल्प विद्युत विभाग, सा.बां. विभाग, यांचे कार्यालय, बांधकाम भवन, ५ वा मजला, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१ हे सविस्तर निविदा सूचनेमध्ये नमूद प्रमाणे कामांच्या विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदाराकडून ब-१ ई निविदा मागवित आहोत. को-या निविदाच्या कामाची https://mahapwd.gov.in (Pay PWD Online) वर दि. ०६.०९.२०२४ रोजी पासून दि.२०.०९.२०२४ रोजी पर्यंत ऑनलाईन डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध होतील व पूर्ण भरुन निविदा दि. २३.०९.२०२४ पूर्वी किंवा त्याच दिवशी १३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन निविदेच्या ठोक प्रती स्विकारल्या जातील. शक्य झाल्यास निविदा दि. २३.०९.२०२४ रोजी १४.०० वाजता कार्यकारी अभियंता, प्रकल्प विद्युत विभाग, सा.बां. विभाग, मुंबई यांचे कार्यालयात उघडल्या जातील. ज्या ठेकेदारांनी निविदा घेतली असेल अशा ठेकेदारांनी अथवा त्यांच्या प्रतिनिधीनी ओळखपत्रा सह उपस्थित रहावे. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, प्रकल्प विद्युत विभाग, सा.बां. विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारण्यात येणार नाही.

Name Of Work:
1. Est No OW/55P04-10 /2023-24, Providing UPS to MASWAN Department on 11th Floor at New Administrative Building, Mumbai. Rs.4,55,271/-
2. Est PESD / CAMA/OW/4517/2024-25, Providing renovation to EI work with Fittings, Fans, etc at One stop centre at Cama & Albless Hospital, Mumbai Rs.3,91,387/-
3.Est PESD/NAB/SR/4206/2024-25, Providing Semi-Skilled Labour as Pump Operator at New Administrative Building, Mumbai Rs.3,27,960/-

कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास नोटीसची प्रत विनामुल्य मिळू शकेल.
जा.क्र. काअ / प्रविवि/नि.लि./ ८८३ /२०२४, दिनांक ०४/०९/२०२४

सही/-
कार्यकारी अभियंता
प्रकल्प विद्युत विभाग
सा.बां. विभाग, मुंबई

डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी२७४८

व्यवस्थापन समिती निवडणूक सन २०२४ ते २०२९ या कालावधीकरिता
निवडणूक कार्यक्रम

संस्थेचे नाव व पत्ता : **शालीमार डायमंड को. ऑप. हौ. सोसायटी लि.**, सायन्स गार्डनचे मागे, आगाशी रोड, विरार (प), ता : वसई, जि. पालघर.
नोदणी क्र. टीएनए (बीएसआई) एचएसजी)/३२७२/१९८९-९०)

अ.क्र.	तपशिल	दिनांक	वेळ	ठिकाण
१	प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करणे फॉर्म ई -३	०६ सप्टेंबर २०२४		सोसायटीचे आवारात
२	नावामध्ये काही बदल असल्यास १ ते १० दिवसाच्या आत मुख्य सदस्याचे सहीने निवडणूक निर्णय अधिकारी / प्रतिनिधी यांचेकडे लेखी अर्ज करणे	०६ सप्टेंबर २०२४ ते १६ सप्टेंबर २०२४	संध्या. ५.०० ते ६.००	निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय
३	अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे फॉर्म ई - ३ (१)	१७ सप्टेंबर २०२४	संध्या. ५.०० वाजता	सोसायटीचे आवारात
४	नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकृत करणे	१८ सप्टेंबर २०२४ ते २३ सप्टेंबर २०२४ (रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून)	संध्या. ५.०० ते ६.००	प्रेमवल्लभ सभागृह, युनिक रश्मी शॉपिंग सेंटर, देसाई हॉस्पिटल जवळ, आगाशी रोड, विरार (प), ता. वसई
५	प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिद्ध करणे	२३ सप्टेंबर २०२४	संध्या. ०६.०० नंतर	सोसायटीचे आवारात
६	नामनिर्देशन पत्रांची छाननी	२४ सप्टेंबर २०२४	संध्या. ५.०० पासून संपेपर्यंत	प्रेमवल्लभ सभागृह, विरार (प), ता. वसई
७	छाननीनंतरची वैध नामनिर्देशन यादीची प्रसिद्धी	२५ सप्टेंबर २०२४	संध्या. ५.०० वा	सोसायटीचे आवारात
८	वैध नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा दिनांक	०९ ऑक्टोबर २०२४	संध्या. ५.०० ते ६.००	निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय
९	अंतिम उमेदवार यादी तथा निवडणूक चिन्ह वाटप	१० ऑक्टोबर २०२४	संध्या. ५.०० ते ६.००	प्रेमवल्लभ सभागृह, विरार (प)
१०	निवडणूकीची तारीख	२० ऑक्टोबर२०२४	सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वा.	प्रेमवल्लभ सभागृह, विरार (प), ता. वसई
११	मतमोजणीचा दिनांक व निवडणूक निकाल	त्याच दिवशी मतमोजणी संपल्यानंतर दुपारी १.१५ पासून		प्रेमवल्लभ सभागृह, विरार (प)

निवडावयाच्या जागा

सर्वसाधारण जागा	आरक्षित- अनु. जाती / जमाती	वि.जा., भ.ज. किंवा विशेष मागास वर्ग	इतर मागास वर्ग	महिला प्रवर्ग	एकूण
६	१	१	१	२	११

- अधिक माहितीसाठी निवडणूक निर्णय यांच्या कार्यालयाचा पत्ता : शॉप. नं: - २२, प्राची अपार्टमेंट, जैन मंदिर रोड, श्रेया हॉटेलच्या मागे, जैन मंदिर समोर, विरार (प), मोबाईल नं :- ९८५००८५७१२ / ७३०३६५१००७.
- निवडणूक प्रक्रियेबाबत सर्व माहिती सविस्तर नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केली आहे.

दिनांक : ०६/०९/२०२४
ठिकाण : विरार (प)

शिक्का

सही/-
अनिल अं. गायकवाड,
निवडणूक निर्णय अधिकारी,
सहकारी संस्था, ता. वसई, जि. पालघर

भरदिवसा फुटपाथवर महिलेवर बलात्कार; लोक बनवत राहिले व्हिडीओ

उज्जैन : मध्य प्रदेशातील उज्जैनमध्ये माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. भरदिवसा झालेल्या बलात्काराचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागला आहे. हा व्हिडीओ कोयला फाटक भागातील आहे. या व्हिडीओवरून राजकारण तापलं आहे. काँग्रेसचे नेतेही आक्रमक झाले आहेत. पोलिसांनी कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. उज्जैनच्या कोयला फाटक परिसरात एका महिलेवर झालेल्या बलात्काराचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हा व्हिडीओ दुपारचा आहे. रस्त्यावर एका तरुणाकडून तरुणीवर बलात्कार करण्यात आला आहे. महिलेला मदत करण्याऐवजी लोक व्हिडीओ बनवण्यात व्यस्त असलेले पाहायला मिळत आहेत. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच काँग्रेस नेत्यांनी भाजपा सरकारवर जोरदार आरोप करण्यास सुरुवात केली. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत प्रदेश काँग्रेस अध्यक्ष जितू पटवारी यांनी मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्यावर हल्लाबोल केला आहे.

बसची टेम्पोला जोरदार धडक; अपघातात 12 ठार

तेराव्याचा कार्यक्रम आटोपून परतत होते घरी

वृत्तसंस्था
हातरस

हातरसमधील चांदपा कोतवाली परिसरात शुक्रवारी सायंकाळी भीषण अपघात झाला. चांदपा कोतवाली परिसरातील मीताई बायपासवर अलीगड डेपोची बस लोडर टेम्पोला धडकली. टेम्पोमध्ये महिला, पुरुष आणि लहान मुलं प्रवास करत होते. या भीषण अपघातात 12 जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली. तर तब्बल 16 जण यात गंभीर जखमी झाले आहेत.

प्रवासी बस ही टेम्पोलो जोरात धडकल्यानं भीषण अपघात झाला. या अपघातात अनेकजण गंभीर जखमी झाले असून, त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलंय. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचलं. पोलीस अधीक्षक निपुण अग्रवाल, जिल्हा दंडाधिकारी आशिष कुमार, सीओ हिमांशू माथूर पोलीस दलासह घटनास्थळी दाखल झाले.

"आग्रा-अलिगड राष्ट्रीय महामार्गावर ओव्हरटेक करताना रोडवेजच्या बसनं लोडर टेम्पोला धडक दिली. या अपघातात 12 जणांचा मृत्यू झाला असून 16 जण जखमी झाले आहेत. त्यापैकी ४ जणांची प्रकृती चिंताजनक असून, त्यांना उच्च केंद्रात पाठवण्यात आलंय," अशी माहिती जिल्हा दंडाधिकारी आशिष कुमार यांनी दिली.

"अपघातातील सर्व जखमी सासनीहून खंडौलीकडं जात होते. चालकाला अटक करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचबरोबर मृतांची ओळख पटवली जात आहे. तेराव्याचा कार्यक्रम आटोपल्यानंतर जवळपास ३० लोक टेम्पोमधून आपापल्या घरी परतत होते. या टेम्पोमध्ये लहान मुलं, महिला आणि वृद्धांचाही समावेश होता," अशी माहिती पोलीस अधीक्षक निपुण अग्रवाल यांनी दिली.

पोकर आणि रमी हे स्किलचे गेम, जुगार नाही : हायकोर्ट



वृत्तसंस्था
अलाहाबाद

पोकर (पत्यांचा खेळ) आणि ऑनलाइन रमी हे जुगार नाहीत तर कौशल्याचे खेळ आहेत. अशा मनोरंजक खेळांवर बंदी आणण्यासाठी अधिकाऱ्यांना ठोस पुरावे रेकॉर्डवर आणावे लागतील, अशी टिप्पणी अलाहाबाद उच्च न्यायालयाने केली. पुरावे आणल्यास अधिकारी कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई केली जाऊ शकते, असंही हायकोर्टाने नमूद केलं. त्याचबरोबर याचिकाकर्त्याला गेमिंग सेंटर उघडण्याची परवानगी देखील दिली.

अलाहाबाद येथील एका व्यावसायिकाला शहरात पोकर आणि रमी गेमिंग युनिट सुरु करण्यासाठी परवानगी हवी होती. यासाठी त्याने कायदेशीरित्या पोलिसांकडे अर्ज केला. मात्र, पोलिसांनी हा जुगार असल्याचं सांगत व्यावसायिकाचा अर्ज नामंजूर केला. पोलिसांच्या या निर्णयाविरोधात व्यावसायिकाने अलाहाबाद हायकोर्टात धाव घेत याचिका दाखल केली.

या याचिकेवर न्यायमूर्ती शेखर बी. सराफ आणि न्यायमूर्ती मंजीव शुक्ला यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. कोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेतला. अशा खेळांचे दुकाने उघडण्याला परवानगी दिल्याने शहरात शांतता आणि सुव्यवस्था बिघडू शकते या कारणावरुन आम्ही परवानगी नाकारली. हा जुगाराचाच एक भाग आहे, असा युक्तीवाद पोलिसांच्या वकिलांनी केला.

दुसरीकडे याचिकाकर्त्याच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या निर्णयांचा हवाला दिला. ते म्हणाले, पोकर आणि रमी हे कौशल्याचे खेळ असून ते जुगारात येत नाही. पोलिसांनी केलेला दावा खोटा असून यामुळे शहरात कायदा आणि सुव्यवस्था बिघडू शकत नाही. त्यामुळे खेळाला परवानगी न देण्याचा निर्णय हा बेकायदेशीर आहे.

याचिकाकर्त्यांच्या वकिलांचा युक्तिवाद लक्षात घेऊन कोर्टाने सांगितले की, पोकर आणि रमी यांना जुगाराच्या श्रेणीत ठेवता येणार नाही. हा एक कौशल्याचा खेळ म्हणून ओळखला जाऊ शकतो. त्यामुळे अधिकाऱ्यांनी आधी अशा प्रकरणांची सखोल चौकशी करावी. केवळ अनुमानाच्या आधारे त्यांना परवानगी नाकारू नये.

पान १ वरुन

तुम्ही देव आहात की नाही हे स्वतः ठरवू नका

त्या वक्तव्यावरुन विरोधकांनी त्यांच्यावर निशाणी साधला होता. आता सरसंघचालक मोहन भागवत यांनी लगावलेला टोला मोदींसाठी तर नाही ना? अशी चर्चा होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वी दिलेल्या एका मुलाखतीदरम्यान "माझा जन्म जैविक प्रक्रियेतून झाला नसल्याचं विधान केलं. माझा जन्म जैविकदृष्ट्या झालेला नाही. मला ईश्वरानं आपलं कार्य पूर्ण करण्यासाठी पाठवलं", असं मोदी म्हणाले होते. मोहन भागवत यांनी यावेळी जातीय हिंसाचाराच्या आगीत होरपळणाऱ्या मणिपूरच्या स्थितीवरही भाष्य केलं. ते म्हणाले, "मणिपूरमधील कठीण परिस्थितीतही आपण कणखरपणे उभे आहोत. संताप, क्रोध, द्वेष विसरून नागरिकांमधील संघर्ष थांबावा म्हणून सर्व घटकांशी संवाद साधत आहेत. मणिपूरमधील द्वेषाची आग भडकू न देता शांत करता आली पाहिजे. ही परिस्थिती कशी बदलवता येईल, याचा कृतीशील विचार आवश्यक आहे."

श्री गणरायाचे आगमन समृद्धी- समाधानाचे पर्व घेऊन येवो

श्रीगणेशाच्या कृपेनं आपला महाराष्ट्र विकसित भारताचेही नेतृत्व करेल, यासाठी एकजुटीने प्रयत्न करूया. श्री गणरायाचे आगमन महाराष्ट्रातील घरा-घरात सुख, समृद्धी घेऊन येईल. कुटुंबातील सगळ्यांच्या इच्छा-आशा-आकांक्षा पूर्ण करेल. विघ्नहर्त्याचं आगमन निसर्गाची अवकृपा, आणि अन्य सगळी विघ्न दूर करेल. श्री गणेशाचं अखंड कृपाछत्र कृपाछत्र महाराष्ट्रावर राहावे,अशी मनोकामना करून, मुख्यमंत्र्यांनी राज्यातील नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

विनेश फोगाट-बजरंग पुनिया काँग्रेसमध्ये सामील

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

कुस्तीपटू विनेश फोगाट आणि बजरंग पुनिया यांनी हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या 30 दिवस अगोदर शुक्रवार, 6 सप्टेंबर रोजी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. विनेश जुलाना मतदारसंघातून निवडणूक लढवणार हे निश्चित मानले जात आहे. त्याचबरोबर बजरंगही निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे.

याआधी दोघांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली आणि त्यानंतर काँग्रेस मुख्यालय गाठले. राज्यात एकाच टप्प्यात 5 ऑक्टोबरला मतदान होणार आहे. 8 ऑक्टोबरला निकाल लागणार आहे. काँग्रेसमध्ये येण्यापूर्वी विनेश आणि बजरंग यांनी रेल्वेची नोकरी सोडली. दोघेही ओएसडी स्पोर्ट्स पदावर होते.

विनेश फोगाट म्हणाली- वाईट काळात तुमच्यासोबत कोण आहे, हे तुम्हाला कळते 'सर्वप्रथम मी देशवासीयांचे आणि माध्यमांचे आभार मानू इच्छिते. मी काँग्रेस पक्षाची खूप आभारी आहे की वाईट काळात आपल्यासोबत कोण आहे हे कळते. आंदोलनादरम्यान आम्हाला रस्त्यावर ओढले जात होते, तेव्हा भाजप वगळता देशातील प्रत्येक पक्ष आमच्यासोबत होता. मला अभिमान वाटतो की, मी अशा पक्षात आहे, जो महिलांवरील अन्याय आणि गैरवर्तनाच्या विरोधात उभा आहे.

भाजपने हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला की, आम्ही जळलेली काडतुसे आहोत, मी राष्ट्रीय खेळले. लोक म्हणाले की मला ट्रायल न देता ऑलिम्पिकला जायचे आहे, पण मी ट्रायल दिली. मी ज्या गोष्टींचा सामना केला, त्याचा सामना इतर खेळाडूंना करावासा वाटत नाही. बजरंगवर चार वर्षांची बंदी. त्यांनी आवाज उठवल्यामुळेच हे करण्यात आले. केवळ बोलून चालणार नाही तर मनापासून काम करू. मला माझ्या बहिणींना सांगायचे आहे की मी तुमच्या पाठीशी उभी आहे.

बजरंग पुनिया म्हणाले- काँग्रेस पक्ष आमच्या पाठीशी उभा आहे 'आज आमचा उद्देश फक्त राजकारण करणे होता, असे बोलले जात आहे. आम्ही त्यांना (भाजप) पत्र पाठवले होते. आमच्या मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या वेळी काँग्रेस पक्ष आमच्या पाठीशी उभा राहिला. कुस्ती, शेतकरी चळवळ, आमची चळवळ यात आम्ही जेवढी मेहनत केली तेवढीच मेहनत इथेही करू.

कमला राष्ट्राध्यक्ष झाल्यास इस्रायलचे अस्तित्व संपुष्टात

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला की, उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस निवडणूक जिंकून राष्ट्राध्यक्ष झाल्या तर इस्रायलचे अस्तित्व संपुष्टात येईल. गुरुवारी लास वेगासमध्ये रिपब्लिकन ज्यू कोलिशनच्या वार्षिक परिषदेला संबोधित करताना ट्रम्प यांनी ही माहिती दिली.

रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार ट्रम्प यांनी दावा केला की, कमला राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर त्या इस्रायलला विसरतील. यानंतर दहशतवादी सैन्य ज्यूंना त्यांच्या भागातून बाहेर काढण्यासाठी युद्ध सुरू करतील. ट्रम्प म्हणाले की, ज्यूंना हे समजून घ्यावे लागेल. तुम्हा सर्वांना हे तुमच्या लोकांना समजावून सांगावे लागेल, असे त्यांनी तेथे उपस्थित लोकांना सांगितले. कारण त्यांना हे सर्व माहीत नाही. ते काय करणार आहेत हेही त्यांना कळत नाही.

ज्या ज्यूंनी त्यांना मत दिले त्यांची मने तपासा, त्यांच्यासाठी डेमोक्रॅट हा सर्वात मोठा धोका

ट्रम्प म्हणाले, मी अध्यक्ष झालो तर ज्यूविरोधी संस्थांना मिळणारा निधी थांबवतो ट्रम्प म्हणाले की, ते अध्यक्ष झाले तर गाझासारख्या प्रत्येक दहशतवादी तळावर निर्वासितांचा प्रवेश थांबवतील. सरकारी मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या 'हमास समर्थक' गुंडांना ते तुरुंगात टाकतील. सेमिटिझमला प्रोत्साहन देणाऱ्या संस्था आणि विद्यापीठांना मिळणारा निधी थांबवेल आणि त्यांची मान्यता रद्द करेल.

ट्रम्प म्हणाले, 'मला माहिती नाही की त्यांना (डेमोक्रॅटिक पक्ष) कोणी कसे समर्थन देऊ शकेल. जर तुम्ही ज्यू असाल आणि त्यांना पाठिंबा देत असाल तर तुम्ही तुमचे मन तपासले पाहिजे. ते तुमच्याशी खूप वाईट वागले.'

ट्रम्प म्हणाले, 'मी प्रामाणिकपणे सांगू शकतो की आम्हाला 2016 मध्ये 25% मते मिळाली, 2020 मध्ये 26% मते मिळाली, तर मी कोणत्याही डेमोक्रॅटिक राष्ट्राध्यक्षांपेक्षा इस्रायलसाठी जास्त केले आहे. यावेळी 50% ज्यू मते मिळवण्यात ते यशस्वी होतील, अशी आशा ट्रम्प यांनी व्यक्त केली. माजी राष्ट्रपती म्हणाले की जे लोक त्यांना मतदान करत आहेत त्यापैकी 50% ज्यू आहेत. ते इस्रायलचा द्वेष करतात. ज्यूंना आवडत नाही. तरीही ते त्याला कसे मतदान करत आहेत? अध्यक्ष असताना ज्यूंना अधिक सुरक्षित वाटले, असा दावा त्यांनी केला.

गोमांस विकल्याच्या संशयावरून व्यक्तिला मारहाण; १९ जणांवर गुन्हा

पाटणा । गोमांस विकल्याच्या संशयावरून काही अज्ञात तरुणांनी मुस्लीम व्यक्तिला मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बिहारच्या समस्तीपूरमध्ये ही घटना घडली. याप्रकरणी एकूण १९ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना अटकही करण्यात आली आहे. १६ ऑगस्ट रोजी ही घटना घडली. या मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर हा संपूर्ण प्रकार उजेडात आला. १६ ऑगस्ट रोजी दुपारी रहिमाबाद गावातील ५४ वर्षीय सरजुलुम कुरेशी नामक व्यक्ती त्याचे मटणांचे दुकान बंद करून घरी जात होता. त्यावेळी बांगरा रेल्वे क्रॉसिंगजवळ अचानक काही तरुणांनी त्याला अडवण्याचा प्रयत्न केला.यावेळी त्याच्याजवळ असलेल्या पिशवीत काय? अशी विचारणा करण्यात आली आहे. त्यानंतर तू गोमांस विकतो, असं म्हणत त्यांना मारहाण करण्यात आली. तसेच त्याच्या जवळ असलेले साडेसहा हजार रुपये सुद्धा त्यांनी हिसकून घेतले.

कोलकाता येथे संदीप घोषच्या 6 ठिकाणांवर ED चे छापे

आरजी करच्या माजी प्राचार्यावर आर्थिक अनियमिततेचा आरोप

वृत्तसंस्था
कोलकाता

कोलकात्याच्या आरजी कार मेडिकल कॉलेजचे माजी प्राचार्य संदीप घोष यांच्यावर आर्थिक अनियमिततेचा आरोप आहे. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. शुक्रवारी ईडीने घोष यांच्या घरासह 6 ठिकाणी छापे टाकले.

दुसरीकडे सीबीआयही या प्रकरणाचा तपास करत आहे. 13 ऑगस्ट रोजी कलकत्ता उच्च न्यायालयाने आरजी कर बलात्कार-हत्या प्रकरणाचा तपास आणि रुग्णालयातील आर्थिक अनियमितता सीबीआयकडे सोपवली होती. सीबीआय तपासाविरोधात घोष यांच्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.

सीबीआयने २ सप्टेंबर रोजी घोष यांना अटक केली होती. ते आठ दिवसांच्या सीबीआय कोठडीत आहेत. पश्चिम बंगालच्या आरोग्य विभागाने घोष यांना निलंबित केले आहे. यापूर्वी 28 ऑगस्ट रोजी इंडियन मेडिकल असोसिएशनने (IMA) संदीप घोष यांचे सदस्यत्व रद्द केले होते.

दरम्यान, 5 सप्टेंबर रोजी सीबीआयच्या तपासात असे समोर आले की, प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार-हत्येच्या दुसऱ्याच दिवशी संदीप घोष यांनी सेमिनार हॉलच्या शेजारील खोल्यांचे नूतनीकरण करण्याचे आदेश दिले होते. प्रशिक्षणार्थी डॉक्टरचा मृतदेह 9 ऑगस्ट रोजी सकाळी सेमिनार हॉलमध्ये आढळून आला.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीबीआयला अशी कागदपत्रे मिळाली आहेत की संदीप घोष यांनी 10 ऑगस्ट रोजी राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाला (पीडब्ल्यूडी) सेमिनार हॉलच्या शेजारी असलेल्या खोलीचे आणि शौचालयाचे नूतनीकरण करण्यास सांगितले होते. या परवानगी पत्रावर घोष यांची स्वाक्षरीही आहे.

तामिळनाडूच्या सरकारी शाळेत अध्यात्मिक वर्ग

मुख्याध्यापकाची बदली

वृत्तसंस्था
चेन्नई

तामिळनाडूच्या दोन सरकारी शाळांमध्ये आध्यात्मिक वर्गाबाबत वाद झाला होता. ही बाब 5 सप्टेंबरची (शिक्षक दिन) आहे. चेन्नईतील सैदापेट हायस्कूल आणि अशोक नगर गर्ल्स हायस्कूल या दोन शाळांमध्ये आध्यात्मिक प्रबोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

परमपोरुल फाउंडेशनचे एक वक्ता शाळेत आले. जात, धर्म, पुण्य, पाप, मंदिर यावर त्यांनी भाषण केले. ते म्हणाले- आपल्या पूर्वीच्या कर्माची शिक्षा आपल्याला या जन्मातच मिळते. या वक्त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.

व्हिडिओ समोर येताच, डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया (DYFI) आणि स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) च्या कार्यकर्त्यांनी निषेध केला. याची माहिती सरकारपर्यंत पोहोचली.

अशोक नगर गर्ल्स हायस्कूलच्या मुख्याध्यापकांची शिक्षण मंत्रालयाने बदली केली. तर मुख्यमंत्री एमके स्टॅलिन म्हणाले- आपल्या शिक्षण व्यवस्थेत फक्त विज्ञानाची गरज आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विकास होईल.

शिक्षक दिनानिमित्त परमपोरुल फाऊंडेशनचे वक्ते महाविष्णू यांना तामिळनाडूतील एका सरकारी शाळेत आमंत्रित करण्यात आले होते. वक्ता म्हणाले- या जन्मात जे काही मिळाले ते आपल्या मागील जन्माचे फळ आहे. वक्त्यांनी पुढे गुरुकुल पद्धत रद्द करण्यावर प्रश्न उपस्थित केले. ते पुढे म्हणाले- ही एक अशी व्यवस्था होती ज्याने मूलत: जात आणि लिंगाच्या आधारावर शिक्षणाला परवानगी दिली. पण इंग्रजांनी ते संपवले. या वक्त्याने आपल्या भाषणात असा दावाही केला की असे श्लोक आहेत जे अग्नीचा वर्षाव करतात, रोग बरे करतात. हे सर्व आपल्या पूर्वजांनी शास्त्राच्या रूपात लिहिले होते, पण इंग्रजांनी ते खोडून काढले.

चित्रपट समीक्षक अरुणा वासुदेव यांचे निधन

नवी दिल्ली । ख्यातनाम चित्रपट समीक्षक आणि लेखिका अरुणा वासुदेव यांचे गुरुवारी वयाच्या ८८ व्या वर्षी वृद्धापकाळाशी संबंधित आजारांमुळे नवी दिल्लीतील रुग्णालयात निधन झाले. 'आशियाई सिनेमाची जननी' अशी अरुणा यांची ओळख होती.गेल्या काही दिवसांपासून अरुणा वासुदेव या आजारी होत्या. अल्झायमर आणि वृद्धापकाळाशी संबंधित आजारांमुळे त्या त्रस्त होत्या. गेल्या तीन आठवड्यांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र उपचारांना प्रतिसाद देत नसल्याने गुरुवारी सकाळी त्यांचा मृत्यू झाला, अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीय नीरजा सरीन यांनी दिली.

कमला हॅरिस यांना अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी पाहायला आवडेल

ट्रम्प यांनी रशियावर जास्त निर्बंध लादले, त्या तसे करणार नाहीत

वृत्तसंस्था
मॉस्को

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी कमला हॅरिस यांना अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदासाठी पसंती दिली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असताना रशियावर अधिक निर्बंध लादले होते, असे पुतीन म्हणाले. त्यांच्या आधी कोणत्याही अमेरिकन राष्ट्राध्यक्षाने रशियावर इतके निर्बंध लादले नव्हते.

रशियाच्या व्लादिवोस्तोक शहरात आयोजित ईस्टर्न इकॉनॉमिक फोरम (EEZ) मध्ये पुतिन यांना विचारण्यात आले की ते अमेरिकेचे पुढील राष्ट्राध्यक्ष म्हणून कोणाला प्राधान्य देतात? या प्रश्नाच्या उत्तरात पुतिन म्हणाले, "तुम्ही मला आधी विचारले असते तर मी राष्ट्राध्यक्ष बायडेन यांचे नाव घेतले असते. पण आता त्यांनी शर्यतीतून माघार घेतली आहे, त्यांनी कमला हॅरिसच्या नावाला पाठिंबा दिला आहे, त्यामुळे मीही तेच करणार आहे.

कमला हॅरिसबद्दल बोलताना पुतीन पुढे म्हणाले की, त्या खूप मोकळेपणाने हसतात. यावरून त्यांच्या आयुष्यात सर्वकाही चांगले चालले आहे हे दिसून येते. जर त्या सर्वकाही बरोबर करत असतील तर त्या ट्रम्प यांच्याप्रमाणे रशियावर निर्बंध लादणार नाहीत. कदाचित त्या या गोष्टी टाळतील.

मात्र, पुतीन म्हणाले की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष कोण व्हावे हे निवडण्याचे काम शेवटी

अमेरिकन नागरिकांचे आहे. पुतीन म्हणाले की, ते अमेरिकन लोकांच्या निवडीचा आदर करतील. बायडेन यांनी हॅरिस यांना राष्ट्राध्यक्षपदासाठी पाठिंबा दिला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी 21 जुलै रोजी अध्यक्षपदाची निवडणूक लढवणार नसल्याचे जाहीर केले होते. देश आणि पक्षाच्या हितासाठी मी निवडणुकीतून माघार घेत असल्याचे पत्र बायडेन यांनी जारी केले होते.

खरं तर, 28 जून रोजी अमेरिकेत झालेल्या प्रेसिडेन्शियल डिबेटनंतर, बायडेन यांच्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या नेत्यांनी अध्यक्षपदाची उमेदवारी सोडण्याची मागणी केली होती. माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनीही बायडेन यांना अध्यक्षपदाच्या शर्यतीतून बाहेर पडण्यास सांगितले होते. यानंतर बायडेन म्हणाले होते की, जर डॉक्टरांना मी अयोग्य किंवा कोणत्याही आजाराने ग्रस्त असल्याचे आढळले तर मी अध्यक्षपदाच्या शर्यतीतून बाहेर पडेन.

मणिपूरच्या माजी मुख्यमंत्र्यांच्या घरावर रॉकेट हल्ला:1 ठार, 5 जखमी

वृत्तसंस्था
इंफाळ

मणिपूरचे माजी मुख्यमंत्री मारेम्बम कोईरिंग यांच्या घरावर शुक्रवारी दुपारी 3 वाजता कुकी अतिरेक्यांनी रॉकेट बॉम्बने हल्ला केला. या हल्ल्यात एका वृद्धाचा मृत्यू झाला, तर 5 जण जखमी झाले.

काँग्रेस नेते मारेम्बम कोईरिंग हे राज्याचे पहिले मुख्यमंत्री होते. ते 1963 ते 1967 या काळात 200 दिवस 1967 आणि 1968 मध्ये तीन वेळा मणिपूरचे मुख्यमंत्री होते. 27 डिसेंबर 1994 रोजी त्यांचे निधन झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुकी अतिरेक्यांनी टेकडीपासून सुमारे 4 किलोमीटर अंतरावरून मोइरांगवर रॉकेट बॉम्बने हल्ला केला. हल्ल्यात

मृत्युमुखी पडलेले वृद्ध एका धार्मिक कार्यक्रमाच्या तयारीत होते.

शुक्रवारी सकाळीच बिष्णुपूर जिल्ह्यातील मोइरांगपासून 4 किमी अंतरावर असलेल्या ट्रोंगलाओबी भागात रॉकेट बॉम्ब हल्ला झाला. यामध्ये दोन इमारतींचे नुकसान झाले. मोइरांगमध्ये पहिल्यांदाच बंदुकीतून बॉम्ब हल्ला झाला आहे.

1 ते 3 सप्टेंबर दरम्यान दोन ड्रोन हल्ले झाले, त्यात 1 ठार झाला. गेल्या वर्षी मार्चमध्ये हिंसाचार सुरू झाल्यापासून मणिपूरमध्ये झालेला हा पहिला ड्रोन हल्ला होता. 3 सप्टेंबर रोजी दहशतवाद्यांनी इंफाळ जिल्ह्यातील सेजम चिरांग गावात ड्रोन हल्ला केला, ज्यात एका महिलेसह तीन जण जखमी झाले. 1 सप्टेंबर रोजी कोत्रुक गावावरही ड्रोन हल्ला करण्यात आला होता, ज्यामध्ये 2 लोक ठार आणि 9 जखमी झाले होते.

कुकी अतिरेक्यांना ड्रोन युद्धासाठी म्यानमारकडून तांत्रिक मदत आणि प्रशिक्षण मिळत असल्याचा संशय आहे. या ड्रोन हल्ल्यांच्या चौकशीसाठी मणिपूर सरकारने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. डीजीपी म्हणाले - केंद्राच्या सुरक्षा दलाच्या 198 कंपन्या डोंगराळ भागात आहेत मणिपूरचे डीजीपी राजीव सिंह म्हणाले होते की, हा ड्रोन हल्ला नवीन घटना आहे. आम्ही हे अतिशय गांभीर्याने घेत आहोत. आम्ही एनएसजीचे महासंचालक आणि त्यांच्या टीमशी दिल्लीत बोललो आहोत.